CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ८ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ९२ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे

### आरबीआयच्या निर्णयानंतर बाजार अस्थिर

**मुंबई** : रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरणापूर्वी शुक्रवारी देशांतर्गत शेअर बाजारांची सुरुवात किंचित वाढीसह झाली होती. मात्र,



गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी रेपो दरात कपातीची घोषणा करताच बाजार अस्थिर झाला. बाजारात तीव्र चढ-उतार दिसून आला. निफ्टी ४२ अंकांनी तर निर्देशांक १९७ अंकांनी खाली आले. तज्ज्ञांच्या मते, डॉलरच्या मजबुतीमुळे परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजारातून पैसे काढून घेत आहेत. जोपर्यंत डॉलरचा निर्देशांक १०० च्या जवळ येत नाही तोपर्यंत परदेशी गुंतवणूकदार भारतात पैसा ओतण्याची शक्यता कमीच आहे. दिवसभरातील कारभारात टाटा स्टील, आयटीसी हॉटेल्स, भारती एअरटेल, जेएसडब्ल्यू स्टील आदी शेअर्स वधारले होते. याउलट, आयटीसी, एसबीआय, ब्रिटानिया, अदानी पोर्ट्स आणि टीसीएसच्या शेअर्समध्ये घसरण नोंदविण्यात आली.

### महाकुंभात ४० कोटी भाविकांचा स्नानाचा विक्रम

**महाकुंभ नगर** : प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यात गेल्या चार दिवसांत कमी झालेला भाविकांचा ओघ पुन्हा वाढला आहे. शुक्रवारपर्यंत त्रिवेणी संगमात सुमारे ४० कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केले. हा एक जागतिक विक्रम आहे. प्राप्त माहितीनुसार, शुक्रवारी सुमारे ४८ लाख भाविकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले. अजूनही भाविकांचे येणे सुरूच आहे. आतापर्यंत तीन अमृत स्नानाला विक्रमी संख्येत भाविकांनी हजेरी लावली आहे. हा महाकुंभमेळा २६ फेब्रुवारी अर्थात् महाशिवरात्रीपर्यंत राहणार आहे.

### इन्फोसिसने ४०० प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना तडकाफडकी काढले

**म्हैसूर** : आघाडीची आयटी कंपनी इन्फोसिसने त्यांच्या म्हैसूर कॅम्पसमधील ४०० प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीचे म्हटले आहे की, हे प्रशिक्षणार्थी कर्मचारी सलग तीन प्रयत्नातही मूल्यांकन चाचणी उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. इन्फोसिसने ऑक्टोबर २०२४ मध्ये सुमारे १००० प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. या प्रकरणाशी संबंधित असलेल्यांनी दिलेल्या माहितीनुसार कर्मचाऱ्यांना कंपनीने अडीच वर्षांपूर्वी ऑफर लेटर दिले होते. त्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान, ऑफर लेटर पाठवूनही अडीच वर्षे या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची नियुक्ती न करण्यामागे अर्थिक कारणे होती.

### लाडकी बहीण योजनेतून ५ लाख लाभार्थी वगळले

**मुंबई** : महायुती सरकारच्या महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याची माहिती राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी दिली. या अपात्र महिलांमध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या सुमारे २ लाख ३० हजार महिलांचा समावेश आहे हे विशेष. महायुती सरकारने गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची अर्थसहाय्य केले जात आहे. त्याचा महायुतीला निवडणुकीत मोठा फायदा झाला. पण आता सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. त्यात अनेक महिलांनी खोटी माहिती देऊन या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर येत आहे. विशेषतः इतर सरकारी योजनांतील लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकार या प्रकरणी काटेकोट पडताळणीवर भर देत आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवारी एका ट्विटद्वारे लाडकी बहीण योजनेतून ५ लाख महिलांना वगळण्यात आल्याची माहिती दिली. दिनांक २८ जून २०२४ व ३ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात येत आहे.




प्रयागराज कुंभमेळ्यात भाविकांना पवित्र स्नानासोबतच अयोध्येतील राम मंदिराच्या प्रतिकृतीचेही दर्शन घेण्याचा लाभ मिळत आहे

# सात पाकी घुसखोरांचा खात्मा

### भारतीय जवानांची सीमेवर मोठी कारवाई

### 'बॅट'च्या तीन अतिरेक्यांचा समावेश

◆ **श्रीनगर, ७ फेब्रुवारी**

जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरील कृष्णा घाटी परिसरातून भारतीय हद्दीत घुसखोरी करणाऱ्या सात पाकिस्तानी घुसखोरांना भारतीय जवानांनी ठार केले. यात पाकिस्तानच्या कुख्यात बॉर्डर ॲक्शन टीममधील तीन सदस्यांचा आणि अल् बद्रच्या अतिरेक्यांचा समावेश आहे. अलिकडील वर्षातील ही सर्वांत मोठी कारवाई ठरली आहे.



भारतीय लष्कराने नियंत्रण रेषेवर ४ आणि ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्रीनंतर काही संशयास्पद हालचाली टिपल्या. सीमेला लागून असलेल्या लष्कराच्या चौकीवर मोठा आत्मघाती हल्ला करण्याच्या तयारीत असलेले हे अतिरेकी सीमेच्या बरेच आत आले होते. सतर्क जवानांनी आधी इशारा दिला आणि नंतर गोळीबार केला. यात सात अतिरेकी ठार झाले. पाकिस्तानचे तीन सैनिकही जखमी झाले असून, त्यांनी व्याप्त काश्मीरच्या दिशेने पळ काढला, अशी माहिती लष्करी अधिकाऱ्यांनी दिली.

पाकिस्तानी लष्कर ५ फेब्रुवारी हा दिवस काश्मीर एकता दिवस म्हणून पाळते. या दिवसाचे निमित्त करून पाकिस्तान या भागात सातत्याने भारताविरोधी प्रचार करीत असतो आणि याचाच एक भाग म्हणून दरवर्षी या काळात भारतात घातपात घडविण्याचा कट रचत असतो, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पाकिस्तानच्या सीमा कृती दलात जवान आणि अतिरेकी दोघांचाही समावेश आहे. छुपे हल्ले करून आपल्या हद्दीत पळ काढण्यात ते निष्णात असून, यापूर्वीही त्यांनी भारतीय हद्दीत घुसून जवानांचा शिरच्छेद केल्याचा आणि त्यांचे मुंडके घेऊन गेल्याच्या घटना घडल्या आहेत. यावेळी त्यांचा हा कुटिल डाव जवानांनी उधळून लावला. (वृत्तसंस्था)

# घर, कार खरेदी स्वस्त होणार

### ● प्रमुख कर्जांवरील व्याजदरात कपात ● पाच वर्षांनंतर प्रथमच रिझर्व्ह बँकेचा सामान्यांना दिलासा

◆ **मुंबई, ७ फेब्रुवारी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने सुमारे पाच वर्षांनंतर प्रथमच प्रमुख कर्जांवरील व्याजाच्या दरात कपात केली आहे. यामुळे सर्वसामान्यांचे घर आणि वाहनासह अन्य आवश्यक वस्तू खरेदी करण्याचे स्वप्न साकारणार आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे नवनियुक्त गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेत झालेल्या पतधोरण आढावा बैठकीनंतर आज याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तीन दिवसीय आढावा बैठकीनंतर आयोजित पत्रपरिषदेत संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, रेपो दरात आम्ही २५ बेसिस पॉईंट्सची कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे आता हा दर ६.२५ टक्क्यांवर खाली आला आहे.





**जीडीपी वाढीचा दर ६.७ टक्के राहण्याचा अंदाज**

मागील डिसेंबरमध्ये झालेल्या पतधोरण बैठकीत आरबीआयचे तत्कालीन गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी नव्या आर्थिक वर्षात जीडीपी वाढीचा दर ६.६ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता. आज संजय मल्होत्रा यांनी त्यात किंचित वाढ होणार असल्याचे नमूद केले. १ एप्रिलपासून सुरू होत असलेल्या नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढ ६.७ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ७ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ६.५ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ६.५ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

**किरकोळ महागाईत घट होणार**

चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाईचा दर ४.८ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तर आर्थिक वर्ष २०२६ मध्ये हा दर ४.२ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. महागाई कमी झाली असून, २०२६ मध्ये ती आणखी कमी होण्याची अपेक्षा रिझर्व्ह बँकेने व्यक्त केली आहे. (वृत्तसंस्था)

# दिल्लीचा फैसला आज

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या शनिवारी होणाऱ्या मतमोजणीकडे दिल्लीतीलच नाही, तर देशातील जनतेचेही लक्ष लागले आहे.

७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी ५ फेब्रुवारीला मतदान झाले होते. या मतदानाने ६९९ उमेदवारांचे भाग्य ईव्हीएममध्ये बंद झाले होते. यावेळी ६०.५४ टक्के मतदान झाले. २०२० च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी २ टक्के मतदान कमी झाले.

शनिवारी सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार असून, ९ वाजपेर्यंत निकालांचा कल यायला सुरुवात होईल. ११ वाजेपर्यंत निकालांचे चित्र स्पष्ट होईल.

दिल्लीतील मतदानोत्तर चाचणीत बहुतांश वाहिन्यांनी भाजपाला स्पष्ट बहुमत दर्शवले आहे. त्यामुळे यावेळी दिल्लीत भाजपाला बहुमत मिळणार का, याबाबत उत्सुकता वाढली आहे. मतदानोत्तर चाचणीच्या कलामुळे भाजपा गोटात उत्साहाचे वातावरण असून, आप वर्तुळात निराशा जाणवत आहे. दिल्लीत आप, भाजपा आणि काँग्रेस या तीन राष्ट्रीय पक्षात लढत झाली. भाजपाचा जवळपास २७ वर्षांचा राजकीय वनवास संपून आपचा वनवास सुरू होणार आहे, याबाबत जनमानसात कुतुहल आहे. (तभा वृत्तसेवा)

# केजरीवालांच्या निवासस्थानी एसीबीने चिकटवली नोटीस

### १५ कोटींच्या आरोपावरून दिल्ली तापली

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या एकदिवस आधी आपचे नेते आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आरोपांनी दिल्लीतील वातावरण तापले.

भाजपाने आपच्या आमदारांना पक्ष सोडण्यासाठी १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव दिल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला. या आरोपांची चौकशी करावी, अशी मागणी भाजपाने नायब राज्यपाल विजयकुमार सक्सेना यांना पत्रातून केली होती. त्यानुसार सक्सेना यांनी चौकशीचा निर्देश लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला (एसीबी) दिला. दरम्यान, आपचे राज्यसभा सदस्य संजयसिंह यांनी दुपारी एसीबीच्या कार्यालयात जात केजरीवालांच्या आरोपांचा पुनरुच्चार केला.

एसीबीची चमू दुपारी चौकशीसाठी केजरीवाल यांच्या निवासस्थानी दाखल झाली होती. मात्र, या चमूला केजरीवालांच्या निवासस्थानी प्रवेश देण्यात आला नाही. त्यामुळे केजरीवालांच्या निवासस्थानावर नोटीस चिकटवत ही चमू परत आली.

या नोटिसीतून एसीबीने पाच प्रश्नांची उत्तरे मागितली आहे. केजरीवालांनी ६ फेब्रुवारीला एक्सवर एक पोस्ट टाकत भाजपाने आपच्या आमदारांना पक्ष सोडण्यासाठी १५ कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता, असा आरोप केला होता. ही पोस्ट तुम्ही केली का, अशी विचारणा या नोटिसीतून करण्यात आली. आपच्या कोणत्या १६ आमदारांना भाजपाने दूरध्वनी केले, त्यांची नावे आणि भाजपातर्फे हा दूरध्वनी कोणी केला, त्याचे नावही मागितले आहे. आपल्या आरोपाच्या समर्थनार्थ पुरावे सादर करायलाही केजरीवालांना सांगण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

# महाराष्ट्रात मतदारयादीचा घोटाळा

### न्यायालयात धाव घेणार : राहुल गांधी

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या आधी मतदार याद्यांमध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करताना निवडणूक आयोगाने आम्हाला लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदार याद्या दिल्या नाही, तर न्यायालयात जाण्याचा इशारा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केला.



राजधानी दिल्लीत संयुक्त पत्रपरिषदेला संबोधित करताना राहुल गांधी, संजय राऊत आणि सुप्रिया सुळे

राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे तसेच उबाठा गटाचे संजय राऊत यांच्यासोबत एका संयुक्त पत्रपरिषदेला संबोधित करताना गांधी म्हणाले की, महाराष्ट्रात पाच वर्षांत जितक्या नवीन मतदारांची नावे मतदार यादीत जोडण्यात आली, त्यापेक्षा जास्त नावे पाच महिन्यांत जोडण्यात आली.

२०१९ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत ३२ लाख नवीन मतदारांची नाव मतदार यादीत जोडण्यात आली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीपर्यंत म्हणजे पाच महिन्यांत ३९ लाख नवीन मतदारांची नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली, हे नवीन मतदार कोण आहेत आणि कुठून आले, याचे उत्तर निवडणूक आयोगाने दिले पाहिजे, असे राहुल गांधी म्हणाले.

महाराष्ट्रात प्रौढ मतदारांची संख्या ९ कोटी ५४ लाख असल्याचे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे, प्रत्यक्षात महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ९ कोटी ७० लाख आहे, असा आरोप करत गांधी म्हणाले की, याचा अर्थ महाराष्ट्रात लोकसंख्येपक्षा जास्त मतदार आहेत.

रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेसला १ लाख ३६ हजार मते मिळाली आणि काँग्रेस जिंकली, पण विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघात ३५ हजार नवीन मतदार जोडण्यात आले. या सर्वांनी भाजपाला मतदान केले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपा जिंकली. असे एका नाही, तर अनेक मतदारसंघात झाले. काँग्रेसची मते कमी झाली नाही, तर भाजपाची मते वाढल्यामुळे भाजपा जिंकली, असा आरोप त्यांनी केला. (तभा वृत्तसेवा)

# शेतकऱ्यावर रानडुकराचा हल्ला

### वाई शेतशिवारातील घटना

◆ **कारंजा लाड, ७ फेब्रुवारी**

रानडुकराच्या हल्ल्यात ४० वर्षीय शेतकरी गंभीर जखमी झाला. ही घटना कारंजा तालुक्यातील वाई शेतशिवारात ७ फेब्रुवारीला सकाळी १० च्या सुमारास घडली. गोपाल हरिदास मराठे असे जखमीचे नाव असून, ते वाई येथील आहेत.

गोपाल मराठे हे सकाळी शेतात काम करीत असताना नालीत दबा धरून बसलेल्या रानडुकराने अचानक हल्ला केला. यात ते गंभीर जखमी झाले. जखमी अवस्थेत नातेवाईकांनी त्यांना कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, प्रकृती गंभीर असल्याने अकोला येथे हलविण्यात आले.

मागील काही दिवसांपासून कारंजा तालुक्यात रानडुकरांचे नागरिकांवरील हल्ले वाढले आहेत. त्यामुळे शेतात काम करताना शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी काळजी घेण्याची गरज आहे. वन विभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा आणि संबंधित शेतकऱ्यास नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. (तभा वृत्तसेवा)

# मानवी डोक्यात चमचाभर प्लॅस्टिक!

### नव्या संशोधनातून धक्कादायक माहिती समोर

◆ **लंडन, ७ फेब्रुवारी**

आपल्या दैनंदिन जीवनात प्लॅस्टिकचा वापर खूप वाढला आहे. पाण्याच्या बाटली ते जेवणाचा डबा, वापरा अन् फेका चहाचे कप, प्लॅस्टिक वेष्टनातील खाऊ अशा सर्वच ठिकाणी प्लॅस्टिकचा सर्रास वापर होताना दिसतो. आपण वापरलेल्या प्लॅस्टिकचा कचरा रस्त्यांवर, उद्यानात, शेतात सगळीकडे दिसून येतो. हेच प्लॅस्टिक आता मानवी शरीरात आणि तेही डोक्यापर्यंत पोहोचले आहे. नेचर मेडिसीन जर्नलमध्ये छापून आलेल्या एका संशोधनानुसार, मानवी डोक्यात चमचाभर म्हणजे जवळपास ७ ग्रॅम प्लॅस्टिक आढळून आले आहे. मृत शरीराच्या डोक्याची तपासणी केल्यानंतर हा धक्कादायक निष्कर्ष समोर आला आहे.

डोक्यात आढळून आलेल्या मायक्रोप्लॅस्टिक आणि संशोधकही गोंधळून गेले आहेत. संशोधकांनी सांगितले की, २०१६ आणि २०२४ या काळात मानवी शरीरातील प्लॅस्टिकची पातळी ५० टक्क्यांनी वाढली आहे. या संशोधनासाठी २४ मृत शरीरातील डोक्यातील पेशींचा अभ्यास करण्यात आला. यावेळी डोक्यातून सरासरी ७ ग्रॅम इतके मायक्रोप्लॅस्टिकचे कण आढळून आले. या संशोधनाचे प्रमुख वैज्ञानिक मॅथ्यू कॅम्पेन यांनी सांगितले की, आपल्या डोक्यात इतक्या मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचे कण आढळतील, याची मला कल्पना नव्हती. हे प्रमाण आपल्या आरोग्यासाठी घातक आहे.



तज्ज्ञांच्या मते, आपण दैनंदिन जीवनात वापरत असलेले पॅकेजिंग, कंटेनर्स, कपडे, टायर आणि इतर वस्तूंच्या अतिशय बारीक कणांना मायक्रोप्लॅस्टिक आणि नॅनोप्लॅस्टिक म्हणतात. प्लॅस्टिकचे हे छोटे कण जगभरातील सर्वच वस्तूंमध्ये दिसून येत असून, ते मानवी शरीरात आणि मेंदूतही पोहोचले आहेत. मायक्रोप्लॅस्टिक आपल्या शरीरात जाण्यापासून रोखायचे असेल, तर सिंगल युज प्लॅस्टिक वापरणे कमी केले पाहिजे, असे तज्ज्ञ सांगत आहेत. पिण्याचे पाणी आणि जेवण प्लॅस्टिक बाटली किंवा डब्यात ठेवण्याऐवजी काचेच्या भांड्याचा वापर करावा. प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ टाळावे, यात प्लॅस्टिकचे प्रमाण अधिक आढळते. (वृत्तसंस्था)

#### मेंदूत इतर अवयवांच्या तुलनेत सर्वाधिक प्लॅस्टिक

संशोधकांनी म्हटले की, मेंदूमधील टिश्यूमध्ये यकृत आणि मूत्रपिंडापेक्षाही अधिक प्रमाणात प्लॅस्टिक आढळून आले आहे तसेच डिमेंशिया आजाराने ग्रस्त असलेल्या १२ लोकांच्या मेंदूचीही तपासणी करण्यात आली, यात असे दिसले की, इतर लोकांच्या तुलनेत डिमेंशिया असणाऱ्या लोकांच्या डोक्यात पाचपट अधिक मायक्रोप्लॅस्टिकचे कण आहेत. यामुळेच आता मायक्रोप्लॅस्टिक आणि डोक्याशी संबंधित अल्झायमर आणि पार्किंसन्स यासारख्या आजारांचा सहसंबंध असल्याचा कयास बांधला जात आहे.

### प्रथम कारसेवक कामेश्वर चौपाल यांचे निधन

◆ **नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

रामललाच्या मंदिर निर्माणातील पहिली शिळा रचणारे विश्व हिंदू परिषदेचे नेते कामेश्वर चौपाल यांचे निधन झाले. गेल्या काही कालावधीपासून ते आजारी होते.



ते मूळचे पाटण्याचे रहिवासी होते. चौपाल यांनी दिल्लीतील गंगाराम रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांना 'प्रथम कारसेवक' असे संबोधले होते. बिहारचे चौपाल यांनी ९ नोव्हेंबर १९८९ रोजी अयोध्येत राम मंदिराच्या प्रथम शिलान्यास समारंभात पहिली शिळा ठेवली होती. तो कार्यक्रम चौपाल यांनीच घेतला होता. त्यामुळे रा. स्व. संघाने त्यांना प्रथम कारसेवक ही उपाधी दिली होती.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी चौपाल यांच्या निधनावर तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, राम मंदिर आंदोलनाची पहिली शिळा चौपाल यांनी ठेवली होती. अशा ऐतिहासिक मोहिमेचे ते अध्वर्यू होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी वाहिले होते. (वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त...



### भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सोलापूर पूर्व जिल्ह्याचा प्रथम क्रमांक

**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशतर्फे संघटन पर्वनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात भाजप सदस्य नोंदणी अभियानाची सुरवात करण्यात आली होती. त्यात संपूर्ण महाराष्ट्रातून ग्रामीण भागातून सोलापूर पूर्व जिल्ह्याने सदस्य नोंदणी प्रथम क्रमांकाचे स्थान मिळविल्याबद्दल एसएनडीटी महाविद्यालय मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भाजपा जिल्हा पूर्वचे जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा गौरव करण्यात आला. अक्कलकोटमध्ये ८४, ७७९ (म्हणजेच १०८.६८ टक्के) एवढ्या मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी केल्याबद्दलही आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा विशेष गौरव यावेळी करण्यात आला. यावेळी भाजपा राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण उपस्थित होते.

**जिल्हाध्यक्ष आ. कल्याणशेट्टींचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला गौरव**

### बार्शीत देवकार्याच्या कार्यक्रमात वाद; युवकावर चाकूने हल्ला

**बार्शी, दि फेब्रुवारी**

तालुक्यातील पानगाव येथे देवकार्याच्या कार्यक्रमात डीजे लावण्याच्या वादातून हाणामारी होऊन एका युवकावर चाकूने हल्ला करण्यात आला. याप्रकरणी बाबू गुलजार काळे आणि त्याचा मुलगा सतीश बाबू काळे यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. अधिक माहितीनुसार, अभिषेक संतोष चव्हाण (वय २५, रा. फपाळवाडी) हे आपल्या कुटुंबासोबत मावस बहिणीच्या देवकार्याच्या कार्यक्रमासाठी पानगाव येथे गेले होते. दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास कार्यक्रमात डीजे लावण्याच्या कारणावरून बाबू काळे आणि रवी रामा काळे यांच्यात वाद झाला. हा वाद सोडवताना अभिषेक चव्हाण यांच्या वडिलांना बाबू काळे यांनी धक्काबुक्की केली. त्यावेळी अभिषेक यांनी मध्यस्थी करत बाबू काळे यांना कार्यक्रमातून हाकलून दिले. यानंतर रात्री ८ वाजण्याच्या सुमारास अभिषेक चव्हाण आणि विशाल पवार हे मोटरसायकलजवळ उभे असताना बाबू काळे आणि त्याचा मुलगा सतीश काळे यांनी शिवीगाळ करत हल्ला केला. बाबू काळे याने चाकूने अभिषेक यांच्या पोटावर, कमरेवर आणि कानाखाली वार केले, तर त्यांना वाचवण्यास आलेल्या विशाल पवार यांना सतीश काळे याने मारहाण केली. या हल्ल्यात अभिषेक चव्हाण गंभीर जखमी झाले असून त्यांना बार्शी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विशाल पवार यांनाही किरकोळ मार लागला आहे. याप्रकरणी अभिषेक चव्हाण यांनी बाबू काळे आणि सतीश काळे यांच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.




### कामतकर ॲकॅडमीतर्फे टॅलेंट सर्च परीक्षा

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापुरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेत प्रोत्साहन मिळावे, याकरिता कामतकर ॲकॅडमीतर्फे इ. पाचवी व आठवी मराठी, सेमी, इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप बोर्ड परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत विद्यार्थ्यांच्या सरावासाठी 'सोलापूर टॅलेंट सर्च परीक्षा' (डढड) रविवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत घेण्यात आली. ही परीक्षा 'कामतकर क्लासेस जुना एम्प्लॉयमेंट चौक, कामत हॉटेलमागे आणि कामतकर ॲकॅडमी, जुळे सोलापूर अशा दोन केंद्रांवर घेण्यात आली. परिक्षेस सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, अक्कलकोट अशा अनेक तालुका तसेच शहरातून ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. कामतकर क्लासेसचे संचालक सुनील कामतकर आणि संचालिका सुखदा कामतकर यांनी पालकांना या परिक्षेचे महत्व सांगितले. परिक्षा यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी सुयोग ॲकॅडमीचे संचालक घनश्याम कदम, प्राजक्त कुलकर्णी, शिल्पा शहा, भाग्यश्री बागलकोटी, ऐश्वर्या कुलकर्णी, कारंडे, निलेश गायकवाड, गिरीष कापसे, श्रीकांत चिप्पा, हलकुडे, तावशे, श्री. ढाले, अभिषेक उबाळे, संतोष पुजारी यांचे सहकार्य लाभले.

### माजी सैनिकांच्या विधवा महिलांनी महिला संघटना स्थापन करावी

**सोलापूर दि. ७ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांच्या विधवा महिलांच्या कल्याणासाठी संघटना स्थापित करणेबाबत सैनिक कल्याण विभागाचे संचालक यांनी सुचना दिलेल्या आहेत. माजी सैनिकांच्या विधवा महिलांसाठी जिल्हा स्तरावरील योग्य व तात्काळ कार्यवाही करुन संघटना स्थापित करावी. माजी सैनिकांच्या विधवा महिलांमध्ये माजी सैनिकांच्या विधवांसाठी देण्यात येणा-या उपाययोजना करण्यासाठी दररोज सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत सैनिकी मुलींचे वसतिगृह, सुंदरमनगर शासकीय आय.टी.आय च्या पाठीमागे विजापूर रोड, सोलापूर येथे माजी सैनिक विधवा महिलांचे मेळाव्याचे अयोजन केले आहे. तरी संबंधित जास्त संख्येने माजी सैनिकांच्या विधवांनी सैनिकी मुलींचे अशासकीय वसतिगृह अधिक्षिका श्रीमती आशादेवी सिध्दलिंगप्पा किवडे यांच्याशी भ्रमणध्वनीव्दारे मो.नं. ९५२७५४०३४ वर तात्काळ संपर्क साधावा असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

# सोलापूर सिव्हिलसाठी नवे एमआरआय मशीन मंजूर

### आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) येथे नव्या एमआरआय मशीनच्या मंजुरीचा मार्ग मोकळा झाला आहे. येथे सध्या कार्यान्वित असलेली मशीन साधारण बारा वर्षे जुनी असून कालबाह्य झालेली ही मशीन वारंवार दुरुस्त करून वापरण्याचा प्रयत्न होतो. मात्र गेल्या काही दिवसांपासून येथील एमआरआय मशीन बंद असल्याने सोलापूर जिल्ह्यासह शेजारील कर्नाटक व तेलंगणातील हजारो रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. महागडे एमआरआय स्कॅन करून बाहेर खासगी रुग्णालयात आणण्या शिवाय रुग्णांना पर्याय नव्हता.




सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत या प्रश्नावर ठोस भूमिका घेत सोलापूरच्या सिव्हिलसाठी नवे एमआरआय मशीन मंजूर करून घेतले. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीत आमदार कोठे यांनी सोलापूरच्या रुग्णांसाठी एमआरआय मशीनची तातडीची गरज असल्याचे स्पष्ट केले. सोलापूरच्या सिव्हिलमध्ये नव्या तंत्रासह एमआरआय यंत्रणा उपलब्ध झाल्यास गोरगरीब रुग्णांना दिलासा मिळणार असल्याची बाब अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनीही बैठकीत मांडली. आमदार कोठे व अधिष्ठाता यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागाच्या सचिवांना त्वरित निधी मंजूर करण्याचे आदेश दिले.

सदर बैठकीला ग्रामविकास मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्यासह समितीचे अन्य सदस्य आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सोलापुरातील आरोग्य सुविधांसाठी ही मोठी उपलब्धी मानली जात आहे. नवीन एमआरआय मशीन लवकरच कार्यान्वित होणार असून, त्यामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनींकरिता IEDSSC झोन शासकीय तंत्रनिकेतन सोलापूर येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, त्यामध्ये खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल बुद्धिबळ, कॅरम तसेच थलेटिक्स या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. जिल्ह्यातील सर्व तंत्रनिकेतनांनी या स्पर्धामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या अंगी क्रीडासंस्कृती वाढवण्यासाठी तसेच त्यांना शारीरिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने प्रेरणा देणारी होती.

बुध्दीबळ या क्रिडाप्रकारात चंदना जकापल्ली, ऋतुजा पाटील, कु. वर्षा काळे, संजना नंदल, वैभवी वल्पदास यांनी उत्कृष्ट खेळ दाखवत प्रथम क्रमांक मिळवला. बास्केटबॉल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाची चुणूक दाखवत संघाने विजय मिळवला. या संघात सृष्टी बोकडे, संजीवनी कसबे, श्रावणी घाडगे, स्नेहा धप्पाधुळे, गीता गायकवाड, प्राची लोखंडे, वैष्णवी मुरगुंडे, वैष्णवी कोकाटे, सोनाली कोळी, श्रुतिका दबडे, नम्रता कलशेट्टी, नेत्रा कलशेट्टी यांनी सहभाग नोंदविला.




व्हॉलीबॉल या स्पर्धेत अंतिम सामन्यात अत्यंत दमदार खेळाचे प्रदर्शन करून संघाने विजयश्री खेचून आणली. या संघात वैष्णवी कोकाटे, श्रावणी चारगुंडी, प्राची लोखंडे, माया भुसारे, अमृता मोटे, गौराबाई सुरवसे, ऋतुजा पाटील, सानिका सूर्यवंशी, वैष्णवी मुरगुंडे, वैष्णवी माळी, वसुंधरा ढवळे, पल्लवी आहेरवाडी हे सहभागी होते.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या खो-खोच्या अंतिम सामन्यात संघाने विजय मिळवत प्रथम पारितोषिक पटकावले या क्रीडा प्रकारात भूमिका मेंडगुंडे, श्रेया चव्हाण, अमृता बिंगी, तेजश्री वसेकर, अभिलाषा बिराजदार, वर्षाराणी माळी, लक्ष्मी चिकणे, वैष्णवी भानुमते, वैष्णवी माळी, वैष्णवी लद्दी, कृतिका गणगोंडा, दीक्षा गुंड, सुप्रीता झळकिकर, रसिका कौलगी, प्राजक्ता मिसाळ यांनी सहभाग नोंदविला.

संस्थेचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी यशस्वी सर्व विद्यार्थीनींचे अभिनंदन केले. प्राचार्य गजानन धरणे, सी. बी. नाडगौडा, मल्लिनाथ मसरे, काशिनाथ ढोले, गुरुराज माळगे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. क्रिडा विभागाचे प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास, प्रा. विवेकानंद दासरी, प्रा. शितल सावळगी, प्रा. संग्राम माने, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. स्नेहल कोटेकर, ऐश्वर्या व्हनमने यांचे मार्गदर्शन लाभले.

### पालकमंत्री गोरे १४ फेब्रुवारी रोजी जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ फेब्रुवारी-**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यामध्ये ते विविध ठिकाणी भेटी देणार असून, सांगोला तालुक्यातील कार्यक्रमांना हजेरी लावणार आहेत.

यावेळी चिकमहोद तालुका सांगोला, महुद, देगाव कालवा भेट (चाचणी सिंचन कार्यक्रम) आदी ठिकाणी पालकमंत्री महोदय यांचे कार्यक्रम नियोजित आहेत. तसेच या अनुषंगाने संपूर्ण दौरा नियोजन नंतर कळविण्यात येणार आहे, अशी माहिती पालकमंत्री सोलापूर यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे. पालकमंत्री झाल्यानंतर जयकुमार गोरे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक गाजविली होती. पालकमंत्री झाल्यानंतर पहिल्याच शासकीय कार्यक्रमात ते सहभागी होणार आहेत.



# राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत सागर कला केंद्राचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ७ फेब्रुवारी-**

अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत मोडनिंब (ता.माढा) येथील पूर्वीचे सागर कलाकेंद्राने २५ वर्षांपैकी १७ वर्षे सलग प्रथम क्रमांक पटकावले. त्यानंतर लावणी स्पर्धा थांबल्या. पुन्हा मागील वर्षीपासून सुरू झाल्या. मात्र यावेळी मोडनिंब येथील नटरंग (सागर) कला केंद्रातील अनिता परभणीकर या पार्टीने द्वितीय क्रमांक पटकावला.

चौथा क्रमांक याच कला केंद्रातील स्नेहा लखनगावकर यांनी मिळवला. मंगल माया खामगावकर याही पार्टीने याही संगीत पार्टीने आपला सहभाग लावणी स्पर्धेमध्ये नोंदवला होता. तर ढोलकी वादक अर्जुन शिंदे, हार्मोनियम वादक विकी जावळे, तबलावादक निलेश डावाळे या तिघांनी याच कला केंद्रातील कलावंतांनी प्रथम क्रमांक मिळवला. अनिता परभणीकर या पार्टीतील नृत्य प्रशिक्षिका म्हणून रूपाली जाधव परभणीकर यांनी केले होते. यावेळी कला केंद्राचे संचालक किसनराव जाधव यांनी सांगितले की अकलूज ची लावणी स्पर्धा म्हणजे कलाकारांना तब्बल दोन महिने सराव करावा लागतो. अतिशय मेहनतीने हे कलाकार आठआठ तास सराव करून प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी धडपड करत असतात. याचे त्यांना फळ मिळाले आहे.

# कृषीकेंद्र फोडणाऱ्या टोळीला अटक

### सहा गुन्हे उघड
### शहर गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी -**

कौतम चौकातील महाराष्ट्र ॲग्रीक्लचरचे दुकान फोडणारे व शहरात दुचाकी लंपास करणाऱ्या ८ जणांना जणांना ताब्यात घेत एकुण सहा गुन्हे उघड केलेत. २ लाख ५२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेच्या पथकांनी केली आहे.

कौतम चौकातील महाराष्ट्र ॲग्रीक्लचर हे रायचे दुकानाचे शटर उचकटून दुकानातील ७ हजार २०० रुपये लंपास केले होते. याबाबत वैभव भीमाशंकर जम्मा यांनी दिलेल्या तक्रारीवरून जेलरोड पोलिसांत गुन्हा दाखल होता. त्यानुसार गुन्हे शाखेचे पथक आरोपीचा तपास करीत होते. दरम्यान जुना पूना नाकाजवळ चार संशयित थांबल्याची माहिती मिळाली. त्यावरून खातरजमा करून सुरेश नारायण रेकुला (वय ५७, रा. तेलंगणा), अशोक गंगाधरप्पा उर्फ अशोक एच जी (वय २७, कर्नाटक), टी. एन मोहन नारायणस्वामी(वय ४२ रा.आंध्रप्रदेश), अजमत अब्दुल जब्बार सय्यद (वय ३७, रा. आंध्रप्रदेश), अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून दुकान फोडलेल्या गुन्ह्यातील ७ हजार २०० व चार मोबाईल असा एकुण ६२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटकात गुन्हे दाखल आहेत. अकोला या ठिकाणी पाहिजे आरोपी आहेत.



दुसऱ्या घटनेत दुचाकीसह चोरीच्या गुन्ह्यात चौघांना ताब्यात घेत त्यांच्याकडून पाच गुन्हे उघड झालेले आहेत. नागेश प्रभाकर चापे (वय १९, रा. वर्जेश्वर नगर अक्कलकोट रोड सोलापूर), राकेश सुरेश चन्ना (वय ४२, रा.सायन कोळीवाडा मुंबई), रामहरी दत्तू पवार (वय ३९, रा. कर्देहळ्ळी, उत्तर सोलापूर), ओंकार आनंद चिलका (वय २५, एच ग्रुप विडी घरकुल, सोलापूर) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून चार दुचाकी व सोने चोरीचा गुन्हा उघड झाला आहे. ही कामगिरी पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलिस निरीक्षक विजय पाटील, पोलिस अंमलदार राहुल तोगे, आबाजी सावळे, अर्जिक्य माने, धिरज सातपुते, विठ्ठल यलमार यांच्या पथकाने केली आहे.

# पहिल्या डावाच्या आघाडीवर युनायटेड विजयी

### निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीची लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत युनायटेड क्रिकेट क्लबने पहिल्या डावाच्या आघाडीवर एनजीसीए क्रिकेट अकादमीवर विजय मिळविला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना युनायटेडने पहिल्या डावात ५१.२ षटकात सर्व बाद १८१ धावा केल्या. यात कबाडे ४७, संभाजी शिंदे ३८ व हर्षद विजापूरने २४ धावा केल्या. पार्थ राठोडने १७ धावात ३, ऋग्वेद पाटीलने ६ धावात २, सोहम कुलकर्णीने १६ धावात २ तर श्रवण माळी, अनुज वाल्मिकी व आनंद शेंडे यांनी प्रत्येकी एक बळी टिपला. प्रत्युत्तरात एनजीसीएने पहिल्या डावात २४.३ षटकात सर्व बाद ७९ धावा केल्या. यात रणवीर सिंग बुमरा २४, पार्थ राठोड २४ व कृष्णा चाकोतेने ११ धावा केल्या. आरशाद विजापूरने १९ धावात ४, सम्राट बोबडेने ६ धावात २ बळी तर निखिल माळीने २४ धावात १ बळी टिपले. युनायटेडने दुसऱ्या डावात ६५.२ षटकात सर्व बाद १६३ धावा केल्या. यात हर्षदीप साठे ५६, संभाजी शिंदे ३५, हर्षद विजापूर १६ व श्रीराज गवळीने १३ धावा केल्या. आनंद शेंडेने २२ धावात ४ बळी, सोहम कुलकर्णीने ३० धावात ३ बळी व अनुज वाल्मिकीने १० धावात २ गडी बाद केले. एनजीसीएने दुसऱ्या डावात ४१ षटकात ७ बाद १६७ धावा केल्या. यात आनंद शिंदे नाबाद ७१, सोहम कुलकर्णी ५९, पार्थ राठोड १२ व यशराज टेकाळे नाबाद १४ धावा केल्या. सम्राट बोबडेने १७ धावात २, यश लोंढेने १९ धावात २ तर संभाजी शिंदे व गवळीने प्रत्येकी एक बळी टिपले. पंच म्हणून चिराग शहा व प्रवीण कुलकर्णी तर गुणलेखक म्हणून गणेश पवार यांनी काम पाहिले. पुष्प जिमखाना डोणगाव रोड येथे एनजीसीए विरुद्ध युनायटेड क्रिकेट क्लब यांच्यामध्ये दोन दिवशीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या तीन सामन्याची मालिका सुरू झाली. याचे उद्घाटन सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन १४ वर्षाखालील निवड समिती चेअरमन राजेंद्र गोटे, निवृत्त पोलीस उपायुक्त श्री रावे, कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव विनोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी एनजीसीए कोच निलेश गायकवाड व युनायटेड क्लब कोच चंद्रकांत लोखंडे आदी उपस्थित होते.



वैयक्तिक पारितोषिके : उत्कृष्ट फलंदाज : संभाजी शिंदे, गोलंदाज : आनंद शेंडे, सामनावीर : आनंद शेंडे.

# बार्शी शहर, तालुक्यातील परप्रांतीयांची चौकशी करा

### आशिष शिंदे यांची उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

बार्शी शहर व तालुक्यात कारखाने, वीटभट्ट्या खडीक्रशर, डाळमिल व इतर ठिकाणी कामाकरिता आलेल्या परप्रांतीय लोकांची कसून चौकशी करा, अशी मागणी डीपीआयचे जिल्हा कार्याध्यक्ष आशिष उर्फ कृष्णा शिंदे यांनी निवेदनाद्वारे बार्शी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे केली आहे. सध्या बार्शी शहर व तालुक्यात सुमारे दहा ते पंधरा हजारांपेक्षा जास्त परप्रांतीय इसम असून त्यांची कसून चौकशी करा. संबंधित इसम हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असण्याची दाट शक्यता असल्याचे मत आशिष शिंदे यांनी व्यक्त केले आहे. औद्योगिक वसाहत नंबर एक येथे पिंटू बागमार या कारखानदाराच्या कारखान्यात बिहारी कामगार असून त्या कामगारांनी नुकतेच २३ जानेवारी रोजी सायंकाळी हिरेमठ हॉस्पिटल नाक्याजवळ दारूच्या नशेत एकाच वेळी दोन-तीनअल्पवयीन मुलींची छेडछाड केल्याची नुकतीच घटना घडली असून त्याबद्दल विचारणा करण्यास गेलेल्या लोकांना सदर बिहारी व्यक्तीने हमारा कुछ भी उखाडो! हमे कोई कुछ नही कर सकता! क्यू की हमारा मालिक पिंटू बागमार है! अशा प्रकारचे वक्तव्य केले असून सदर कारखानदारांनी परप्रांतीय कामगारांची हमी घ्यावी, असे देखील निवेदनात नमूद केले आहे. सदर लोकांची ओळख परेड घेऊन ज्या कारखानदारांना परप्रांतीय लोकांची कामाकरिता गरज आहे त्या कारखानदारांनी त्या परप्रांतीय लोकांची जबाबदारी घेऊन तसे हमीपत्र पोलीस प्रशासनाला द्यावे व त्यांचे कागदपत्र तपासावे, असेही निवेदनात म्हटले आहे. सदरचे परप्रांतीय कोणाच्या मर्जीने बार्शीत वास्तव्य करत आहेत त्यांची कुठल्या संबंधित कामगार विभागाकडे नोंद आहे काय याचीही कसून चौकशी करा, असे शिंदे यांनी म्हटले आहे.



**कारवाई करा, अन्यथा आंदोलन**

परप्रांतीय लोकांची योग्य ती चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा अन्यथा या विरोधात आंदोलन उभारले जाईल, असा इशारा आशिष शिंदे यांनी बार्शी तहसीलदार, बार्शी शहर पोलीस निरीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयावर अमेरिकेचे निर्बंध

## ट्रम्प यांची आदेशाला मंजुरी, मालमत्ताही गोठविणार




### सभागृहात केला 'कांगारू' असा उल्लेख

सभागृहाने हे विधेयक मंजूर केल्यानंतर परराष्ट्र व्यवहार समितीचे रिपब्लिकन अध्यक्ष ब्रायन मास्ट म्हणाले की, एक कांगारू न्यायालय आपला मित्र इस्रायलच्या पंतप्रधानांना अटक करू इच्छित आहे, त्यामुळे अमेरिका हा कायदा करीत आहे. विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर काही तासांत ट्रम्प यांनी त्यावर स्वाक्षरी केली. आयसीसीने अफगाणिस्तानातील अमेरिकेच्या आणि पॅलेस्टाईनमधील इस्रायलच्या गुन्हेगारी कारवायांची चौकशी सुरू केल्याने डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात २०२० मध्ये आयसीसीवर निर्बंध लादले होते. तथापि, ज्यो बायडेन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी हे निर्बंध मागे घेतले.

### जगातील १२३ देश सदस्य

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाची सुरुवात १ जुलै २००२ मध्ये झाली. ही संस्था जगभरात घडणारी युद्ध गुन्हे, नरसंहार आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचा तपास करते. ही संस्था १९९८ च्या रोम करारात तयार केलेल्या नियमांच्या आधारे कार्यरत आहे. गुन्हेगारी न्यायालयाचे मुख्यालय हेग येथे आहे. रोम करारांतर्गत ब्रिटन, कॅनडा आणि जपानसह १२३ देश आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाचे सदस्य आहेत.

**वॉशिंग्टन, ७ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयावर (आयसीसी) निर्बंध लादण्याचा आदेश जारी केला. अमेरिकन संसदेच्या कनिष्ठ सभागृहात यासंदर्भातील विधेयक मंजूर झाल्यानंतर ट्रम्प यांनी कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केल्याने आयसीसीवर निर्बंध लावण्यासंदर्भात कायदा लागू करण्यात आला.

ट्रम्प यांनी आदेशात म्हटले की, अमेरिका आणि इस्रायल या न्यायालयाचे सदस्य नाहीत आणि ते त्याला मान्यता सुद्धा देत नाहीत. आयसीसीने आपल्या अधिकारांचा गैरवापर केला आहे. विशिष्ट देशांना फायदा पोहोचविण्यासाठी ते काम करीत आहे. त्यांचे निर्णय आणि आदेशात कुठलीही पारदर्शकता नाही. त्यामुळे आयसीसीमध्ये कार्यरत अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसह तपासात मदत करणाऱ्या प्रत्येकाची मालमत्ता गोठवण्यासह त्यांच्या प्रवासावर बंदी घालण्यात येत आहे. आयसीसीसाठी काम करणाऱ्या अमेरिकेतील सर्वांच्या मालमत्ता जप्त केल्या जातील तसेच त्यांना अमेरिकेत येण्यापासून रोखले जाईल.

अमेरिकन संसदेचे कनिष्ठ सभागृह हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजने आयसीसीवर निर्बंध लादण्याशी संबंधित एक विधेयक मंजूर केले. विधेयकावर मतदानावेळी २४३ खासदारांनी बाजूने, तर १४० खासदारांनी विरोधात मतदान केले होते. (वृत्तसंस्था)

# महाकुंभात तिसऱ्यांदा लागली आग



महाकुंभातील लागलेल्या आगीत बेचिराख झालेले तंबू

**प्रयागराज, ७ फेब्रुवारी**

महाकुंभमध्ये पुन्हा एकदा आग लागल्याची घटना समोर आली आहे. महाकुंभ परिसरातील शंकराचार्य मार्गावरील सेक्टर-१८ मध्ये आग लागली. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी वेळीच दाखल झाल्या आणि आग नियंत्रणात आणली.

सेक्टर ८ मध्ये असलेल्या भ्रष्टाचार विरोधी संघटनेच्या कॅम्पमध्ये अचानक आग लागली. अग्निशमन दल पोहोचेपर्यंत एक तंबू जळून खाक झाला होता. अग्निशमन दल वेळेवर दाखल झाल्यामुळे मोठा अनर्थ टळला. नवप्रयाग पार्किंग लॉटमधील कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग लागली होती. सुदैवाने या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. (वृत्तसंस्था)

# मृत्युदंडाची मागणी करणारी सीबीआयची याचिका मान्य

**आरजी कार प्रकरण**

**ममता सरकारची याचिका फेटाळली**

**कोलकाता, ७ फेब्रुवारी**

आरजी कार रुग्णालयात महिला डॉक्टरची बलात्कारानंतर झालेल्या हत्येच्या प्रकरणातील आरोपी संजय रॉयला मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी करणारी सीबीआयची याचिका शुक्रवारी कोलकाता उच्च न्यायालयाने स्वीकारली. याचवेळी पश्चिम बंगाल सरकारची तीच याचिका फेटाळली.

कनिष्ठ न्यायालयाने आरोपी रॉयला सुनावलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेला आव्हान देत कोलकाता उच्च न्यायालयात पश्चिम बंगाल सरकार व सीबीआयने वेगवेगळी याचिका दाखल केली होती. दोन्ही याचिकांमध्ये आरोपी संजयला मृत्युदंडाची मागणी करण्यात आली होती. न्या. देबांग्सू बसक आणि न्या. मोहम्मद सब्बर रशिदी यांच्या खंडपीठाने यावर आज सुनावणी घेतली. खंडपीठाने स्पष्ट केले की, या प्रकरणात राज्य सरकारला मृत्युदंडाची मागणी करण्याचा कोणताही अधिकार नाही, त्यामुळे त्यांची याचिका रद्दबातल ठरविण्यात येत आहे. प्रकरणाचा तपास सीबीआयकडे असल्याने शिक्षेला आव्हान देण्याचा आणि खटला दाखल करण्याचा अधिकार सुद्धा त्यांनाच आहे. पर्यायाने सीबीआयची आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी करणारी याचिका आम्ही मान्य करीत आहे. (वृत्तसंस्था)

# दिल्लीतील स्टिफन्स कॉलेजसह दोन शाळांना बॉम्बच्या धमक्या

**नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

दिल्ली-एनसीआरमधील एका महाविद्यालय व दोन शाळांना शुक्रवारी ई-मेलद्वारे बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. त्यामुळे पोलिसांनी परिसरात शोध घेण्यासाठी स्फोटक निकामी करणारे पथक व श्वानपथके तैनात केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दिल्ली विद्यापीठाचा घटक असलेल्या स्टिफन्स कॉलेज, मयूर विहारमधील अहलकॉन इंटरनॅशनल स्कूल व नोएडामधील शिव नाडर स्कूलला धमकीचे ई-मेल पाठविण्यात आले होते.

तथापि, पोलिस उपायुक्त (नोएडा) राम बदन सिंह यांनी तपासणीनंतर शिव नाडर स्कूलला पाठविलेला धमकीचा ई-मेल खोटा असल्याचे स्पष्ट केले.

सकाळी ७.४२ वाजता सेंट स्टिफन्स कॉलेजला ई-मेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाली. आमचे बॉम्ब व श्वानपथक संपूर्ण परिसराची तपासणी करीत आहेत, असे दिल्ली पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.


मयूर विहार फेज-१ मधील अहलकॉन इंटरनॅशनल स्कूलच्या परिसरात बॉम्ब असल्याच्या धमकीचा ई-मेल आल्याची माहिती शाळेच्या अधिकाऱ्यांनी सकाळी ६.४० च्या सुमारास पोलिसांना दिली, असे पूर्व दिल्ली जिल्ह्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले.




दिल्लीच्या स्टिफन्स कॉलेज परिसरात बॉम्बचा शोध घेताना पोलिस पथक

शिव नाडर शाळेतून बॉम्बच्या धमकीची माहिती पोलिसांना मिळाली. श्वानपथके, बॉम्ब निकामी करणारे पथके, अग्निशमन दल व पोलिस पथके शाळेच्या परिसरात पोहोचली व तपासणी केली, परंतु काहीही आढळले नाही, असे पोलिस उपायुक्त (नोएडा) सिंह म्हणाले. (वृत्तसंस्था)



## किन्नर महामंडलेश्वरांचे जटा पार्लर

इंदूरच्या एलिझा बाई या देशातील पहिल्या ट्रान्सजेंडर आहेत, ज्या एक व्यावसायिक जटा कलाकार आहेत. संगम शहरात त्यांचे एक जटा पार्लर आहे, जिथे आतापर्यंत असंख्य संत आणि ऋषींनी त्यांच्या जटा सजवल्या आहेत. याशिवाय, येथे अनेक तरुणांनी कृत्रिम जटा घातल्या आहेत. एलिझा म्हणतात की, हर्षा रिचारियासारख्या अनेक प्रसिद्ध चेहऱ्यांना कृत्रिम जटा लावल्या आहेत. हर्षाने नुकतेच माझ्या पार्लरमध्ये तिच्या ड्रेडलॉकवर उपचार केले. कृत्रिम ड्रेडलॉक बसवण्यासाठी तरुण मोठ्या संख्येने येत आहेत.

**नैराश्यामुळे मुंबई सोडली**

उत्तरप्रदेशच्या जौनपूरची रहिवासी असलेली एलिझा यांनी स्वप्नांच्या शहरातून शिक्षण घेतले आहे. त्यांचे वडील मध्यमवर्गीय व्यापारी आहेत आणि आई गृहिणी आहे. एलिझा म्हणतात, माझे आयुष्य कधीच सामान्य नव्हते. तृतीयपंथी असल्याने मला खूप अडचणी आल्या, पण मी माझे धाडस कमी होऊ दिले नाही. तसे मी माझ्या वडिलोपार्जित गावी फक्त एकदाच गेले आहे. मी अभ्यासात चांगले होते, म्हणून मी सॉफ्टवेअर इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले. मुंबईत एका बहुराष्ट्रीय कंपनीत काम करीत होते. कंपनीत चांगले पॅकेज मिळत होते, पण थर्ड जेंडर असल्याने मला लोकांच्या वाईट कमेंट्सना सामोरे जावे लागत होते. मी नैराश्यात गेले.

यानंतर मी नोकरी सोडली आणि उज्जैनला आले. येथे माझी भेट किन्नर आखाड्याच्या आचार्य महामंडलेश्वर डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांच्याशी झाली. गुरू दीक्षेनंतर मी किन्नर आखाड्याचा एक भाग बनले.


मी वाराणसीच्या अनेक मंदिरांमध्ये आणि घाटांवर गेले. अनेक संत आणि ऋषींना भेटले. मी पाहिले की, अनेक ऋषी आणि संतांनी केस लांब वाढवले आहेत, पण ते ते सांभाळत नाहीत. ऋषी आणि संत त्यांचे केस काळ्या धाग्याने बांधतात. कसे तरी तपश्वर्या पूर्ण करतात. जटा केस वाढवणे सामान्य माणसाच्या आवाक्यात नाही. येथून विचार पुढे गेला आणि हे माझ्या कारकीर्दीचा एक भाग बनले.

# महाकुंभात पुन्हा जमली गर्दी, चार किमी लांब जाम

शुक्रवारी संगमस्थळी भाविकांची गर्दी वाढल्याचे दिसून आले. शनिवार आणि रविवारी गर्दी आणखी वाढू शकते. हे पाहून प्रशासन पुन्हा सतर्क झाले असून, गर्दीवर लक्ष ठेवले जात आहे.

संगमावर भाविकांना थांबण्याची परवानगी नाही. एकाच ठिकाणी गर्दी जमू नये म्हणून पोलिस आधी स्नान केलेल्या लोकांना तिथून पाठवत आहेत. प्रयागराज शहरात वाहने प्रवेश करीत आहेत. मात्र, गर्दीनुसार पोलिस योजना बदलत आहेत.

महाकुंभातील बहुतेक आखाड्यांनी आता सामान बांधायला सुरुवात केली आहे. म्हणूनच भाविकांना आखाड्यांमध्ये प्रवेश दिला जात नाही. प्रशासनाच्या मते, १३ जानेवारीपासून ४० कोटी भाविकांनी महाकुंभात स्नान केले आहे. हा मेळा आणखी १९ दिवस सुरू राहील.



प्रयागराज येथील महाकुंभात स्नान करण्यासाठी भाविकांची उसळलेली गर्दी

माघी पौर्णिमेसाठी निमलष्करी दलांनी घेतली जबाबदारी

माघी पौर्णिमेनिमित्त महाकुंभात भाविकांची गर्दी लक्षात घेता, पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुरक्षित स्नान सुनिश्चित करण्यासाठी एक योजना आखली आहे.

या अंतर्गत प्रमुख घाटांवर, त्रिवेणी संगम येथे निमलष्करी दल तैनात केले जातील. याशिवाय महत्त्वाच्या ठिकाणी चौकात पोलिसांसह पीएसी जवानही तैनात केले जातील. हे पूल फक्त पादचाऱ्यांसाठी खुले असतील. शहरात मार्ग बदल लागू केले जातील, शटल बसेस चालवल्या जातील. सुरक्षितता लक्षात घेऊन बॅरिकेडिंगमध्ये आणखी सुधारणा केली जाईल.

# जगातील सर्वांत मोठी स्वच्छता मोहीम

महाकुंभ हा केवळ एक उत्सव नाही, तर ती मोठी जबाबदारी आहे. संगम नदीच्या काठावर तात्पुरते शहर उभारणे आणि ते नियमितपणे स्वच्छ ठेवणे सोपे नाही. अशा परिस्थितीत या मेळ्यात येणाऱ्या लोकांना स्वच्छ वातावरण मिळण्यासाठी राहण्याची व्यवस्था करणे सर्वांत महत्त्वाचे बनते.

दुसरीकडे, लाखो लोकांच्या सततच्या हालचाली आणि वास्तव्यामध्ये स्वच्छता राखण्याचे आव्हानदेखील आहे. महाकुंभात या आव्हानाला सक्षमपणे तोंड दिले जात आहे. ४००० हेक्टरमध्ये पसरलेल्या जगातील सर्वांत मोठ्या धार्मिक कार्यक्रमात दररोज ६०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. महाकुंभाला दररोज लाखो भाविक येत आहेत. अर्थात्, जिथे एवढी मोठी वर्दळ असेल, तिथे घाणही पसरेल. भाविकांच्या सोयीसाठी जत्रेच्या परिसरात १.५० लाख शौचालये आणि ४ लाखांहून अधिक कचराकुंड्या आहेत. त्यांच्या स्वच्छतेसाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची ८०० पथके तयार करण्यात आली आहेत. ही सर्वांत मोठी स्वच्छता मोहीम आहे. स्वच्छतेसाठी एका पथकात १२ लोक असतात, एक जोडीदार असतो, जो गटाचा नेता म्हणून काम करतो. त्याची एक महिला जोडीदार आहे. उर्वरित १० जण स्वच्छता कर्मचारी आहेत. एक तृतीयांश कर्मचाऱ्यांना रात्रीच्या ड्युटीवर तैनात करण्यात आले आहे. ही शिफ्ट रात्री ८ ते पहाटे ४ पर्यंत असते. संगम, ऐरावत, नाग वासुकी आणि अरैल यासारख्या भागात आणखी एक आव्हान म्हणजे, जेव्हा इतक्या मोठ्या संख्येने लोक जमतात, तेव्हा स्वच्छता करणे अधिक कठीण होते. अशा परिस्थितीत प्रशासनाने रात्रीच्या वेळी या भागात स्वच्छता कर्मचाऱ्यांची ड्युटी वाढवली आहे, कारण त्यावेळी गर्दी कमी असते. यामुळे रस्ते स्वच्छ करणे सोपे होते.



**रात्री केली जाते स्वच्छता**

स्वच्छतेसाठी महानगरपालिकेकडून १००-१५० स्वच्छता कर्मचारी जोडले गेले आहेत. याशिवाय, संगम नाक्यावर नगरविकास विभागातील सहा कार्यकारी अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. रस्त्यावर झाडू मारणे आणि लाइनर बॅगा बदलणे हे बहुतेक रात्री केले जाते. संपूर्ण मेळा २५ क्षेत्रांमध्ये विभागला गेला आहे. प्रत्येक क्षेत्रात काही मंडळे असतात, जी मंडळ प्रभारी हाताळतात.

**आधुनिक यंत्रांचा वापर**

महाकुंभात दररोज सुमारे ६०० मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. तो काढण्यासाठी आणि स्वच्छ करण्यासाठी अनेक मशीन्सचा वापर केला जात आहे. यात कॉम्पॅक्टर, टिप्पर, डीसीएम, ट्रॅक्टर-ट्रॉली यासारख्या वाहनांचा समावेश आहे. या कामासाठी १२० टिप्पर आणि ४० कॉम्पॅक्टर तैनात करण्यात आले आहेत. सफाई कामगार लाइनर बॅगमधून कचरा बाहेर काढतात आणि टिप्परमध्ये टाकतात. तिथून ते कॉम्पॅक्टरवर हलवले जाते. नंतर ते नैनी येथील बसवार येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात पाठवले जाते.

**सफाई कामगारांसाठी विमा, निवास व्यवस्था**

स्वच्छता कामगारांच्या निवास व्यवस्थेसोबतच विविध प्रकारचे विमा देखील प्रदान करण्यात आले आहेत. त्यांच्या मुलांसाठी अंगणवाडी शाळांच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय, पुरेशी वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना एक किटदेखील देण्यात आली आहे, त्यात कपडे, बूट, टोप्या, साफसफाईची उपकरणे आहेत.

## १२ पर्यंत सर्व शाळा ऑनलाईन

माघी पौर्णिमेपूर्वी भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता, प्रयागराजमधील शिक्षण मंडळांच्या सर्व माध्यमिक शाळा ७ ते १२ फेब्रुवारी दरम्यान शारीरिक वर्ग बंद करून ऑनलाईन शिक्षणाकडे वळतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रयागराज जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी जिल्हा शाळा निरीक्षकांना दिलेल्या आदेशानुसार, या काळात विद्यार्थ्यांना प्रवास करताना होणारी गैरसोय लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

निर्देशानुसार, सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वर्ग सुरू राहतील. शिक्षकांना चालू असलेल्या प्रात्यक्षिक आणि गृह परीक्षा घेण्यासाठी वेळापत्रकानुसार शाळांमध्ये हजर राहावे लागेल. माघी पौर्णिमा, जी विशेष स्नानाची तारीख मानली जाते, १२ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाईल. यापूर्वी, शहरात येणाऱ्या भाविकांच्या संख्येत वाढ झाल्याने वाराणसी जिल्हा प्रशासनाने शहरी भागातील शाळा बंद करण्याचा आदेश दिला होता. एका अधिकाऱ्याने सांगितले की, प्रशासनाने शाळांना आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शनिवारपर्यंत ऑनलाईन वर्ग घेण्यास सांगितले.



## चित्रपट वार्ता

### अमेरिकी चित्रपट महोत्सवात झळकली संस्कृती




**न्यू यॉर्क :** सँटो डोम्निगो यूएसए फिल्म फेस्टीवलमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी संस्कृती बालगुडे पहिली मराठी अभिनेत्री ठरली आहे. संस्कृती बालगुडेच्या 'करेज' या इंग्रजी चित्रपटाचे सँटो डोम्निगो फिल्म फेस्टीवलमध्ये विशेष कौतुक करण्यात आले. काही दिवसांपूर्वी संस्कृतीच्या पहिल्या-वहिल्या इंग्रजी चित्रपट करेज सँटो डोम्निगो फिल्म फेस्टीवलमध्ये स्क्रिनिंग पार पडले आणि या चित्रपटाने प्रेक्षकांना मोहित केले. तिने दमदार अभिनयाने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रेक्षकांना भुरळ घातली. येणाऱ्या काळात संस्कृती अनेक नवनवीन प्रोजेक्ट्समध्ये दिसणार आहे.

### फॅशन डिझायनरचे दीपिका कक्कडवर आरोप



**मुंबई :** सध्या सेलिब्रिटी मास्टर शेफमध्ये दिसणाऱ्या अभिनेत्री दीपिका कक्कडवर एका फॅशन डिझायनरने गंभीर आरोप केले आहेत. सानिया असे या फॅशन डिझायनरचे नाव आहे. तिने सांगितले की, ती काही काळापासून दीपिकासाठी काम करीत होती; पण सेलिब्रिटी मास्टर शेफ शो मिळाल्यानंतर अभिनेत्रीने अचानक तिला नोकरीवरून काढून टाकले आणि तिचा पगारही दिला नाही. फॅशन डिझायनरने यूट्यूबवर एक व्हिडीओ प्रसिद्ध केला, ज्यात तिने सांगितले की, ती दिल्लीत फॅशन डिझायनिंग करीत असताना तिला दीपिकाच्या नवीन फॅशन ब्रॅण्ड लेबल डीकेआयकडून नोकरीची ऑफर मिळाली. दीपिकाने स्वतः तिला मेसेज करून मुंबईत तिच्यासाठी काम करण्यास सांगितले. सुरुवातीला सानियाला मुंबईत राहण्यासाठी जागा नसल्याने दीपिकाने तिला सांगितले की, ती तिच्या घराच्या तळमजल्यावर राहू शकते. एक टीम तयार केल्यानंतर अचानक दीपिका तिच्याशी तुसडेपणाने वागू लागली.

### 'द डिप्लोमॅट'चा टीझर आला समोर



**मुंबई :** 'पठाण' व 'वेदा'नंतर अभिनेता जॉन अब्राहम लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जॉनचा आगामी चित्रपट 'द डिप्लोमॅट'चा टीझर समोर आला आहे. जवळपास एक मिनिटाच्या टीझरची सुरुवात परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्या एका क्लिपने होते, ज्यात ते म्हणतात की, जगातील सर्वांत मोठे डिप्लोमॅट एक श्रीकृष्ण आणि एक हनुमानजी होते. यानंतर पडद्यावर जॉन अब्राहमची एंट्री होते. या चित्रपटात जॉन मुख्य भूमिकेत आहे, त्याने जेपी सिंह यांची भूमिका केली आहे. टीझरमध्ये एक महिला बुरखा घालून स्वतःला भारतीय नागरिक म्हणताना दिसते. नंतर पुढच्याच क्षणी जॉन अब्राहम तिची चौकशी करताना दिसतो. जॉन तिला खरे बोलायला सांगतो. त्यानंतर जॉनच्या मागावर आयएसआयचे लोक असल्याचे दाखवण्यात आले आहे. त्यावर तो म्हणतो, ये पाकिस्तान है बेटा, आदमी हो या घोड़ा, सीधा नहीं चलता है, हमेशा ढाई कदम.

## अग्रलेख...

# बांगलादेशातील चिंताजनक परिस्थिती

बांगलादेशातील परिस्थिती पूर्ववत्‌ होत आहे, असे वाटत असतानाच बुधवारी रात्री तेथे पुन्हा हिंसाचार उफाळून आला. जमावाने बंगबंधू म्हणून ओळखले जाणारे बांगलादेशचे संस्थापक राष्ट्रपती शेख मुजिबूर रहमान यांचे स्मारक असलेले निवासस्थान बुलडोझरने उडवून दिले. एवढेच नाही, तर सध्या भारतात निर्वासिताचे जीवन जगत असलेल्या बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांचे 'सुधा सदन' हे निवासस्थान तसेच त्यांच्या पक्षाचे कार्यालयही जाळून टाकले. बांगलादेशातील हा घटनाक्रम अराजकाच्या दिशेने जाणारा आहे. शेख हसीना या आपल्या पक्षाच्या युवा आघाडीच्या एका कार्यक्रमाला आभासी पद्धतीने संबोधित करणार होत्या. त्यामुळे शेख हसीना यांच्या राजवटीविरुद्ध जाणीवपूर्वक भडकवण्यात आलेल्या जमावाने बुलडोझर नेत ही कारवाई केली. या घटनेनंतरही शेख हसीना यांनी बुलडोझर चालवून इतिहास मिटवता येत नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली; जी अतिशय मार्मिक म्हणावी लागेल. १९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती आंदोलनाच्या वेळीही आमचे निवासस्थान लुटले होते, पण त्यावेळी त्यांनी निवासस्थान उद्ध्वस्त केले नव्हते; ते पेटवूनही दिले नव्हते, असे त्यांनी म्हटले. भारत सरकारने या घटनेबाबत आपली तीव्र नाराजी बांगलादेशातील अंतरिम सरकारकडे व्यक्त केली. बांगलादेशातील या घटनाक्रमामुळे भारताने चिंतित होणे स्वाभाविक आहे. कारण बांगलादेशात हिंदूंवर तसेच त्यांच्या मंदिरांवर हल्ले करण्यात आले, त्यांची घरे पेटवून देण्यात आली. बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या या अन्याय आणि □अत्याचाराविरुद्ध भारताने आवाज उठवला. हिंदूंना तसेच हिंदूंच्या मंदिरांना संरक्षण देण्याची मागणी तेथील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्याकडे केली होती. त्याची दखलही त्यांना घ्यावी लागली. शेजारच्या घरात आग लागली, तर त्या आगीचे चटके आजूबाजूच्या घरांना बसतच असतात. भारताची स्थिती आज नेमकी अशीच झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेश अस्थिर झाला आहे. मुळात बांगलादेशात काय सुरू आहे, तेथील लोकांना नेमके काय अपेक्षित आहे, हे कळायला मार्ग नाही. सुरुवातीला बांगलादेशातील नागरिकांचा रोष हा शेख हसीना यांच्या राजवटीवर आहे, असे वाटत होते. पण त्या पदच्युत झाल्यानंतर तसेच बांगलादेशात अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतरही बांगलादेशातील परिस्थिती नियंत्रणात येण्याचे नाव घेत नाही; उलट ती दिवसेंदिवस जास्तच ढासळत चालली आहे. शब्दशः अराजकाची परिस्थिती तेथे निर्माण झाली आहे. १९७१ नंतर पुन्हा एकदा बांगलादेशात अस्थिरता आणि अराजक निर्माण झाले आहे.

भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली आणि पाकिस्तानची फाळणी होत बांगलादेश अस्तित्वात आला, हा पाकिस्तानवर नियतीने उगवलेला सूड म्हटला पाहिजे. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर पाकिस्तानात पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान अशी विभागणी झाली. पश्चिम पाकिस्तानच्या तुलनेत पूर्व पाकिस्तानातील जनतेला भेदभावाची वागणूक मिळू लागली. १९७० मध्ये पाकिस्तानात झालेल्या निवडणुकीत पूर्व पाकिस्तान भागात शेख मुजिबूर रहमान यांनी १६९ पैकी १६७ जागा जिंकल्या. ३१३ सदस्यीय पाकिस्तानी संसदेत सरकार बनवण्यासाठी आवश्यक असलेले बहुमत रहमान यांच्या पक्षाला मिळाले. मात्र, पश्चिम पाकिस्तानातील जनतेला विशेषतः लष्कराला हे मान्य नव्हते. शेख मुजिबूर रहमान यांना सत्तेपासून वंचित ठेवण्याच्या पश्चिम पाकिस्तानच्या कृतीमुळे पूर्व पाकिस्तानात संतप्त भावना निर्माण झाली, लोक रस्त्यावर उतरले. हा जनक्षोभ चिरडून टाकण्यासाठी पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानातील जनतेवर लष्करी कारवाई सुरू केली. तेव्हा पूर्व पाकिस्तानातील जनतेच्या मदतीसाठी भारत धावून गेला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लष्करी कारवाई करत पाकिस्तानचे दोन तुकडे केले आणि नव्या बांगलादेशची निर्मिती केली. बांगलादेशच्या मदतीला भारत तेव्हाही धावून गेला आणि आताही धावून जात आहे. शेख हसीना यांना भारताने आपल्या देशात आश्रय दिला. त्याचे कारण या घटनाक्रमात आहे. मात्र, आज बांगलादेशातील काही गट आपला खरा मित्रपक्ष असलेल्या भारताला दूर लोटत पुन्हा एकदा पाकिस्तानच्या मांडीवर बसण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्या पाकिस्तानने बांगलादेशला जगाच्या नकाशावरून मिटविण्याचा प्रयत्न केला, तोच पाकिस्तान आज बांगलादेशातील अंतरिम सरकारला जवळचा वाटू लागला, हे बांगलादेशातील जनतेचे दुर्दैव म्हटले पाहिजे. बांगलादेशच्या दीर्घकालीन हिताचा विचार केला तर त्याची कृती आत्मघातकी आहे. पण बांगलादेशात आता विवेकी राज्यकर्ते उरले नाहीत. आपले हित कशात आहे, ते त्यांना कळत नाही, असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते. मोहम्मद युनूस यांना शांततेसाठी नोबल पुरस्कार मिळाला होता, पण तेच युनूस आज बांगलादेशात शांतता प्रस्थापित करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. अंतरिम सरकारचे ते प्रमुख असले, तरी त्यांची स्थिती कळसूत्री बाहुलीसारखी झाली आहे. अंतरिम सरकारमध्ये जमात-ए-इस्लामीचे वर्चस्व आहे. पूर्व पाकिस्तानात तेव्हा एक मोठा वर्ग असा होता, ज्याला बांगलादेशची निर्मिती मान्य नव्हती, त्यांचा ओढा पाकिस्तानात राहण्याकडे होता. अशा लोकांचे नेतृत्व जमात-ए-इस्लामी तेव्हाही करीत होती आणि आताही करीत आहे. शेख हसीना सरकारविरुद्ध विद्यार्थ्यांचे जे आंदोलन झाले, त्याला पाकिस्तानचा पाठिंबा असलेल्या जमात-ए-इस्लामीची फूस होती, असे म्हणायला हरकत नाही. जमात-ए-इस्लामीच्या बांगलादेश मुक्ती संग्रामातील सहभागाच्या चौकशीचा आदेश शेख हसीना यांनी आपल्या कार्यकाळात दिला होता. जमातच्या काही नेत्यांना फासावरही लटकवले होते. त्यामुळे जमात-ए-इस्लामीचा त्यांच्यावर राग राहणे स्वाभाविक आहे.

बांगलादेशच्या मुक्ती संग्रामात सहभाग घेतलेल्यांच्या कुटुंबीयांना सरकारी नोकरीत आरक्षण देण्याच्या मुद्यावरून बांगलादेशात असंतोष उफाळून आला. त्याची परिणती सध्याच्या हाताबाहेर गेलेल्या परिस्थितीत झाली. बांगलादेशातील उद्योगबंदे बंद पडले आहेत, हजारो लोक बेरोजगार झाले आहेत, महागाई भडकली आहे, लोकांना खायला मिळत नाही; मात्र तरीसुद्धा तेथील राज्यकर्त्यांचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. आज बांगलादेशात जे काही सुरू आहे, ते तेथील समंजस आणि विचारी जनतेला मान्य असेलच असे नाही. पण आज बांगलादेशातच नाही तर जगाच्या सर्व भागांत विचारावर उन्मादी मानसिकतेने ताबा मिळविला आहे. तात्कालिक लाभावर नजर ठेवत देशाच्या दीर्घकालीन नुकसानीचा पाया घातला जात आहे, पण त्यांची खंत कोणालाच वाटत नाही. बांगलादेशमधील परिस्थिती नियंत्रणात आणणे तेथील अंतरिम सरकारला शक्य नाही. जमावी उन्माद आणि भीडतंत्रासमोर पोलिस तर दूरच; तेथील लष्करही अपयशी ठरल्यासारखे दिसत आहे. त्या देशात अशी परिस्थिती दीर्घकाळ राहणे कोणाला विशेषतः भारताला परवडण्यासारखे नाही. त्यामुळे शेख हसीनासारख्या जनतेत लोकप्रिय असलेल्या नेत्याला तेथील अंतरिम सरकारने त्यांच्याविरुद्धचे गुन्हे मागे घेत परत बांगलादेशात बोलवायला पाहिजे. लवकरात लवकर निवडणुका घेत तेथे लोकनिर्वाचित सरकार स्थापन करणे, हाच या समस्येवरचा उपाय वाटतो. बांगलादेश धगधगत राहावा, असे पाकिस्तानला वाटत असले, तरी ते फार काळ शक्य होणार नाही. बांगलादेशातील परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी भारताने एकदा हस्तक्षेप केला होता, यावेळी पुन्हा एकदा भारताला हस्तक्षेप करावा लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कारण भारतासमोर खरे आव्हान बांगलादेशचे नाही तर पाकिस्तानचे आहे. बांगलादेशच्या काठीने भारताने पाकिस्तानरूपी साप पुन्हा एकदा मारायला हरकत नाही.


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# संजय राऊतांनी असा कोणता मंत्र फुंकला?

पूर्वाश्रमीचे पत्रकार आणि सध्याचे उबाठा गटाचे नेते संजय राऊत हे आपल्या बेताल वक्तव्यांसाठी प्रसिद्ध आहेत. प्रबोधनकार आणि बाळासाहेब ठाकरे यांनी ठाकरी भाषा निर्माण केली; मात्र बाळासाहेबांनंतर तो दरारा, ती ऐट कुणालाच निर्माण करता आली नाही. अधूनमधून राज ठाकरे बाळासाहेबांची आठवण करून देत असतात. पण राज हे प्रत्येक भाषणात आपली भूमिका बदलत असतात. असो. मुद्दा असा की 'ठाकरे शैली' असे शब्द वापरून काहीही बडबडण्याचा परवाना राऊतांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून मिळविलेला दिसतो आहे. मुळात राऊतांच्या तोंडी ठाकरे भाषा शोभत नाही. पण राऊत बातमी निर्माण करतात, यामुळे त्यांचं महत्त्व व कौतुक 'चाय-बिस्कुट' पत्रकारांना फार आहे. सध्या राऊतांचे 'काळी जादू'बद्दलचे विधान कोरोना व्हायरसप्रमाणे पसरत आहे आणि महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या या काळ्या जादूची चर्चा सुरू आहे. संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंवर निशाणा साधण्यासाठी नव्या वादाला जन्म दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शपथ घेतल्यानंतरही वर्षा बंगल्यावर राहायला गेले नाहीत. याचं कारण वर्षा बंगल्यावर काळी जादू केली आहे, तिथे देवीला बळी दिलेल्या रेड्याचे शिंग पुरले आहेत, असा आरोप राऊतांनी केला आहे.

संजय राऊतांच्या या विधानावरून राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. शिंदेंच्या शिवसेनेतूनही राऊतांवर पलटवार झाले. त्यांच्या या वक्तव्यावर रामदास कदम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, 'उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, ज्यावेळी उद्धव ठाकरे यांनी 'वर्षा' बंगला सोडला तेव्हा तिथे टोपलीभर निंबू मिळाले. काळी जादू काय ते त्यांना विचारलं पाहिजे. त्यांना त्याचा अनुभव जास्त असेल. म्हणून त्यांच्या डोक्यात हे असं असावं.' गंमत म्हणजे बातमीदारांना चांगलाच मुद्दा मिळाल्याने यावर बरीच चर्चा रंगली. गिरीश कुबेर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मुलाखत घेतली तेव्हा त्यांना हाच प्रश्न केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले, 'काही बाबतीत मीडिया हा वेड्यांचा बाजार झाला आहे. आज मी एका चॅनलवर बघत होतो वर्षा पाडणार? अरे काय वेड्यांचा बाजार आहे? ही कोणाच्या घरची मालमत्ता आहे काय?' मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण देत सांगितलं की, त्यांची मुलगी दहावीला आहे. तिने म्हटलं की परीक्षा झाल्यावर शिफ्ट होऊया. त्यामुळे मुख्यमंत्री वर्षावर राहायला गेले नाहीत. पण राऊतांच्या एका विधानाने किती मूर्खासारख्या बातम्या पेरल्या गेल्या?



संजय राऊत उद्धव ठाकरेंचे खास आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले होते तेव्हा राऊत चाणक्य असल्यासारखे वावरत होते आणि रोज सकाळचा चहा घेताना 'चाय-बिस्कुट' पत्रकारांना आमंत्रण देऊन भयंकर, असंस्कृत, महाराष्ट्राच्या पुरोगामी प्रतिमेला डाग लावणारे, गलिच्छ वक्तव्य करत होते. महिलांबद्दलही ते वाईट बोलायचे. प्रबोधनकार आणि बाळासाहेबांचा वारसा सांगणाऱ्या लोकांकडून अशा गोष्टी होत असतील तर त्यांनी आपल्या घरातले आरसे स्वच्छ करून घ्यायला हवेत. आरसे नसतील तर आरसे बसवले पाहिजेत. कारण राजकारण म्हणजे बेताल बडबड नव्हे. महाराष्ट्राच्या राजकारणाला किती मोठा वारसा लाभलेला आहे. टिळक, सावरकर, आंबेडकर, रानडे, गोखले इत्यादी महान राजकीय नेत्यांनी सुसंस्कृत राजकारणाचा पायंडा पाडून दिला आहे. पण राऊतांसारखे लोक औरंगजेबाचा आदर्श समोर का ठेवतात, हे कळत नाही. औरंगजेब म्हणजे असत्य, गलिच्छपणा, शिवराळपणा इत्यादी. ही काही महाराष्ट्राची संस्कृती नव्हे. राजकारणात शत्रू नसतो, प्रतिस्पर्धी असतो, असं सावरकर म्हणायचे. दादरच्या शिवसेना भवनापासून सावरकर सदन व सावरकर स्मारक हाकेच्या अंतरावर आहे. कधीतरी राऊतांनी तिथे जाऊन डोकं टेकावं. चैत्य भूमीत जाऊन बाबासाहेबांसमोर नरमस्तक व्हावं. पण भिडे गुरुजींसारख्या ऋषितुल्य माणसाला केवळ स्वार्थी राजकारणापोटी दूर करणाऱ्या लोकांकडून आपण काय अपेक्षा करणार आहोत.

संजय राऊत बेतालपणे काळी जादूबद्दल बोलून गेले आणि राज्यभर याबाबत चर्चा रंगली. देशभरात आणि जगभरात महाराष्ट्राची अशी प्रतिमा जात राहिली तर किती वाईट आहे हे! महाराष्ट्र हे साधू-संतांचे राज्य आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, हिंदुसंघटक सावरकर आणि महामानव डॉ. आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रातल्या नेत्यांनी सभ्य वर्तन केलंच पाहिजे. असभ्य वर्तन करणाऱ्या नेत्याला महाराष्ट्रीय म्हणता येणार नाही. कारण महाराष्ट्राची परंपरा समृद्ध आहे. या भूमीत जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या माउलींचा जन्म झाला. अशा भूमीत बेताल बडबड करणाऱ्यांचे महत्त्व ते काय? पण घोर कलियुग असल्याने आणि मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात त्याप्रमाणे मीडिया वेड्यांचा बाजार झाल्याने असल्या विक्षिप्त गोष्टी इथे पोसल्या जातात. राऊतांना काळ्या जादूचे फार आकर्षण आहे, त्यामुळे एक प्रश्न त्यांना विचारावासा वाटतो. उद्धव ठाकरे हे ठाकरे घराण्याचे सुपुत्र आहेत. त्यांचा वारसा खूप मोठा आहे, भव्य आणि दिव्य आहे. त्यांच्याकडे वारसा हक्काने बऱ्याच गोष्टी आल्या होत्या. केवळ पैसाच नव्हे तर वैचारिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक असा वारसा त्यांना काहीही न करता मिळाला. आपल्याकडे अतिशय सामान्य घरातली मुलं मोठी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील सामान्य घरात जन्माला आले. पण स्वकर्तृत्वाने ते आज तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आले आहेत. त्याउलट उद्धव ठाकरे हे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले, असेच म्हणावे लागेल. मग संजय राऊत ठाकरेंचे खास असतानाही उद्धव ठाकरेंचे सगळे वैचारिक, राजकीय वैभव का हरपले गेले? संजय राऊतांनी असा कोणता मंत्र फुंकला की राजाचा रंक झाला?

प्रबोधनकार ठाकरे आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना वंदन!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# कुटुंब संस्कारांवर मोबाईल वरचढ ठरू नये

जग चहुबाजूंनी होत असलेल्या भौतिक प्रगतीमुळे गतिमान झाले आहे. प्रवास किती दिवसांचा याऐवजी आता किती तासांचा अशी विचारणा अगदी विदेशवारी असेल तरी होते. काही तासांतच जगातील कुठल्याही देशात पोहोचणे शक्य होते इतकी दळणवळण सुविधा अद्ययावत आहे. एवढेच नव्हे, तर शेकडो मैलांवर असलेल्या आप्तांसोबत संवाद साधणारा दूरध्वनीचा १००-१२५ वर्षांचा इतिहास मागे पडून केव्हा भ्रमणध्वनी अर्थात मोबाईल हातात आला ते या प्रगतीच्या गतीत कळलेच नाही. मोबाईलमुळे चालता-फिरता होणाऱ्या संवादाचे अप्रूप संपण्यापूर्वीच अशक्य वाटावा, असा दृश्यसंवाद सहज झाला आहे. सोबतच समाजमाध्यम नावाचे मोठे आभासी जग या क्रांतीमुळे जन्माला आले. परिवर्तन सृष्टीचा नियमच; त्यातही हे परिवर्तन तर प्रगतीची नवनवीन द्वारे खुले करणारे असल्याने त्याचे स्वागतच केले पाहिजे. पण या बदलाचे समाज जीवनावर होणाऱ्या चांगल्या आणि वाईट बाबींचे समीक्षण करण्याची वेळ आता आली आहे. आवश्यक सुविधांसाठी मोबाईल अनेकदा गरजेचा असतो. पण जर मोबाईल मिळाला नाही तर जीवन व्यर्थ आहे, असा समज करून आत्महत्या करण्याइतकी निकड मोबाईलची आहे का, असा प्रश्न पडावा अशा घटना सभोवताल घडत आहेत.

नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात असलेले मीनकी हे छोटेसे गाव. या गावात पैलवार कुटुंबीय राहतात. कुटुंबातील ओंकार हा लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे आश्रमशाळेत शिक्षण घेत होता. दहावीत असलेल्या ओंकारची बोर्डाची परीक्षा सुरू होणार होती. त्या आधी त्याने गावी येऊन वडिलांकडे मोबाईलची मागणी केली. शेतीवर उदरनिर्वाह असलेल्या वडिलांना लगेच मोबाईल घेऊन देणे शक्य नव्हते. त्यांनी पैसे नसल्याने आता मोबाईल घेऊ शकत नाही, असे सांगितले. नाराज होऊन ओंकार घरातून बाहेर पडला. दुसऱ्या दिवशी पहाटे वडील राजेंद्र शेती कामासाठी शेतावर पोहोचताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. लाडक्या ओंकारने गळफास लावून आत्महत्या केली होती. हे दुःख असह्य झालेल्या राजेंद्र यांनी ओंकारचे कलेवर खाली काढले आणि मुलाने आत्महत्या केलेल्या दोराने स्वतः गळफास लावून जीवन संपविले. हृदय पिळवटून टाकणाऱ्या या घटनेनंतर मन सुन्न झाले. ही आणि अशा प्रकारच्या म्हणजेच मोबाईल न मिळाल्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे दिसून येते. कधी नववी, कधी पाचवी तर कधी नुकताच तारुण्यात पदार्पण करणारे अनेक जण केवळ मोबाईल न मिळाल्याने मृत्यूला कवटाळतात. खरंच मोबाईल इतका जीवनावश्यक आहे का? तरुण आणि किशोरवयीन मुलांमध्ये दिसून येणारी ही समस्या नेमकी का उद्‌भवते, याचा विचार करून त्याचे निरसन करणे आवश्यक आहे. आजकाल सोशल मीड्िया आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमुळे बालवयापासूनच मुलांना ऑनलाईन राहण्याचा छंद जडला आहे. समाजमाध्यमातून लाईक, कमेंट, फॉलोवर आदी बाबी या वयातील मुलांना प्रतिष्ठेच्या वाटतात. मग आभासी असली, तरी ही 'ऑनलाईन प्रतिष्ठा' मोबाईल न मिळाल्यास धोक्यात आल्यासारखी वाटून त्यातूनच काही जण टोकाचा निर्णय घेतात, असे मानसोपचार तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पण मुळात भारतीय जीवन पद्धती, कुटुंब व्यवस्था, कुटुंब संस्कार ही बलस्थाने असताना उद्‌भवणारी ही समस्या अधिक क्लेशदायी आहे.

भौतिक प्रगतीच्या गतीमध्ये कुटुंबातून सहज होणारा संस्कार हरवत असल्याची चर्चा नेहमीच होते. यात संयुक्त कुटुंब पद्धतीपासून त्रिकोणी कुटुंबापर्यंतच्या प्रवासात व्यक्तिमत्त्व जडणघडण, जीवनमूल्यांची शिकवण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मनमोकळा होणारा संवाद जवळपास थांबला असल्याची खंत अनेक जण व्यक्त करतात. भौतिक प्रगतीच्या धुंदीत जीवनमूल्यांची शिकवण, संस्कारांची रुजवण आणि कुटुंबातील संवाद याच्या दुर्लक्षाचे दुर्दैवी दृश्य परिणाम वेदनादायी ठरत आहेत. अर्थार्जनासाठी ऊर फाटेस्तोवर धावणे आणि केवळ 'करीअर' हेच जीवन असे पाल्यांच्या मनावर बिंबविणे घातक ठरत आहे. भौतिक प्रगतीची गती सतत वाढत जाणार आहे. मात्र प्रगती कितीही झाली तरी भारतीय जीवनमूल्यांची रुजवण आणि कुटुंबातील सहज मोकळा संवाद याची उपयोगिता कधीही न संपणारी आहे. म्हणूनच प्रत्येक कुटुंबाने पुढच्या पिढीत जीवनमूल्यांची रुजवण आणि मोकळा संवाद साधावा एवढेच.

९४२२८६२८४८

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# ईगल ग्रुप!

महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये झालेल्या निवडणुकीतील पराभव, अपयश, मतदारयादीतील अनियमितता, निवडणूक प्रक्रियेतील गैरव्यवहार आदी विषयांसंदर्भात चौकशी करण्यासाठी काँग्रेस पक्षाने एका 'ईगल ग्रुप'ची स्थापना केली आहे. या ग्रुपचे संचालन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या नेतृत्वात होणार आहे. हा ग्रुप सर्वांत पहिले महाराष्ट्रात झालेल्या निवडणुकीसंदर्भातील प्रक्रियेची चौकशी करणार आहे. यात नागपूरचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत, मध्यप्रदेशचे माजी मुखमंत्री दिग्विजय सिंह, अजय माकन, अभिषेक मनु सिंघवी, पवन खेडासारख्या लोकांचा समावेश आहे. सदर ग्रुप आपल्या कामाची सुरुवात १० फेब्रुवारीपासून करणार आहे. आता अशा पद्धतीच्या चौकशी समितीची स्थापना करण्याची काँग्रेसला गरज का पडली. आणि समिती स्थापन केलीच आहे म्हटल्यावर त्या समितीचे कार्य सुरू झाल्यानंतर त्यांनी अहवाल दाखल केल्यावर जे तथ्य समोर येईल ते जनतेसमोर आणण्यासाठी पत्रकार परिषद घेणे अपेक्षित असताना, त्याआधीच पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस नेते राहुल गांधींना रडारड करण्याची घाई का झाली असावी?, असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित झाला आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर जवळपास २७ आमदार न्यायालयात गेले असल्याची आकडेवारी समोर आली आहे. आपले आमदार न्यायालयात दाद मागत आहेत, प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे, अद्याप न्यायालयाचा निकाल आलेला नसताना, आपणच बनविलेल्या समितीचा अहवाल आलेला नसताना, सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांना सोबत घेऊन हवेत गोळीबार करण्याची लगीनघाई राहुल गांधींना का झाली? हा खरा प्रश्न आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी दिल्लीत पत्रकार परिषद घेत महाराष्ट्रातील मतदारांच्या यादीबाबत आणि एकूणच निवडणूक प्रक्रियेसंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक आयोगाने पादर्शकतेने काम करण्याची गरज असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या लोकसंख्येपेक्षा मतदार जास्त कसे, असा प्रश्नदेखील राहुल गांधींनी उपस्थित केला. हिमाचलप्रदेशच्या लोकसंख्येएवढे मतदार पाच महिन्यांत महाराष्ट्रातील मतदारयादीत वाढले असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी ३९ लाखांची तफावत असल्याचे म्हटले. तर, हाच आरोप राहुल गांधींनी ३ फेब्रुवारी रोजी लोकसभेत बोलताना केला, तेव्हा ७० लाखांची तफावत असल्याचे सांगितले होते. तर, १९ जानेवारी रोजी बोलताना गांधींनी १ कोटी मतदारांची तफावत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे राहुल गांधी मनाला वाटेल तेव्हा आपल्या मर्जीने आकडे सांगतात हे यावरून सिद्ध होते. राहुल गांधी यांना केवळ आरोप करून संभ्रम निर्माण करायचा आहे. त्यामुळे वाट्टेल तसे बरळत फिरतात. आणि आज तर त्यांच्या होला हो लावताना खासदार सुप्रिया सुळे, संजय राऊत हे देखील दिसले.

यातली गमतीची गोष्ट अशी आहे की, ईव्हीएमवर, निवडणूक प्रक्रियेवर अविश्वास दर्शविण्यासाठी बसलेल्या तीन व्यक्तींपैकी दोन जण अर्थात राहुल गांधी हे रायबरेली आणि वायनाड अशा दोन वेगवेगळ्या मतदारसंघांतून याच ईव्हीएमवर, समान प्रक्रियेद्वारे निवडून आले आहेत. त्यांची बहीणदेखील अलिकडेच पोटनिवडणुकीत मोठ्या मताधिक्याने याच आक्षेप असलेल्या ईव्हीएमवर निवडून आलेली आहे. त्यांच्या बाजूला बसलेल्या सुप्रिया सुळेदेखील याच ईव्हीएमवर निवडून आल्या आहेत. हे दोघे मिळून ज्या महाराष्ट्राच्या निवडणुकीवर वारंवार बोटं उचलत आहेत, त्याच निवडणुकीसोबत नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक झाली त्यात काँग्रेस जिंकली. ही तीच बिचारी अभागी ईव्हीएम होती. जिने एकाचवेळी विधानसभेत हरवलं आणि लोकसभेत जिंकवलं... या निकालावर बोलताना राहुल गांधी कधी दिसले नाही आणि दिसणार नाही. कारण तेथे काँग्रेस जिंकल्यामुळे आपसूक निर्दोषत्वाचा शिक्कामोर्तब झाला, असे म्हणायला हरकत नाही. ज्या महाराष्ट्रात एवढे मतदार आले कुठून असा प्रश्न विचारला जात आहे, त्याच महाराष्ट्रातील नांदेड मतदारसंघात सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीपेक्षा लोकसभेच्या पोटनिवडणुकीत ७ टक्के मतदान वाढले आहे. तेथे काँग्रेसचा उमेदवार निवडून आला, हे कदाचित राहुल गांधींपर्यंत पोहचलेले दिसत नाही.

ईव्हीएमबद्दल म्हणाल तर ते एक स्टॅण्ड अलोन (स्वतंत्र) मशीन आहे. ज्याच्यावर टॅम्परिंग शक्य नाही. ते हॅक करणं शक्य नाही. कारण ते स्टॅण्ड अलोन आहे. कुठल्याही नेटवर्कशी, फ्रिक्वेंशीशी त्याचा काहीही संबंध नाही. ईव्हीएमबद्दलचे जे सगळे प्रोटोकॉल्स आहेत. म्हणजे प्रॉडक्शन ऑफ ईव्हीएमचे प्रोटोकॉल, ट्रान्सपोर्टचे प्रोटोकॉल, स्टोरेजचे प्रोटोकॉल, वापर करण्याचे प्रोटोकॉल, सिक्युरिटीचे प्रोटोकॉल हे सगळे इतके कडक आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे ईव्हीएममध्ये काही गडबड, गोंधळ, हॅकिंग असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

ही प्रक्रिया राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या प्रतिनिधींच्या समक्षच केली जाते आणि त्यांच्या स्वाक्षऱ्या त्यावर असतात. या सर्वांचे चित्रीकरण सुद्धा केलेले असते. म्हणजे थोडक्यात सांगायचं तर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांचा त्यांच्या प्रतिनिधींच्या मार्फत सहभाग हे प्रशासकीय प्रोटोकॉलचं वैशिष्ट्य आहे. टेक्निकली तर ईव्हीएममध्ये गोंधळ होणं किंवा हॅक होणं, टॅम्परिंग होणं हे केवळ अशक्य आहे. जवळपास २४ वर्षांपासून भारतीय जनता गेल्या अनेक निवडणुकांमध्ये यशस्वीपणे ईव्हीएमचा वापर करत आहे. ईव्हीएमद्वारे विविध निवडणुका आतापर्यंत घेण्यात आल्या आहेत. त्या वेगवेगळ्या पद्धतीने यशस्वी झाल्या आहेत. असे असताना विरोधी पक्ष वारंवार आपल्या अपयशाचे खापर ईव्हीएमवर फोडताना दिसतात.

ईव्हीएम, मतदार वाढले, सहा वाजेनंतर मतदान कसे वाढले याचं निवडणूक आयोगानं वारंवार स्पष्टीकरण दिलं आहे. मतदारयादीबाबत आयोगाकडून उत्तरं दिलेली आहेत. आता पुन्हा न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. तेथेही न्यायालयाने उत्तर दाखल करायला सांगितले आहे. न्यायालयाप्रमाणेच निवडणूक आयोग स्वायत्त असल्याने, ते न्यायालयासमोर चुकीची माहिती सादर करणार नाही अशी अपेक्षा आहे. तरीदेखील काही चुकीचं सादर केलंच तर, न्यायालय ते लगेच पकडेल आणि 'दूध का दूध पानी का पानी करेल.' पण यांचा विश्वास निवडणूक आयोगावर नाही, यांचा विश्वास न्यायपालिकांवर देखील नाही. आणि हास्यास्पद बाब म्हणजे स्वतःच निर्माण केलेल्या 'ईगल ग्रुप'वर देखील यांचा विश्वास नाही. तो असता तर 'ईगल ग्रुप'चा अहवाल आल्यानंतर राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेतली असती. पण यावेळी पत्रकार परिषद घेण्याची राहुल गांधींची घाई कदाचित दिल्लीत त्यांचा प्रचंड पराभव होत असल्यानं कव्हर फायरिंगसाठी असावी. कारण आजपर्यंतचा अत्यंत लाजिरवाणा पराभव यावेळी राहुल गांधींच्या नेतृत्वात होत असल्याचा अंदाज त्यांना आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा दिल्लीचे अपयश ईव्हीएमच्या पदराआड लपवण्याचा हा राहुल गांधींचा प्रयत्न दिसतो. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ''जब एक ही चुटकुला बार-बार सुनाया जाए तो उसपर हंसा नहीं करते...'' अशा किमान शब्दांत कमाल अपमान करून, 'ईगल ग्रुप'चे सर्वोच्च नेते राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेची हवा काढून टाकली, हे मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

### सर्वांना राष्ट्रीय अंदाजपत्रक कळते का?

भारतासारख्या देशाचे वर्षांचे अंदाजपत्रक अर्थशास्त्रीय विशेषज्ञ अभ्यास करून व समतोल राखत तयार करत असतात. दरवर्षी असे आढळते की, बजेट लोकसभेत सादर झाल्यावर लगेच काही विरोधी पक्षांचे नेते त्यावर त्यांच्या प्रतिक्रिया देतात. नेहमीच्या ठरलेल्या प्रतिक्रियांच्या तुणतुण्यांशिवाय त्यात विशेष काही नसते. बऱ्याच विरोधी प्रतिक्रियेतून त्या नेत्यांचे अज्ञानच दिसून येते. जसे रुपयाचे अवमूल्यन झाले की देश बुडीत निघाला, असे बऱ्याच जणांना वाटते. उलट एखाद्या देशाच्या चलनाचे अवमूल्यन झाले की त्या देशाच्या निर्यातदारांना फायदा होतो, निर्यात वाढते, परकी चलनात वाढ व्हायला मदत होते. देश स्वतःहून अवमूल्यन करतात. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना चीनने त्यांच्या चलनाचे अवमूल्यन केले होते; ज्यामुळे चीनच्या वस्तू जगात स्वस्त झाल्या होत्या. अमेरिकेने चीनच्या या कृतीचा निषेध केला होता, हे बऱ्याच वाचकांना आठवत असेल. बजेटचा बरा-वाईट परिणाम कळायला काही काळ जावा लागतो. त्यामुळे ताबडतोब बऱ्या-वाईट प्रतिक्रिया देताना अभ्यास व संयम करावा; जेणेकरून सर्वसामान्य जनतेची दिशाभूल होणार नाही. याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी.



**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### १४४ वर्षांनंतर होणाऱ्या महाकुंभाचे महत्त्व

१४४ वर्षांनंतर होणाऱ्या महाकुंभ मेळ्याचे आध्यात्मिक महत्त्व काय आहे? तसेच या पर्वात गंगेत स्नानाचे काय महत्त्व आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे.

**खगोलीय घटना** : १४४ वर्षांनंतर होणाऱ्या कुंभमेळ्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे यावेळी अनेक ग्रहांचा विशेष योग जुळून येतो. शनि ग्रह स्वतःच्या राशीत, गुरू ग्रह कुंभ राशीत आणि सूर्य मकर राशीत प्रवेश करत आहे, ज्यामुळे 'महायोग' तयार होतो. हा महायोग अत्यंत शुभ मानला जातो आणि यामुळे कुंभमेळ्याचे महत्त्व अनेक पटींनी वाढते.

**आध्यात्मिक महत्त्व** : कुंभमेळा हा एक अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महत्त्व असलेला उत्सव आहे. या काळात गंगा नदीमध्ये स्नान करणे अत्यंत पुण्यदायी समजले जाते. १४४ वर्षांनंतर येणाऱ्या कुंभमेळ्यात स्नान केल्याने व्यक्तीच्या सर्व पापांचे नाश होतात आणि मोक्षप्राप्ती होते, अशी मान्यता आहे.

**ऐतिहासिक महत्त्व** : हा कुंभमेळा ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्वाचा आहे. यापूर्वी असा योग अनेक वर्षांपूर्वी आला होता. त्यामुळे यावेळेचा कुंभमेळा एक ऐतिहासिक पर्वणी आहे, असे मानले जाते. कुंभमेळ्यामध्ये गंगेत स्नान करणे हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. यासोबतच, गंगेत स्नान केल्याने व्यक्तीच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यालाही लाभ होतो.



**निष्कर्ष** : १४४ वर्षांनी होणारा कुंभमेळा एक अत्यंत दुर्मिळ आणि महत्त्वाचा योग आहे. या पर्वात गंगेत स्नान करणे अत्यंत पुण्यदायी आहे आणि यामुळे व्यक्तीला आध्यात्मिक लाभ मिळतो अशी मान्यता आहे.

**अनंत ताम्हणे**/९४२२६१४७६२

### वस्त्रसंहितेचा निर्णय भक्तांच्या सन्मानासाठीच

श्री सिद्धिविनायक मंदिर प्रशासनाने लागू केलेल्या वस्त्रसंहितेच्या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत आणि अभिनंदन. हा निर्णय मंदिराचे पावित्र्य राखणारा आणि भक्तांमध्ये भक्तिभाव निर्माण करणारा, तसेच भारतीय संस्कृतीचे जतन करणारा आहे. मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, भारतीय संस्कृती आणि परंपरेचे केंद्र आहे. त्यामुळे तेथील पावित्र्य राखले जाणे आवश्यक आहे. मंदिराने घेतलेला हा निर्णय मंदिर परिसरातील भक्तिमय वातावरण अधिक शुद्ध व शिस्तबद्ध ठेवण्यासाठी महत्त्वाचा आहे. शाळा, न्यायालय, विधानभवन, इतकेच नव्हे, तर आजकाल अनेक खाजगी कार्यालये, रुग्णालये, सोनाराची दुकाने, मॉल्स यासारख्या ठिकाणी विशिष्ट पोशाख संदर्भात नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. विविध पंथांतील प्रार्थना स्थळी जाताना तेथील परंपरेनुसार पोशाख घालूनच प्रवेश मिळतो. मग हिंदू मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू होताच याविषयी आक्षेप घेतले जातात, हे खेदजनक आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः अनेक धार्मिक स्थळांमध्ये तेथील वस्त्रसंहितेचे पालन करतात. त्यामुळे सामान्य भाविकांनाही या नियमांचे पालन करण्यात कोणतीही अडचण वाटू नये. उज्जैनच्या श्री महाकालेश्वर मंदिरासह देशातील अनेक प्रसिद्ध मंदिरांमध्ये अशी वस्त्रसंहिता लागू आहे. त्यामुळे श्री सिद्धिविनायक मंदिराच्या निर्णयाचा आदर्श सरकारीकरण झालेल्या सर्वच मंदिरांनी घ्यावा. हे देखील सत्य आहे की, मंदिरातील वस्त्रसंहिता ही कोणावरही अन्याय करणारी नाही. मंदिर प्रशासनाने घेतलेला हा निर्णय योग्यच असून, भाविकांनी त्यास संपूर्ण पाठिंबा द्यायला हवा आणि याविषयी चुकीचे विचार पसरवणाऱ्यांना सनदशीर मार्गाने उत्तर द्यायला हवे.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# पदभार घेताच सुलोचना सोनवणे यांनी दिला कार्यालयाच्या स्वच्छतेवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

शुक्रवारी सकाळी साडेदहाची वेळ.... शासनाकडून नव्याने पदभार मिळालेल्या प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे या जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागात आल्या.फरशीवर जागोजागी पडलेले खड्डे अन् अस्ताव्यस्त पडलेले दप्तराचे गठ्ठे पाहून त्यांनी लगेच स्वच्छता करून घेण्याची सूचना दिली.अन प्रत्यक्षात स्वच्छतेला सुरुवातही झाली.



आपण जिथे काम करतो तिथले वातावरण प्रसन्न असले पाहिजे. त्यामुळे पदभार घेतल्यानंतर प्रथम कार्यालयातील स्वच्छतेवर भर दिला. समाज कल्याण विभागाशी निगडित असलेल्या लोकांना तत्पर सेवा मिळाली पाहिजे,कामांचा निपटारा वेळेत झाला पाहिजे, यावर आपला भर असेल. **- सुलोचना सोनवणे, नूतन प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी**

चार महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकारी पदाचा पदभार जात पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी सचिन कवले यांच्याकडे राज्याच्या समाज कल्याण आयुक्तांनी सोपविला होता.विधानसभा निवडणुकीत त्यांनी दिव्यांग मतदारांचे सर्वेक्षण आणि त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करून या निवडणुकीत दिव्यांग मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मोहीम राबविली. त्यानंतर गुरुवारी (दि.७) त्यांचा तडकाफडकी पदभार काढून घेतला आणि सोलापूरच्या समाज कल्याण उपायुक्त सुलोचना सोनवणे यांना पदभार दिला.

सोनवणे या सकाळी साडेदहा वाजता कार्यालयात आल्या.आणि त्यांनी कार्यालयाची पाहणी करून अस्वच्छतेबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रत्येक कर्मचाऱ्यांना आपुलकीने बोलून पहिल्याच दिवशी त्यांनी कर्मचाऱ्यांची मने जिंकली.यावेळी समाज कल्याण विभागाच्या वतीने विस्तार अधिकारी स्वाती गायकवाड यांनी सत्कार केला. सहाय्यक लेखाधिकारी भूषण काळे, संदीप खरबस, बसवराज भंडारकवठेकर,वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे, कमलाकर तिकटे, नॅशनल ट्रस्ट कमिटीचे सदस्य पत्रकार दत्ता म ोकाशी उपस्थित होते. वसतिगृह संस्थाचालक संघटनेच्या वतीने सतिश दरेकर यांनी त्यांचा सत्कार केला.यावेळी समीर तडवळकर,म ाशाळे उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

निर्भया हीचा राहत्या घरापासून पाठ लाग करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या १९ वर्षीय तरुणांवर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत अबकड (रा. सोलापूर) यांनी फिर्याद दिली असून शाकीब जाकीर हुसेन रजभरे (वय १९ रा. बसवेश्वर नगर,भाग चार नई जिंदगी) असे गुन्हा दाखल झालेल्यांचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ५ फेब्रुवारी रोजी निर्भया शाळेकडे जात होती. शाकीब हा तिचा पाठलाग करीत होता. पाठलाग करून तीस धम कावले. तु मला फोन कर नाही तर मी तुला खल्लास करेन,नाहीतर माझ्या स्वत:चेही जीव देईन,असे धमकी व त्रास देत आहे. म्हणून आरोपीविरुध्द विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.


Adivasi Devmogara Education Society's

**D P GAVIT AYURVED COLLEGE & HOSPITAL**
**Pathrai Tal. & Dist. Nandurbar**

Ph-7588737802 E-mail: 2024ayu0864@gmail.com

**Walk In Interview**

Application are invited on plain paper along with all necessary copy of certificate from the eligible candidate for the following post. Qulification and experience as per **MUHS** notification no 40/2016 Direction No 01-2017

| Sr.No | Subject | | | Vacant post |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | | | 1 (Open) |
| Sr.No | Subject | Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor / Lecture |
| 1 | Samhita And Siddhanta | --- | 1 (Open) | 1 (Open), 1(SC) |
| | Sanskrit | --- | --- | 1 (Open) |
| 2 | Rachana Sharir | ---- | 1 (Open) | 1 (Open) |
| 3 | Kriya Sharir | --- | 1 (Open) | 1 (Open) |

**Note:-** For detailed information about post, Qualification and conditins please visit **MUHS**, website:www.muhs.ac.in Application along-with attested copies of all relevant Certificates must reach to the college on or before:23/02/2025

**Sd/-**
**Secretary**

**Sd/-**
**Chairman**



## अहिल्यानगर नगर निगम, अहिल्यानगर

**क्षेत्रीय पर्यटन विकास योजना वर्ष २०२४-२५**

**पुनः ई-निविदा सूचना संख्या : २३५ / वर्ष २०२४-२५**

क्षेत्रीय पर्यटन विकास योजना वर्ष २०२४-२५ पुनः ई-निविदा सूचना सं. २३५ ई-टेंडर मोड के माध्यम से ऑनलाइन बोली लगाने के लिए वर्ष २०२४-२५ को वेबसाइट http://mahaetenders.gov.in पर प्रकाशित किया गया है।

हालांकि, संबंधित को इस पर ध्यान देना चाहिए।

(माननीय आयुक्त के अनुमोदन से)

**हस्ताक्षर/-**
**नगर अभियंता**
**अहिल्यानगर नगर निगम,**


## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील तसेच आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे खामगांव येथील जमीन गट नं. १६/१ क्षेत्र ०४ हे. ९९ आर., गट नं. ९९ क्षेत्र ०० हे. ८६ आर., गट नं. १६६ क्षेत्र ०४ हे. ४४ आर., गट नं. १९४ क्षेत्र ०० हे. ०६ आर, गट नं. २७७ क्षेत्र ०१ हे. ८४ आर., गट नं. २३० पैकी १/२ क्षेत्र ०१ हे. २४ आर., गट नं. २३२ क्षेत्र ०३ हे. ७९ आर., गट नं. ४७१ क्षेत्र ०१ हे. ४७ आर. तसेच डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे खामगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं. ११,१३,१७,२०,४८ब, ४९ व ९८ अशा मिळकतीबाबत आमचे अशिल श्री. हणुमंत रणजीत मुठाळ यांनी त्यांचा सदरील मिळकतीमध्ये अविभक्त हिस्सा असल्याने त्यांनी बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ३७५/१९८८ हा दावा पंडीत रणजीत मुंठाळ व इतर लोकांविरुद्ध वाटपाबाबतचा दाखल केलेला होता. त्या दाव्याचा निकाल आमचे अशिलासारखा झाला होता. सदर निकालावर पंडीत रणजीत मुठाळ यांनी जिल्हा कोर्टात सिव्हील अपील नं. ४८२/२००२ नुसार अपील दाखल केलेले होते. त्या अपीलाचा निकाल देखील आमचे अशिलासारखा आलेला आहे. परत त्या निकालावर पंडीत रणजीत मुठाळ यांनी दुसरे अपील नं. १७४/२०१० नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे कोर्टात दुसरे अपील दाखल केले असून, ते न्यायप्रविष्ठ आहे. तसेच त्या त्रयस्त व्यक्तीस सदर मिळकती हस्तांतरणीत न करण्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

असे असताना वरील मिळकतीत पंडीत रणजीत मुठाळ यांचे वारस व इतर मारुती रणजीत मुठाळ, ईश्वर व चंद्रकांत रणजीत मुठाळ व त्यांचे वारस हे त्यांची नावे मिळकतीच्या हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला असल्याचा गैरफायदा घेऊन लोकांची दिशाभूल करुन सदरील मिळकतीबाबत इतर लोकांशी संगनमत करुन सदरील मिळकत विक्री करणेचे प्रयत्नात आहेत. तसेच सदरील मिळकतीवर बोजा बँकेमार्फत घेणेची शक्यता आहे.

सबब, या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, पंडीत रणजीत मुठाळ यांचे वारस तसेच मारुती रणजीत मुठाळ व ईश्वर व चंद्रकांत रणजीत मुठाळ यांचे वारस यांचेबरोबर सदरील मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, हस्तांतरण, बोजा अथवा त्रयस्त व्यक्तीचा हक्क प्रस्तापित होईल, असे कोणतेही व्यवहार करु नयेत. याउपर केल्यास ते व्यवहार आमचे अशिलांचे हक्क व हिश्श्यावर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे.

दिनांक : ०७/०२/२०२५

सही/-
अशिलातर्फे ॲड.
**ॲड. श्री. समाधान दशरथ सुरवसे,**
बार्शी जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ८६९८५३४७३७

## जाहीर समन्स

**रे. मु. नं. १६४/२०२३ नि.नं.१०**
पुढील नेमलेली तारीख २५/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात (मा. जी.एस. पाटील सो.)**

**श्री गुरुसिद्ध मणिकंठ शिवाचार्य दहिवडकर महाराज ----- वादी**

**- विरुद्ध -**

**रेखा अनिल जिकरे ----- प्रतिवादी**

**प्रति,**
**रेखा अनिल जिकरे,** वय ४४ वर्षे, धंदा- घरकाम
रा. व्हनकळस प्लॉट, अलिपूर रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

ज्याअर्थी यातील वादीने तुमचे विरुद्ध दाव्यात नमूद मिळकतीचा कबजा व थकीत नुकसानी भाडे मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. परंतु तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर समन्स/नोटीसची बजावणी होऊ देत नाहीत. तुमचा अचूक पत्ताही आढळून येत नाही, तुम्ही जाणीवपूर्वक समन्स/नोटीसीची बजावणी करुन घेत नाहीत. सदर दाव्याकामी तुम्ही प्रतिवादी म्हणून सामील असून तुमचेविरुद्ध वादीने दाद मागणी केलेली आहे.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते कील आपण सदर दाव्याकामी हे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमली तारीख २५/०३/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे/कैफियत दिली नाही तर आपणास सदर समन्सची बजावणी होवूनही आपण काहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर नोटीस/समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ३०/०१/२०२५

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर


मनोरमा परिवार अंतर्गत

## ट्वीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९९ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२

**दिपक सुरवसे** चेअरमन (९१७५१८३६९९) | **नितीन भोसले** व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३) | **दिपमाला जाधव** व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)


## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. १९/२०२५ नि.नं.०६**
पुढील नेमलेली तारीख ११/०३/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात (मे. एच.यु.यु. पाटील सो. कोर्ट)**

१) **सुभाषराव गुणवंतराव निंबाळकर,** वय ५४ वर्षे, धंदा- शेती, रा. शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **रंजना सुभाषराव निंबाळकर,** वय ६४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १,२ हे पती पत्नी असून त्यांना शुभांगी सुभाषराव निंबाळकर ही अविवाहीत मुलगी होती. ती दि. १५/१२/२०२४ रोजी पुणे येथे मयत झाली. यातील अर्जदारांना त्यांचे कायदेशीर, शासकीय अडचणीचे निवारणाकरीता हेअरशिप/वारसा प्रमाणपत्राची गरज असून ते त्यांचेकडे नसलेने त्यांना अनेक अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदार यांनी ते मयत शुभांगी सुभाषराव निंबाळकर यांचे कायदेशीर वारस असलेबाब हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ७/२/२०२५

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. ०२/२०२५ नि.नं.०६**
पुढील नेमलेली तारीख १९/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**हनुमंत पांडुरंग वडवडे,** वय ५८ वर्षे, धंदा- शेती, रा. रऊळगांव, बालाजीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

१) **अशोक पांडुरंग वडवडे,** वय ६२ वर्षे, धंदा- शेती, रा. रऊळगांव, बालाजीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **बाळू पांडुरंग वडवडे,** वय ६० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **रसिका पांडुरंग वडवडे,** विवाहानंतर **सौ. रसिका फुलचंद्र गायकवाड** वय ५५ वर्षे, धंदा-घरकाम,रा. हिंगणी (पा.), ता. बार्शी, जि. सोलापूर
— **सामनेवाला**

ज्याअर्थी बलभीम जयराम वडवडे हे दि. २७/०९/२००४ रोजी रऊळगांव, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरहू मयत बलभीम जयराम वडवडे यांचे पश्चात रऊळगांव येथील ग्रामपंचायत घर नं. १९५/अ व १९५/ब या स्थावर मिळकतीस वारस नोंद करणेबाबत सक्सेशन सर्टिफिकेट मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

त्याअर्थी अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास सांगण्याचे असेल तर संबंधितांनी या जाहीर प्रसिद्धीकरणाच्या तारखेपासून १ महिन्याचे आत या मे. कोर्टात हजर होवून आपल्या लेखी हरकती पुराव्या दाखल कागदपत्र दि. १९/०३/२०२५ रोजी अगर वर नमूद मुदतीत सादर कराव्यात. सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दिलेस सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेवून त्यांना मयत बलभीम जयराम वडवडे यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून सक्सेशन सर्टिफिकेट देईल.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. तारीख : ०७/०२/२०२५

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे पक्षकार यांचेतर्फे त्यांनी माहिती दिलेवरुन व सांगितलेवरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील मंगळवार पेठ भागातील सि.स.नं. १३९६ याचे क्षेत्रफळ ४०.१० चौ.मी. याची मोजमापे जागेवरील मोजमापाप्रमाणे कायम व बरोबर आहेत. यासी चतुःसिमा- पूर्वेस- रस्ता, दक्षिणेस- सि.स.नं. १३९७, पश्चिमेस- सि.स.नं. १३९४ व उत्तर बाजूस रस्ता. याचे पाणी व वागणूक पूर्व व उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाची खुली जागा आतील सर्व तदंगभूत वस्तूसह.

वरील जागा ही शशिकांत दामोदर परदेशी यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीतील आहे. जागेचे मालकांनी त्यांच्या कायदेशीर गरजेपोटी ही जागा विक्रीस काढली आहे व ठरल्याप्रमाणे आमच्या पक्षकारांनी त्यांना इसार दिलेला असून तसा ठराव व करार झालेला आहे. त्या अन्वये आमचे पक्षकार सदर जागा खरेदी घेणार आहेत. सदर मिळकत ही मिळकत मालकांनी निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे पक्षकारास दिलेला आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, वरील जागेचे मालकी, कब्जे वहिवाट, बोजा, तारण, पोटगी, लिन, लिज, टाच, भाडेपट्टा, भोगवटा हक्क वगैरे, तत्सम किंवा कोणत्याही स्वरुपाची कसलाही हक्क, अधिकार कोणाचेही असल्यास अथवा सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यपासून ८ (आठ) दिवसात त्यांचे हक्क, अधिकार यांच्याबद्दल संपूर्ण कागदपत्रे पुरावेनिशी खातरजमा करुन द्यावे. नसता वरील जागा ही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची आहे, त्याबद्दल कोणाचेही, कसलेही हक्क, अधिकार नाहीत, व्यवहारास हरकत नाही, असल्यास त्यांनी त्यांचे हक्क, अधिकार, हरकत जाणीवपूर्वक स्वतःहून कायमस्वरुपी सोडून दिलेली आहे, असे समजून रजि. खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, तारीख : ०७/०२/२०२५

सही/-
**ॲड. श्री. संभाजी शिवाजी गलांडे,**
३८४७, भवानी पेठ, बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९६०४१७११०१
पक्षकारतर्फे ॲडव्होकेट

## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. ०५/२०२५ नि.नं.०५**
पुढील नेमलेली तारीख ०४/०३/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात (मा. जी.एस. पाटील सो.)**

१) **उषा अशोक मुंढे,** वय ५४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कळंबवाडी (आ), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **प्रमोद अशोक मुंढे,** वय ३३ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **प्रशांत अशोक मुंढे,** वय २८ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २,३ ची आई असून अर्जदार नं. १ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २,३ चे वडील अशोक संदीपान मुंढे हे होते. ते दिनांक ०४/१२/२०२४ रोजी बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत अशोक संदीपान मुंढे यांना अर्जदार हेच पत्नी व मुलगा या नात्याने एकमेव कायदेशीर वारस आहे. मयतास अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार हेच मयत अशोक संदीपान मुंढे यांचे कायदेशीर वारस असलेने अर्जदरास त्यांचे कायदेशीर गरजाचे निवारणाकरीता व न्यायालयीन अडचणीचे निवारणाकरीता व अन्यही कारणाकरीता हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे. परंतु त्यांचेकडे ते नसलेने अर्जदारांना अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागून अपरिमित नुकसान होत आहे. अर्जदार हे मयत अशोक संदीपान मुंढे यांचे कायदेशीर वारस असलेबाबत हेअरशिप (वारस) प्रमाणपत्र मिळावे असे कथन करुन अर्जदारानी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्राकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधितानी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख १२/०२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे असहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीखः १३/०१/२०२५

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील क प्रकारातील खालील सहकारी संस्थांची निवडणुकीसाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्दीकरणाचे निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक नियम ६(३) नुसार प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख | निवडणूक नियम ८(१) नुसार प्रारुप मतदार यादीवर हरकती व आक्षेप तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांचेकडे सादर करावयाची तारीख | निवडणूक नियम ८ (३) नुसार प्रारुप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतीवर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांनी द्यावयाचा | निवडणूक नियम ८(३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | विष्णुपंत कुलकर्णी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., माळशिरस | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| २ | महात्मा फुले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., माळीनगर | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ३ | जयशंकर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., शिंदेवाडी | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ४ | अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., अकलूज | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ५ | श्रीराम ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., पिलीव (लक्ष्मीनगर) | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ६ | सयाजीराजे पार्कची पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्था मर्या., आनंदनगर | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ७ | समता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., नातेपुते | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ८ | शिवप्रसाद अर्बन वुमन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., नातेपुते | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| ९ | शिवप्रसन्न वुमन रूरल क्रेडिट को-आपरेटिव्ह सोसायटी लि., संगम | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |
| १० | महालिंगेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., खुडूस | ०७/०२/२०२५ | ०७/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | १८/०२/२०२५ | २०/०२/२०२५ |

सही/-
**(एम.एल.शिंदे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था.**
**अकलूज, ता. माळशिरस, जि.सोलापूर**

## कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड,

**नोंदणीकृत कार्यालय, 14/30, बी. विंग तळमजला गांधीनगर, अक्कलकोट रोड, सोलापूर - 413006**
**CIN:L17119PN1980PLC022962**

**31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे स्टेटमेंट**

(रु. लाखांत)

| अ. क्र. | | तिमाही समाप्त / चालू वर्ष समाप्त 31 डिसेंबर 2024 (विनालेखित) | मागील वर्षात संबंधित 3 महिने संपले 31 डिसेंबर 2023 (विनालेखित) | नऊ महिने/ चालू वर्षाचा शेवट 2024 (विनालेखित) | वर्ष ते तारीख आकडे/मागील वर्ष समाप्ती 31 मार्च 2024 (ऑडिट केलेले) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशनमधून एकूण उत्पन्न | 210.88 | 157.47 | 373.06 | 400.47 |
| 2 | निव्वळ नफा / (तोटा) कालावधीसाठी (कर आधी, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम) | (41.06) | (0.35) | (130.18) | (206.05) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंतर) | (41.06) | (0.35) | (130.18) | (206.05) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण आयटम नंबर) | (41.06) | (0.35) | (130.18) | (187.30) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी नफा/(तोटा (करानंतर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (41.06) | (0.35) | (130.18) | (187.30) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 285 | 285 | 285 | 285 |
| 7 | मागील वर्षाचा लेखापरीक्षीत ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव (पुनर्मुल्यांकन राखीव वगळून) | -- | -- | -- | -- |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी रु. 10/- दर्शनी मूल्य) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) -<br>1. मूलभूतः<br>2. पातळ केलेले: | (1.44)<br>(1.44) | (0.01)<br>(0.01) | (4.57)<br>(4.57) | (6.57)<br>(6.57) |

**टीप : अ)** उपरोक्त SEBI (सूचिबध्द दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम 2015 च्या अंतर्गत स्टॉक एक्सचेजमध्ये 31 डिसेंबर 2023 रोजी संपलेल्या तिमाहीसाठीच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरुपाचा उतारा आहे. वित्तीयचे संपूर्ण स्वरुप 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाहीचे निकाल स्टॉक एक्सचेज (s) www.bseindia.com च्या वेबसाईटवर आणि कंपनीच्या www.katarespinningmillslimited.com वर उपलब्ध आहेत.

**ब)** वरील आर्थिक परिणामांचे लेखापरिक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि कंपनीच्या संचालक मंडळाने ०६ फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

**ठिकाण : सोलापूर**
**तारीख : 06/02/2025**

**कटारे स्पिनिंग मिल्स् लिमिटेड, करिता**
**सही /- किशोर ति. कटारे**
**(DIN- 00645013)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### 'जीतो बाजी खेल के' चॅम्पियन्स ट्रॉफीचे गीत सादर




**दुबई** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) शुक्रवारी आयसीसी पुरुष चॅम्पियन्स चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेचे अधिकृत गीत सादर केले आहे. 'जीतो बाजी खेल के' हे प्रसिद्ध पाकिस्तानी पार्श्वगायक व गीतकार आतिफ अस्लम यांनी गायले आहे. या गाण्याच्या सादरीकरणामुळे १९ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान पाकिस्तान आणि दुबईत होणाऱ्या १५ सामन्यांच्या या स्पर्धेसाठी आणखी उत्साह निर्माण होईल. मी आयसीसी पुरुष चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अधिकृत गाण्याचा भाग होण्यासाठी खूप उत्सुक आहे, असे अस्लम म्हणाले. हे गाणे सिद्दीकी यांनी तयार केले असून अदनान धुळ व असफंदयार असद यांनी लिहिले आहेत. हा संगीत व्हिडीओ रस्त्यांपासून बाजारपेठांपर्यंत स्टेडियमपर्यंत पाकिस्तानच्या विविध संस्कृतीचा दृश्य उत्सव आहे आणि खेळाच्या प्रेमाचे आणि आनंदाचे प्रतिनिधित्व करतो. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अधिकृत गाण्याच्या सादरीकरणासह आम्ही या आयसीसी स्पर्धेच्या व्यासपीठावर आणखी एक रोमांचक टप्पा गाठत आहोत, असे आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचे संचालक आणि पीसीबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमैर अहमद सय्यद म्हणाले.

### फिफाकडून पाकिस्तान फुटबॉल महासंघ निलंबित

**इस्लामाबाद** : आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने (फिफा) पाकिस्तान फुटबॉल महासंघाला (पीएफएफ) पीएफएफ संविधानात सुधारणा करण्यास आणि पीएफएफ काँग्रेसमध्ये निष्पक्ष निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा करण्यास अपयशी ठरल्याबद्दल तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. पीएफएफ काँग्रेसने पीएफएफ संविधानाच्या सुधारित आणि सुधारित आवृत्तीला मान्यता दिली आणि स्वीकारली, तरच पीएफएफवरील निलंबन मागे घेतले जाईल, असे फिफाने म्हटले आहे. पीएफएफचे निलंबन हे देशाचे प्रतिनिधित्व करण्याच्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याच्या देशाच्या संभाव्यतेसाठी एक मोठा धक्का आहे. यामुळे पीएफएफमध्ये असलेल्या सततच्या समस्या व त्रुटी देखील उघड झाल्या आहेत, याकडे सरकार आणि क्रीडा मंत्रालय जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

### स्टीव्ह स्मिथचा आशियात विक्रम

**गॅले** : स्टीव्ह स्मिथ श्रीलंकेच्या भूमीवर एकापाठोपाठ एक मोठे विक्रम करत आहे. अलीकडेच त्याने कसोटी क्रिकेटमध्ये १० हजार धावा पूर्ण केल्या आणि आता तो आशियाच्या खेळपट्ट्यांवर ऑस्ट्रेलियाकडून कसोटीत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याने याबाबतीत रिकी पॉन्टिंगला मागे टाकले आहे. तो पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत श्रीलंका दौऱ्यात ऑस्ट्रेलिया संघाचे नेतृत्व करत आहे. आशियामध्ये फलंदाजी करताना पॉन्टिंगने २८ कसोटी सामन्यांच्या ४८ डवांमध्ये ४१.९७ च्या सरासरीने १८८९ धावा केल्या, तर स्मिथने अवघ्या ४२ डावांमध्ये हा टप्पा पार केला. शतकांच्या बाबतीतही स्मिथ पॉन्टिंगपेक्षा एक पाऊल पुढे आहे. पॉन्टिंगच्या नावावर ५ कसोटी शतके आहेत, तर स्मिथच्या नावावर ७ शतके आहे. या यादीत ॲलन बॉर्डर १७९९ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे. स्मिथने श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात १९१ चेंडूंत शतकी खेळी केली. त्याचे हे कसोटी कारकिर्दीतील ३६ वे आणि श्रीलंकेविरुद्धचे चौथे कसोटी शतक आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ७७,८६०.१९ (-१९७.९७) |
| **निफ्टी** | २३,५५९.९५ ( -४३.४०) |

### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ८६,५१० रु. |
| **चांदी** (प्रतिकिलो) | ९९,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३२.९ | १८.० |
| अमरावती | ३१.८ | १७.३ |
| भंडारा | २९.२ | १६.० |
| बुलडाणा | ३०.५ | १७.० |
| चंद्रपूर | ३२.४ | -.- |
| गडचिरोली | ३१.६ | १७.२ |
| गोंदिया | २८.२ | १७.४ |
| नागपूर | ३०.४ | १७.४ |
| वर्धा | ३१.० | १६.५ |
| वाशीम | ३४.२ | १९.८ |
| यवतमाळ | ३०.६ | १६.८ |

## रणजी करंडक

# विदर्भ-तामिळनाडू उपांत्यपूर्व सामना आजपासून

**नागपूर, ७ फेब्रुवारी**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीचे पाच दिवसीय सामने देशभरातील विविध ठिकाणी खेळविले जाणार आहे. कळमना, नागपूर स्थित व्हीसीए मैदानावर शनिवारपासून विदर्भ आणि तामिळनाडू यांच्यात उपांत्यपूर्व सामना खेळला जाणार आहे.

यंदाच्या हंगामात विदर्भाचा संघ जबरदस्त फॉर्मात असून साखळी फेरीत अपराजित राहून ब गटात विदर्भाने अव्वल स्थान मिळविले व बाद फेरीत प्रवेश केला. साखळी फेरीत विदर्भाने सातपैकी ६ सामने जिंकले व एक सामना अनिर्णीत राखला व ४० गुणांसह ब गटात अव्वल स्थान मिळविले. गुजरातने ३२ गुणांसह दुसरे स्थान मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तिकडे तामिळनाडूने आपल्या ड गटात ७ पैकी ३ सामने जिंकले, एक पराभव व ३ सामने अनिर्णीत राखले. ते २५ गुणांसह गटात दुसऱ्या स्थानावर आहे. ड गटात सौराष्ट्र अव्वल स्थानी आहे.


अक्षय वाडकर


साई किशोर

गत सामन्यात हर्ष दुबेने आपल्या अष्टपैलू खेळाची चमक दाखवत विदर्भाला हैदराबादविरुद्ध विजय मिळवून दिला. पहिल्या डावात पिछाडीवर राहिल्यानंतर दुसऱ्या डावांत अथर्व तायडे, करुण नायर व हर्ष दुबेने तडाखेबंद फलंदाजी करून विदर्भाच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या व नंतर हर्ष दुबेने हैदराबादच्या ६ फलंदाजांना बाद करून विदर्भाचा विजय सुनिश्चित केला. करुण नायरने केलेली शतकी खेळी व सलामीवीर अथर्व तायडेने केलेली ९३ धावांची खेळी मोलाची ठरली.

दोन वेळच्या विजेत्या विदर्भ संघाला आता स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्यासाठी तामिळनाडूविरुद्ध खेळताना अशीच विजयाची लय कायम ठेवणे आवश्यक आहे. यश राठोड, अक्षय वाडकर व हर्ष दुबेला आपल्या बॅटमधून अधिकाधिक धावा काढणे गरजेचे आहे. त्यांना तामिळनाडूच्या अजित राम व कर्णधार साई किशोरच्या गोलंदाजीला संयमाने तोंड द्यावे लागणार आहे. फिरकीपटू साई किशोरने ७ सामन्यात ३८.७५च्या सरासरीने ४० बळी टिपले आहेत.

**- प्रतिस्पर्धी संघ -**

**विदर्भ संघ** : अक्षय वाडकर (कर्णधार, यष्टिरक्षक), अथर्व तायडे (उपकर्णधार), नचिकेत भुते, हर्ष दुबे, प्रफुल्ल हिंगे, यश कदम, शुभम कापसे, अक्षय कर्णेवार, मंदार महल्ले, दानिश मालेवार, अमन मोखाडे, करुण नायर, यश राठोड, आदित्य ठाकरे, सिद्धेश वाठ व उमेश यादव.

**तामिळनाडू संघ** : साई किशोर (कर्णधार), नारायण जगदिशन (उपकर्णधार), अजित राम, सी. आंद्रे सिद्धार्थ, गुर्जपनीत सिंग, बाबा इंद्रजित, भूपती कुमार, लक्ष्य जैन, सुरेश लोकेशवार, मोहम्मद अली, मोहम्मद मोहम्मद, प्रदोष रंजन पॉल, साई सुदर्शन, संदीप वॉरियर, एम. शाहरुख खान, विजय शंकर, मणिमारन सिद्धार्थ व सोनू यादव. (तभा वृत्तसेवा)

### आजपासून उपांत्यपूर्व सामने

पुणे येथे पहिला उपांत्यपूर्व सामना जम्मू-काश्मीर वि. केरळ, नागपूर येथे दुसरा उपांत्यपूर्व सामना- विदर्भ वि. तामिळनाडू, कोलकाता येथे तिसरा उपांत्यपूर्व सामना हरयाणा वि. मुंबई आणि राजकोट येथे चौथा उपांत्यपूर्व सामना सौराष्ट्र वि. गुजरात होणार आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या आदरातिथ्यामुळे राष्ट्रपती भवन भेट खास : सचिन


राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह सचिन तेंडुलकर व त्याचे कुटुंबीय

**नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकर यांनी राष्ट्रपती भवनाच्या भेटीदरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उबदारपणा व आदरातिथ्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत आणि प्रत्येक क्षण खूप वैयक्तिक वाटला असे म्हटले आहे.

तेंडुलकरने कुटुंबातील सदस्यांसह गुरुवारी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेतली. राष्ट्रपती व तेंडुलकर यांनी अमृत उद्यानाची फेरीही घेतली.

राष्ट्रपती भवनाच्या ऐतिहासिक अतिथीगृहात माझ्या कुटुंबासह राहण्याचा सन्मान ही एक आठवण आहे, जी आपण कायम जपून ठेवू, असे सचिन म्हणाला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेली उबदारपणा आणि आदरातिथ्य या भेटीला विशेष केले. त्यावेळी मनापासून केलेल्या गप्पांपासून ते इतिहासात रमलेल्या कॉरिडॉरमधून चालण्यापर्यंत, प्रत्येक क्षण खूप वैयक्तिक वाटला, असे सचिनने समाज माध्यमावर पोस्ट केले. राष्ट्रपती भवनाच्या 'राष्ट्रपती भवन विमर्श श्रृंखला' उपक्रमांतर्गत तेंडुलकरने संवादात्मक सत्र आयोजित केले आणि क्रिकेटपटू म्हणून आपल्या स्वतःच्या प्रवासातील किस्से सांगून प्रेरणादायी तत्त्वे सांगितली. विविध शाळा आणि महाविद्यालयातील इच्छुक खेळाडू आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित असलेल्या सत्रात त्यांनी टीमवर्क, इतरांची काळजी घेणे, इतरांचे यश साजरे करणे, कठोर करणे, मानसिक आणि शारीरिक कणखरता विकसित करणे आणि जीवन घडवणाऱ्या इतर अनेक पैलूंचे महत्त्व अधोरेखित केले. (वृत्तसंस्था)

# बीसीसीआयच्या नवीन संयुक्त सचिवाची निवड १ मार्च रोजी

**नवी दिल्ली, ७ फेब्रुवारी**

देवजीत सैकिया यांना बीसीसीआयच्या सचिवपदी बढती दिल्यानंतर संयुक्त सचिव पद रिक्त राहिले. या पदावर नवीन नियुक्तीसाठी बीसीसीआयने १ मार्च रोजी मुंबईत विशेष सर्वसाधारण सभा (एसजीएम) बोलावली आहे.

जय शाह यांनी १ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यानंतर आसाम क्रिकेट संघटनेचे (एसीए) सैकिया यांनी गत महिन्यात सचिवपदाची सूत्रे हाती घेतली होती.

बीसीसीआयने राज्य संघटनांना एकाच विषयाच्या अजेंडासह एसजीएमची सूचना पाठवली आहे. बीसीसीआयच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना राज्य क्रिकेट संघटनांना दिली असून १ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मुंबई येथील बीसीसीआय मुख्यालयात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येणार आहे. या सभेत संयुक्त सचिवांच्या निवडी व नियुक्तीचे कामकाज पार पडेल, असे सर्वोच्च मंडळाने एका निवेदनात म्हटले आहे.

या पदासाठी माजी क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालचे अध्यक्ष अभिषेक दालमिया (पूर्व विभाग), दिल्ली व जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली (उत्तर विभाग) आणि मुंबई क्रिकेट संघटनेचे संजय नाईक (पश्चिम) यांची नावे चर्चेत आहेत. बीसीसीआय सचिव व कोषाध्यक्षांच्या बाबतीत घडल्याप्रमाणे, मंडळाच्या नवीन संयुक्त सचिव निवडीसाठी कोणतीही निवडणूक होणार नाही.

नियमानुसार, विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्यासाठी २१ दिवसांची सूचना आवश्यक असते व बीसीसीआयने या आवश्यकतांचे पालन केले आहे.

गत दोन महिन्यांत ही दुसरी विशेष सर्वसाधारण सभा असेल. १२ जानेवारी रोजी झालेल्या गत विशेष सर्वसाधारण सभेत सैकिया यांची नवीन सचिव म्हणून आणि प्रभतेज सिंग भाटिया यांची नवीन कोषाध्यक्ष म्हणून निवड झाली होती. दोघांचीही बिनविरोध निवड झाली. (वृत्तसंस्था)

# तिरंदाजीत महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद

### अखेरच्या दिवशी एक सुवर्ण, एक कांस्य

**डेहराडून, ७ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सात दिवसीय तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ३ सुवर्ण, एक रौप्य व एक कांस्य अशा एकूण ५ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.




इंडियन राऊंड प्रकारात शुक्रवारी महाराष्ट्राच्या संघाने ओडिशाचा पराभव करून कांस्यपदक जिंकले. त्यानंतर गौरव चांदणे व भावना सत्यगिरी या महाराष्ट्राच्या जोडीने इंडियन राऊंडच्या मिश्र दुहेरीत बाजी मारत सुवर्णपदकासह तिरंदाजी स्पर्धेचा गोड शेवट केला. राजीव गांधी क्रिकेट स्टेडियमवर ही स्पर्धा पार पडली. गौरव चांदणे (अमरावती) व भावना सत्यगिरी (पुणे) या जोडीने झारखंडच्या जोडीचा ६-२ (३६-३४, ३७-३४, ३३-३५, ३४-३३) असा करत महाराष्ट्राला तिसरे सुवर्णपदक जिंकून दिले. १६ वर्षीय भावना सत्याजित ही रणजित चामले यांची शिष्या असून, ती आर्चर्स अकॅडमी, पुणे येथे सराव करते. अमर जाधव, समीर मस्के, कुणाल तावरे व प्रवीण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या तिरंदाजी संघाने हे सर्वसाधारण विजेतेपद संपादन केले.

**कांस्यपदकाच्या एकतर्फी लढतीत बाजी!**

महाराष्ट्राच्या गौरव चांदणे, रोशन सोळंके, अनिकेत गावडे व पवन जाधव या संघाने तिरंदाजीच्या इंडियन राऊंड प्रकारात कांस्यपदकाची कमाई करत राज्याच्या पदकसंख्येत भर घातली. महाराष्ट्र पुरुष संघाने कांस्यपदकाच्या लढतीत ओडिशा संघाचा (४८-४५, ५७-४७, ५५-५१) असा धुव्वा उडविला. (वृत्तसंस्था)

# तायक्वांडोमध्ये मिश्र दुहेरीच्या सुवर्णासह २ रौप्य, ४ कांस्य

**हल्दवानी, ७ फेब्रुवारी**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने तायक्वांडोमध्ये मिश्र दुहेरी सुवर्णासह २ रौप्य व ४ कांस्यपदकांची कमाई करीत दिवस गाजविला. वंश ठाकूर व मृणाली हर्णेकर जोडीने सुवर्णपदकाला गवसणी घातली. स्पर्धेत या दोघाचे सलग दुसरे पदक आहे. वैयक्तिक प्रकारात मृणालीने रौप्य, तर वंशनेही पदक जिंकले आहे.

मानसखंड क्रीडा संकुलात सुरू असलेल्या स्पर्धेत शिवानी भिलारेने रौप्य, तर साक्षी पाटील, अभिजीत खोपडे, वसुधरा छेडे यांनीही कांस्यपदकांची लयलूट केली.

मिश्र पूमसे प्रकारात वंश ठाकूरसोबत मृणाली हर्णेकरने अरूणाचल प्रदेशच्या जोडीवर रोमहर्षक मात केली. महाराष्ट्राने ८.२३३ गुणांची नोंद करत सुवर्णपदकावर नाव कोरले. वैयक्तिक पूमसे प्रकारात मृणाली हर्नेकरने रूपेरी यश संपादन केले. अरूणाचल प्रदेश विरूद्ध महाराष्ट्राची लढत ८.२३२ गुणांवर बरोबरीत झाली, मात्र अरूणाचलने टाय ब्रेकमध्ये १ गुणाने महाराष्ट्राचा निसटता पराभव झाला.



ताकायक्वांडो सामन्यातील रोमहर्षक क्षण

५७ किलो गटातील उत्तराखंडच्या पूजा कुमारी या स्थानिक खेळाडूला स्थानिक प्रेक्षकांचा सातत्याने प्रोत्साहन मिळत होते. महाराष्ट्राच्या शिवानी भिलारे हिने शेवटपर्यंत कौतुकास्पद लढत दिली. अखेर शिवानीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. शिवानी व पूजा यांच्यातील ५७ किलो गटाची लढत अतिशय रंगतदार झाली. दोन्ही खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून ही लढत खेळली. त्यामुळेच शेवटपर्यंत त्यामध्ये उत्सुकता राहिली होती. त्यातही या लढतीच्या पहिल्या मिनिटापासून शेवटपर्यंत पूजा हिला स्थानिक सतत प्रोत्साहन मिळाले. तरीही शिवानी हिने जिद्दीने झुंज दिली.अखेर पूजा हिला सुवर्णपदक तर शिवानीला रौप्यपदक मिळाले.

वजनी गटात साक्षी पाटील (४८ किलो ) व अभिजीत खोपडे (५४ किलो) तर वैयक्तिक पूमसे प्रकारात वंश ठाकूर व वसुंधरा छेडे या चौघांनीही उपांत्य फेरीपर्यंत मजल गाठताना सातत्यपूर्ण कामगिरी केली होती. उपांत्य फेरीत पराभव झाल्यानंतर त्यांना कांस्यपदक बहाल करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# 'ग्रेट खली'च्या हस्ते विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन

**हिंगणघाट, ७ फेब्रुवारी**

स्थानिक नेताजी सुभाषचंद्र बोस व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने मोहता विद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित आमदार चषक २०२५ विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी डब्लू डब्लू ईचे खेळाडू दलीपसिंग राणा उपाख्य 'ग्रेट खली' यांच्या हस्ते एका शानदार कार्यक्रमात करण्यात आले.



कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ग्रेट खली व इतर मान्यवर

यावेळी व्यासपीठावर माजी नप अध्यक्ष प्रेम बसंतानी, आयोजन समितीचे अध्यक्ष रितेश गावंडे, सचिव धनंजय बकाने, जुन्या पिढीतील महिलां खेळाडू माला मैंद, मृणाल रिठे, छाया हेडाऊ, वृषाली काळे, राखी कंटारे, कुंदा भोयर, अरुणा भोयर, दर्शना म्हैस्कर, वैशाली बोकडे, मनीषा जगताप, कल्पना दूधखोरे व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी फटाक्यांच्या आतषबाजीत ग्रेट खली यांनी मैदानाचे भूमिपूजन केले. खली यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. उद्घाटनाचा सामना बीसीसी क्रीडा मंडळ हिंगणघाट व शिवछत्रपती क्रीडा मंडळ यांच्यात रंगला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक माडे यांनी केले. (तभा वृत्तसेवा)

# स्टीव्ह स्मिथ, ॲलेक्स कॅरीची नाबाद शतके

### ऑस्ट्रेलिया ७३ धावांनी आघाडीवर

**गॅले, ७ फेब्रुवारी**

येथे श्रीलंकेविरुद्ध सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात दुसया दिवशी हंगामी कर्णधार स्टीव्ह स्मिथ (नाबाद १२०) व ॲलेक्स कॅरीची (नाबाद १३९) दमदार नाबाद शतके व त्यांनी चौथ्या गड्यासाठी केलेल्या नाबाद २३९ धावांच्या भागीदारीच्या बळावर ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर पहिल्या डावात ८० षटकांत ३ बाद ३३० धावा उभारल्या. ऑस्ट्रेलिया सध्या ७३ धावांनी आघाडीवर आहे.


समन्वय साधत धाव काढताना ॲलेक्स कॅरी व स्टीव्ह स्मिथ

श्रीलंकेचा पहिला डाव ९७.४ षटकांत सर्वबाद २५७ धावांवर आटोपला. प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात निराशाजनक झाली. ऑस्ट्रेलियाने आपले तीन महत्त्वपूर्ण मोहरे २४.५ षटकांत अवघ्या ९१ धावांत गमावले. सलामीवीर ट्रॅव्हिस हेड (२१), उस्मान ख्वाजा (३६) व मार्नस लॅबुशेन (४) लवकरच बाद झाल्यानंतर मात्र स्टीव्ह स्मिथ व ॲलेक्स कॅरीने ऑस्ट्रेलियाचा डाव सावरला व संघाला सुस्थितीत आणले. या दोघांनी दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करत आपापले शतक साजरे केले व संघाला ८० षटकांत ३ बाद ३३० धावा उभारून दिल्या. स्टीव्ह स्मिथने २३९ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह नाबाद १२० धावांची, तर ॲलेक्स कॅरीने १५६ चेंडूंत १३ चौकार व २ षट्कारांसह नाबाद १३९ धावांची खेळी केली (वृत्तसंस्था)

# श्रेयसला फलंदाजीत कायमस्वरुपी स्थान न मिळाल्यामुळे पॉण्टिंग आश्चर्यचकित

**कटक, ७ फेब्रुवारी**

उपखंडीय खेळपट्ट्यांवर फिरकी गोलंदाजांवर वर्चस्व गाजवण्याची क्षमता पाहता श्रेयस अय्यरला भारताच्या फलंदाजी क्रमवारीत कायस्वरुपी स्थान न दिल्याबाबत ऑस्ट्रेलियन दिग्गज रिकी पॉण्टिंगने आश्चर्य व्यक्त केले.





२०२३ मध्ये वन-डे विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारताच्या धावसंख्येतील अय्यर हा एक महत्त्वाचा खेळाडू होता. मधल्या फळीतील फलंदाज अय्यरने ५३० धावा करून जागतिक स्पर्धेत सातव्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून उदयास आला. गुरुवारी नागपूर येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडविरुद्ध ३६ चेंडूत ५९ धावा करून त्याने वन-डे क्रिकेटमधील आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली.

देशांतर्गत क्रिकेटमध्येही ३० वर्षीय श्रेयसने या हंगामात विजय हजारे चषकामध्ये मुंबईसाठी दोन शतके झळकावली आहेत.

गत काही वर्षात तो भारताच्या संघाबाहेर आहे हे पाहून मला थोडे आश्चर्य वाटले. २००३ साली भारताने विश्वचषक जिंकला, तेव्हा तो मधल्या फळीत सुंदर खेळला होता व त्याने फलंदाजी क्रमवारीत आपले स्थान जवळपास निश्चित केले होते. त्याने स्वतःच आपले स्थान निर्माण केले होते, असेही पॉण्टिंग म्हणाला.

श्रेयसच्या पाठीला दुखापत झाली व तो संघाबाहेर गेला, परंतु या वर्षीचा त्याचा देशांतर्गत हंगाम उत्कृष्ट राहिला आहे.

उजव्या हाताचा फलंदाज श्रेयस याने गच वर्षी कोलकाता नाईट रायडर्सना २०२३ च्या आवृत्तीत पाठीच्या दुखापतीमुळे श्रेयसला मुकावे लागले होते. गत वर्षी कोलकाता नाईट रायडर्सना त्यांचे तिसरे आयपीएल जेतेपद मिळवून दिले. १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान व दुबईमध्ये सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स स्पर्धेत श्रेयस अय्यरची भरभराट होईल, असे रिकी पॉण्टिंगला वाटते.

पंजाब किंग्जचे प्रशिक्षक असलेले पॉण्टिंगने आगामी आयपीएल हंगामासाठी अय्यरला २६.७५ कोटी रुपयांना विकत घेतले. पीबीकेएसमध्ये मुंबईच्या खेळाडूला पाहून तो आनंदित आहे, कारण फ्रॅन्चायझी आपले पहिले आयपीएल विजेतेपद जिंकण्याच्या तयारीत आहे.

धडाकेबाज फलंदाज विराट कोहलीच्या तंदुरुस्तीबाबत बीसीसीआयकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया मिळाली नाही, पण अनेक माध्यमांच्या वृत्तानुसार कटक येथे रविवारी होणाऱ्या वन-डे सामन्यापूर्वी कोहली तंदुरुस्त होऊ शकतो. जर तो तंदुरुस्त असेल तर तो अंतिम एकादशचा भाग होईल, त्यामुळे एका खेळाडूला बाहेर बसावे लागणार आहे. अशा परिस्थितीत श्रेयस अय्यरला विश्रांती दिली जाण्याची दाट शक्यता आहे, परंतु याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कालव्यात पाणी सोडा; अन्यथा जमिनी परत द्या!

## शेतकऱ्यांच्या आक्रमकतेनंतर पाणी सोडण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

आमच्या दोन पिढ्या पाण्याच्या प्रतीक्षेत गेल्या. आता तिसरी पिढीही प्रतीक्षेतच आहे. तिसऱ्या व भावी पिढीसाठी तरी कॅनॉलद्वारे पाणी सोडून त्यांच्या जीवनात आनंद फुलवा, अन्यथा ५५-६० वर्षांपूर्वी कालव्यासाठी संपादित केलेल्या आमच्या जमिनी आम्हाला परत द्या, अशी आक्रमक भूमिका शेतकऱ्यांनी घेतल्यानंतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील रामपूर तलावातून रामपूर, कर्देहळ्ळी, तोगराळी गावासाठी कालव्याद्वारे पाणी सोडण्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी पी. एम. बाबा यांनी दिले.



गुरुवारी, रामपूर तलावाशेजारील महादेव मंदिरात रामपूर लघु पाटबंधारे तलावातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याकरिता आयोजित केलेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत कालव्याला पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले होते. परंतु पाणी सोडण्याच्या आश्वासनानंतर शेतकरी शांत झाले व बैठक यशस्वीरीत्या पार पडली. या बैठकीस सहायक अभियंता आर.एम. वाघचवरे, कालवा निरीक्षक सिध्देश्वर नागणसुरे, ए.एस. पवार, महादेव पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष महांतेश बिराजदार यांच्यासह नानासाहेब सावंत, कर्देहळ्ळीचे उपसरपंच अशोक माने, उद्योजक भरत माने, दीपक पाटील, सामाजिक कार्यकर्ते कृष्णात पवार, भारत शिंदे, मारुती जाधव, श्रीशैल माळी, दत्ता कांबळे, राम माने, नागेश पौळ यांच्यासह रामपूर, शिर्पनहळ्ळी, वडगाव, कर्देहळ्ळी व तोगराळी येथील लाभधारक शेतकरी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरूवातीला राम जाधव, बापू पौळ, मारुती कदम व अन्य लाभधारक शेतकऱ्यांनी पाणी सोडणार नसाल तर कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनी परत देण्याची मागणी करीत अधिकाऱ्यांना बोलण्यास मज्जाव केला. तसेच पाणी सोडण्यात येणारे दरवाजे कायमस्वरूपी बंद केल्याप्रकरणी चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. त्यावेळी उपविभागीय अधिकारी बाबा यांनी आता बंद दरवाजे मोकळे करून येत्या चार दिवसात कालव्याला पाणी सोडू, असे आश्वासन दिल्याने संतप्त झालेले शेतकरी शांत झाले.

### सरपंचांनी फिरविली बैठकीकडे पाठ

गेल्या अनेक वर्षांनंतर रामपूर तलावातून पाणी सोडण्याबाबत निर्णय घेण्यासाठी पाटबंधारे विभागाने आयोजित केलेल्या बैठकीसाठी रामपूर, वडगाव, शिर्पनहळ्ळी, कर्देहळ्ळी, तोगराळी, दिंडूर व धोत्री परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांसह त्या-त्या गावच्या सरपंचांनाही उपस्थित राहण्याबाबत सूचना दिली होती. परंतु पाणी सोडण्याचा महत्त्वाचा विषय असतानाही सर्वच गावच्या सरपंचांनी बैठकीकडे पाठ फिरविली. एकूणच शेतकर्यांचे गेल्या अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पूर्ण होत असताना त्याविषयी सर्वच गावच्या सरपंचांची उदासीनता दिसून आली.

### चार दिवसांत पाणी सोडणार

रामपूर, कर्देहळ्ळी व तोगराळी गावच्या हद्दीतील शेतकर्यांची मागणी विचारात घेता येत्या चार दिवसांत त्या भागाला कालव्याद्वारे साडेपाच किलोमीटर अंतरापर्यंत पाणी सोडण्यात येणार आहे. सध्या कालवा दुरूस्तीचे काम युध्दपातळीवर सुरू असून ते काम तीन दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. दुरूस्तीचे काम होताच चौथ्या दिवशी पाणी सोडले जाईल. यासाठी शेतकऱ्यांनी पाणी मागणीचे अर्ज भरून द्यावेत, असे आवाहन पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी पी.एम. बाबा यांनी दिले.

# कलावंतांनी आरोग्याच्या तंदुरुस्तीबद्दल दक्ष असावे : डॉ. येळेगावकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**



चित्रपट व नाट्य कलावंतांना आपला अभिनय उत्तम व्हावा, असे वाटत असते. ते रंगीत तालीम व प्रयोग सादर करण्यात व्यस्त असतात. त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. म्हणून कलावंतांनी नियमित पुरेसा व्यायाम, पुरेशी विश्रांती, सकस आहार, व्यसनापासून दूर राहणे आवश्यक आहे, असे प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी विचार मांडले.

ते बालरंगभूमी परिषद, शाखा सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, लिमये क्युप्रेशर व क्युपंक्चर केंद्र, अवधूत डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील कलावंतांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरचे अध्यक्ष व माजी आमदार प्रकाश यलगुलवार हे होते.

प्रारंभी नटराजमूर्तीची पूजा करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांनी केले. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी, पराग कुलकर्णी, डॉ. प्रांजली मार्डीकर, नॅबचे पदाधिकारी डॉ. किशोर देशपांडे, बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेचे उपाध्यक्ष सौ अर्चना अडसूळ, सल्लागार ज्योतिबा काटे, कोषाध्यक्ष सुनंदा शेंडगे, कार्यकारणी सदस्य सुभाष माने, सुमित फुलमाडी, अशोक किल्लेदार, किरण फडके, मिलिंद पटवर्धन, संस्थेचे सचिव शशीभूषण यलगुलवार, प्राचार्य नरसिंह आसादे, एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. शिबिरात सोलापुरातील कलावंतांची शुगर तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व्यंकटेश कंची यांनी केली, ब्लड प्रेशर तपासणी, जनरल चेकअप करून उपचार डॉ. योगेश पल्लोलू यांनी केली. क्युप्रेशर व क्युपंक्चर चेकअप व मार्गदर्शन डॉ. मुकुंद लिमये यांनी केले. दंत रोग तपासणी डॉ. प्रांजली मार्डीकर यांनी केली. तपासणी शिबिरात ११० कलावंतांनी तपासणी करून घेतली. सूत्रसंचालन अर्चना अडसूळ यांनी केले तर आभार परिषदेचे सुभाष माने यांनी मानले.

## बेरोजगार संस्थांकडून विनानिविदा; मुनष्यबळ उपलब्ध करून देण्याकरिता मागविले दरपत्रक

**सोलापूर दि. ७ फेब्रुवारी-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या कार्यालयात ६ महिन्याच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने शिपाई तसेच ११ महिन्यांसाठी सफाईगार पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत कार्यरत बेरोजगार संस्थांकडून विनानिवीदा मुनष्यबळ उपलब्ध करून देण्याकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर कार्यालयासाठी २ अकुशल शिपाई व १ अर्धवेळ सफाईगार अकुशल पदांची सेवा आवश्यक असल्याचे सहायक आयुक्त खंदारे यांनी कळविले आहे. तरी जिल्ह्यातील कार्यरत असणाऱ्या तसेच उपरोक्त पदांची सेवा पुरविण्यास इच्छुक असणाऱ्या बेरोजगारांच्या सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांनी आपले दरपत्रक व इच्छापत्र दिनांक १२ फेब्रुवारी रोजी दुपारी ५ वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पार्क चौक, नॉर्थकोट, सोलापूर ४१३००१ येथे प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र.०२१७-२९९२९५६ द्वारे संपर्क साधावा.

## ओबीसी महामंडळाकडून थकीत व्याज दरात सवलत

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

ओबीसी महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण थकित कर्ज रक्कमेचा एक रकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकित व्याज रक्कमेत (५० टक्के सूट) सवलत देण्याबाबतची एकरक्कमी परतावा योजना दि. ३१ मार्च पर्यंत राबविण्यात येत आहे. त्यानुसार, महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक व्ही.डी.लहारे यांनी केले आहे.. अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, सात रस्ता, सोलापूर जिल्हा कार्यालयाशी (दूरध्वनी क्र. ०२१७-२३१२५९५) संबधितांनी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा व्यवस्थापक व्ही.डी. लहारे यांनी केलेले आहे.

## निधन वृत्त...

### शिवशरण बिंदगे



**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील शिवशरण बसवणप्पा बिंदगे (वय ७४) यांचे शुक्रवारी दुपारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. शनिवारी दुपारी दोन वाजता अक्कलकोट येथील आझाद गल्ली येथील राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते अक्कलकोट तालुका माळी समाज संघटनेचे माजी अध्यक्ष होत.

### श्रीमंत धरणे



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

धाराशीव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील बाबुळगाव येथील रहिवासी आणि प्रगतशील शेतकरी श्रीमंत मनाजी धरणे (वय ९१) यांचे निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी ११ वाजता राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. राजवर्धन विद्यालय येथील लिपिक जगन्नाथ धरणे यांचे वडील होत.

### महालिंगप्पा वैरागकर



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

कानेगाव. (ता. लोहार जि. उस्मानाबाद) येथील वयोवर्ध योगी व जोतिषभास्कर कै. महालिंगप्पा (आप्पा) बसलिंगप्पा वैरागकर यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धापकाळामुळे दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ च्या सुमारास निधन झाले आहे. त्यांचा अंत्यविधी दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कानेगाव ता. लोहारा अत्यंसंस्कार विधी करण्यात येणार आहे. सोलापूर येथिल प्रसिद्ध कर सल्लागर ॲड. आनंद गणेश वैरागकर यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पाच मुली, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे

### गंगाधर पुजारी



**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

कणबस गंगाधर (ता. दक्षिण सोलापूर) येथील शेतकरी गंगाधर अडव्यप्पा पुजारी (वय ६३) यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. ते ग्रामदैवत श्री प्रभुलिंगाचे पुजारी होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# अन्नछत्र मंडळातर्फे लता मंगेशकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**



भारतरत्न गानसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या वतीने प्रतिमेला पुष्पांजलीने अभिवादन करण्यात आले.

लतादिदी मंगेशकर यांचे अन्नछत्राचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराजांवर अगदी पुत्रवत प्रेम होते. त्यांची छत्रपतींच्या घराण्यावर उदंड श्रध्दा होती. त्या वेळोवेळी अन्नछत्रास मदत करीत व सदैव मार्गदर्शन करीत होत्या. लतादीदींनी त्यांच्या स्वामी गीतांच्या लाखो सीडी अन्नछत्रास मंडळास मोफत दिल्या आहेत. त्या नेहमी अन्नदानास देणगी देऊन मदत करीत होत्या. न्यासाच्या परिसरातील शिवसृष्टी व शिवचरित्र धातुशिल्प ही संकल्पना त्यांचीच आहे. तसेच त्यांनी स्वत:च्या महागड्या गाड्या (मर्सिडीज व शोव्हरलेट) जन्मेजयराजे भोसले यांना भेट दिल्या आहेत. पं. हृदयनाथ मंगेशकर, उषाताई मंगेशकर, मीनाताई खडीकर, आशाताई भोसले यांच्याशी जन्मेजयराजे भोसले यांची खूप जवळीक आहे.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे, बाळासाहेब देसाई-कुलकर्णी, विश्वस्त संतोष भोसले, नितीन शिंदे, मनोज निकम, पिटू साठे, निखिल पाटील, पुरोहित अप्पू पुजारी, बालाजी कटारे, स्वामीनाथ गुरव, अनगले, शावरेप्पा माणकोजी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, अमित थोरात, रोहन शिर्के, स्वामीनाथ बाबर, गोरख माळी, चंद्रकांत हिबारे, निखील पाटील, गोटू माने, प्रविण घाडगे, प्रशांत साठे, दत्ता माने, शरदराव भोसले, राजू पवार, सर्रास शेख, मैनुद्दीन कोरबू, मल्लिकार्जुन बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, धानप्पा उमदी, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले, अनिल बिराजदार, तानाजी पाटील, श्रीनिवास गंवडी, रमेश हेगडे, संभाजीराव पवार, शिवू स्वामी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, दतात्रय झंपले, पंढरीनाथ लोखंडे, धनंजय माने, नवनाथ सुतार, सुभाष पेठकर, गजेंद्र इंगळे, राजेंद्र झंपले, प्रशांत गुंजले, नामा भोसले, सुमित कल्याणी, खाजप्पा गायकवाड उपस्थित होते.



# 'ए. जी. पाटील'च्या विद्यार्थ्यांचे हिवाळी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या हिवाळी-२०२४ परीक्षेत ए. जी. पाटील तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

या परीक्षेत ८८९ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून ३२७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले; तर २५६ विद्यार्थी उत्तम श्रेणीतून उत्तीर्ण झाले आहेत, तसेच १८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. तसेच तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील कुमारी शोभा बिरादार हिने ९५.७८ टक्के गुण मिळवून महाविद्यानात प्रथम येण्याचा मान मिळवला, द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाचा विद्यार्थी अंकिता शिरसाळ हिने ९५.१८ टक्के गुणासह द्वितीय क्रमांक मिळवला; तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या कुमारी स्नेहा जाधव हिने ९४.९५ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग च्या विद्यार्थिनी कुमारी स्नेहा जाधव, कुमारी मेघना जाधव व कुमारी श्रेया होर्ती; तसेच कॉम्प्युटर इंजिनिअरिंगची अंकिता चव्हाण, पूजा लोणी, शुभम सलगरे व आनंद बगले यांना प्रत्येकी एका विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत.सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेकडून गौरव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री सिद्धेश्वर पाटील तसेच संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए. चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, विभाग प्रमुखांचे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्यास शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर एम. एम. कुलकर्णी, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एन.बी. पवार, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग प्रमुख टी. एल. पाटील, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. एस. लिगाडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस. आर. बागबान, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी व प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे उपस्थित होते.

## माता रमाईंना अभिवादन



### जी. एम. संस्था

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

जी. एम. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मिलिंद नगर बुधवार पेठ येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्धवंदना घेऊन अभिवादन केले. यावेळी जी.एम. संस्थेचे विश्वस्त शशिकांत गायकवाड सामाजिक कार्यकर्ते ब्रह्माजी निकंबे, उत्सव अध्यक्ष हर्षवर्धन बाबरे, आप्पासाहेब बागले, दत्ता शिंदे, मुकेश सोनवणे, आप्पासाहेब गायकवाड,नरेंद्र शिंदे,आभि क्षिरसागर, अविनाश क्षीरसागर, आदित्य वाघमारे,संतोष कदम, अनिकेत तळभंडारे,महेश बनसोडे, अभिनंदन गायकवाड,मिलिंद तळमंडारे, प्रभाकर जगताप,यशपाल कांबळे,निशांत वाघमारे, रुपेश उबाळे, अझहर शेख, निशांत वाघमारे, अजय कोळेकर, नेहाल क्षीरसागर, डॅनी रामगल, रवी कांबळे, गौरव पात्रे, सोहील शिरसे, अकाश जमादार, संतोष गायकवाड उपस्थित होते



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक रजनी राऊळ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक भगवान मुंडे, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, हर्षद चिंचनसुरे, रतन साळवे, आषिकेश लोखंडे, अविनाश शिंदे, रियाज आतार, गुरुप्रसाद तलवार, सचिन जाधवर, ताहीर बिराजदार, हिरा गोरे, भालचंद्र साखरे, नईम मुचाले, सायली ढोले, नाशिर खान, सचिन साखरे आदी उपस्थित होते.



### आदर्श बालक मंदिर

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

आदर्श बालक मंदिर शिवाजी नगर मोदी येथे माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती साजरी करण्यात आले. व्यासपीठावर प्रमुख अतिथी उपाध्यक्षा भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्य सौ धम्मरक्षिता कांबळे यांच्या हस्ते माता रमाई यांचे प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले त्यानी माता रमाई बद्दल गौरवपर कविता व मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्था सचिव अरुणराव गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुनिता गायकवाड, मुख्याध्यापिका सुमन सांगळे, मुख्याध्यापक औदुंबर धोत्रे या सर्व मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या विद्यार्थ्यांनी माता रमाई यांचे कार्य व गौरव आपल्या भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन सांगळे, मुख्याध्यापक औदुंबर धोत्रे व सूत्रसंचालन जनार्दन वाघमारे यांनी केले.



### छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर : छत्रपती शाहू राजे प्रतिष्ठानच्या वतीने माता रमाईंच्या १२७ व्या जयंतीनिमित्त रेल्वे भरतीचे ऑनलाइन फॉर्म मोफत भरण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी स्थानिक महिलांच्या हस्ते माता रमाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थापक देवा उघडे, सचिन वाघमारे , शीलवंत काळे, शशिकांत तळमोहीते ,आकाश इंगळे ,महेंद्र कांबळे ,प्रवीण गायकवाड ,अतिश वाघमारे ,रोहन बनसोडे ,शेखर उबाळे ,शैलेंद्र कांबळे ,वीरेंद्र कांबळे, विशाल शेवाळे ,सोनू गायकवाड ,दीपक बडेकर ,युवराज बडेकर ,मुन्ना वाघमारे व बहुसंख्याने महिला व कार्यकर्ते उपस्थित होते. रेल्वे भरतीच्या मोफत ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



### कामगार शक्ती युनियन कार्यालय

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

महानगरपालिका कामगार शक्ती युनियनच्या वतीने युनियनच्या कार्यालयात त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका कामगार संघटना संघर्ष समिती जनरल सेक्रेटरी कामगार नेते चांगदेव सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भालचंद्र साखरे, आषिकेश लोखंडे, अस्मित दादानवरु आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरास चांदीची फुलदाणी अर्पण

**पंढरपूर, दि.७ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस शुभांगी संजय गुरव यांनी सुमारे ४ किलो वजनाच्या चांदीच्या दोन फुलदाणी अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल मंदिरे समितीच्या वतीने देणगीदार यांचा मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे यांनी श्री विठ्ठलाची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. देणगीदार यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या पुजेवेळी उपयोगी साहित्य उपलब्ध करून देण्याची इच्छा मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे यांचेकडे व्यक्त केली होती. त्याप्रमाणे त्यांनी आज ४१०० ग्रॅम वजनाच्या दोन चांदीच्या फुलदाणी श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी अर्पण केल्या असून, त्याची अंदाजित किंमत ३ लाख ८१ हजार होत आहे. सदर फुलदाणीचा उपयोग देवाच्या पुजेवेळी फुले घेऊन जाण्यासाठी होणार आहे. देणगीदार भाविक जखांवडी तालुका खानापूर जिल्हा सांगली येथील रहिवाशी असून, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या निस्सिम भक्त आहेत.



### डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्यावतीने माता रमाई यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती विश्वस्त व उत्सव समितीच्या वतीने माता रमाई यांच्या जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे माता रमाई व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन समितीच्या सदस्यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी राजाभाऊ सरवदे,राजाभाऊ इंगळे,सुबोध वाघमोडे,प्रवीण निकाळजे,अतुल नागटिळक,नागेश रणखांबे,शिवम सोनकांबळे,सचिन कांबळे व सदस्य,पदाधिकारी,भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दुष्कर्म प्रकरणात तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

कायदा सल्लागाराचे काम देण्याचे आमिष दाखवून दुष्कर्म व अश्लील चाळे केल्याप्रकरणी तिघांवर सदर बझार पोलिसांत ६ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास गुन्हा नोंद झाला आहे. ३९वर्षीय पीडितेने फिर्याद दिली असून ब्रम्हनाथ सुखदेव लांडगे रा.मुंबई, सचिन (पूर्ण नाव नाही), नागेश पाटील (सर्व. रा. वाशी, मुंबई) या आरोपींवर गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना ७ नोव्हेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ दरम्यान सोलापूर, मुंबई या ठिकाणी घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पीडितेस ७ नोव्हेंबर २०२४ रोजी ब्रम्हनाथ लांडगे यांनी मुंबई येथे लिगल अडव्हायझरचे काम देण्याचे आमिष दाखवले. पूना नाका सोलापूर येथून जीपमधून शहरातील एका हॉटेलमध्ये नेत दुष्कर्म केले. त्यानंतर मुंबई येथे बोलावून आरोपी राहत असलेल्या ठिकाणी बोलावून घेत आरोपी ब्रम्हनाथ व त्याचे मित्र सचिन यांनी देखील अत्याचार केला. तसेच सदर ठिकाणी असलेल्या नागेश पाटील यांनी देखील अश्लील चाळे केले असल्याचे पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे.

### पाणी समजून टरपेंटाईन पिल्याने चार वर्षीय बालिका अत्यवस्थ

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

पाणी समजून टरपेंटाईन पिल्याने चार वर्षीय बालिका अत्यवस्थ झाली. इसान अब्दुल खुद्दूस सगरी (वय ४, रा. साखर पेठ, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल झालेल्या मुलीचे नाव आहे. २४ जानेवारी रोजी नई जिंदगी येथील कस्तुरबा नगर येथील नविन गॅरेजच्या उद्घाटनासाठी कुटुंबियांसमवेत गेल्यानंतर इसान हिने पाणी समजून टरपेंटाईन प्राशन केले. त्यामुळे तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. पुढील उपचारासाठी ७ फेब्रुवारी रोजी इरफान शेख यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मुलाकडून वृध्द आईला मारहाण

**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

घरगुती वादातून मुलाने आईला स्टीलच्या रॉडने मारहाण करून जखमी केले. लोचना लक्ष्मण मस्के (वय ६०, रा. तडवळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे जखमी महिलेचे नाव आहे. ६ फेब्रुवारी रोजी दुपारी लोचना मस्के स्वतःच्या शेतात असताना घरगुती कारणावरून मुलगा किरण मस्के याने लोचना यांना स्टीलच्या रॉडने मारहाण केली. यामध्ये लोचना मस्के यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारसाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# देखाव्यांतून घडले माता रमाई, डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे दर्शन

## माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक

## डॉल्बीच्या तालावर थिरकली तरुणाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्ताने आज शुक्रवारी सोलापूर शहरात भव्य आणि दिमाखदार अशी मिरवणूक काढण्यात आली. विविध देखाव्यांद्वारे माता रमाई आणि विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचे दर्शन घडविले. सुमारे ३५ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविला.

माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२७ वी जयंती मोठ्या उत्साही वातावरणात सोलापूर शहरात साजरी करण्यात आली. विविध संस्था - संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. दरम्यान, या जयंतीनिमित्ताने दिमाखदार अशी मिरवणूक काढण्यात आली. विविध संस्था व मंडळांच्या वतीने आकर्षक व प्रबोधनात्मक सजावट करून तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली. पार्क स्टेडियम जवळील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मनोभावे अभिवादन करून या मिरवणुकीस जल्लोषात व उत्साही वातावरणात आज दुपारी ४ वाजता प्रारंभ झाला. गुलालाची मुक्त उधळण करण्यात आली. या मिरवणुकीत डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. मिरवणूक बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा जनसागर लोटला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांसह महिला व समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





सोलापूर : शहरात शुक्रवारी सायंकाळी माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विविध देखाव्यांमधून रमाई अन् बाबासाहेबांच्या कार्याचे दर्शन घडविले. (छायाचित्र केवल तिवारी)

**विविध आकर्षक देखाव्यांद्वारे प्रबोधन :** या मिरवणुकीत देखाव्यांद्वारे प्रबोधनात्मक संदेश देण्यात आला. माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब यांच्या जीवन कार्याचे दर्शन घडविण्यात आले. प्रबुद्ध ग्रुप ( त्याग - दि सारी खाहीशे तुम्हे सन्मान दिलाने हमने अपने बच्चे भी को दिये अधिकार दिलाने असा संदेश देणारा देखावा), बी.के.ग्रुप (लंडन येथे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माता रमाई यांना लिहिलेल्या पत्राचा देखावा), सम्राट युथ फाऊंडेशन (डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माता रमाईला स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगतानाचा देखावा), माता रमाई प्रतिष्ठान (डॉ. बाबासाहेब नावाच्या आकाशगंगेमधील पांढरा शुभ्र चंद्र म्हणजे रमाई असा देखावा), केके कंपनी (महाकाय भीम नावाच्या पाहाडाचा रमा नावाचा कणखर कणा देखावा), संतोष बहुउद्देशीय सामाजिक संस्था (वंशावळ देखावा), प्रज्ञासूर्य प्रतिष्ठान (डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या प्रिय रामू या पत्रव्यवहाराचा देखावा), माता रमाई सामाजिक संस्था (डॉ. बाबासाहेब, कारुण्यमुर्ती रमाई आणि हरणाचे पाडस देखावा) या देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधले. त्याचबरोबर १४ एप्रिल प्रतिष्ठान, मैत्री ग्रुप, प्रबुद्ध ग्रुप, पंचशील तरुण मंडळ, भिमाई प्रतिष्ठान, त्याग मूर्ती रमाई प्रतिष्ठान, सम्राट युथ फाऊंडेशन, रमाई युथ फाऊंडेशन, माता रमाई प्रतिष्ठान, न्यू बुधवार पेठ युवा प्रतिष्ठान, सम्राट अशोक प्रतिष्ठान, बुद्धराष्ट्र प्रतिष्ठान , प्रज्ञा सूर्य प्रतिष्ठान, ए.एस कंपनी , रमाई युथ फाऊंडेशन यांसह विविध ३५ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदवला होता.

**'या' देखाव्यांनी वेधले लक्ष**

माता रमाई सामाजिक संस्था वतीने डॉ. बाबासाहेब, कारुण्यमुर्ती रमाई आणि हरणाचे पाडस या देखाव्याने सोलापूरकरांचे लक्ष वेधले. तसेच बीके ग्रुपच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडन येथे असताना माता रमाई यांना लिहिलेल्या पत्राचा देखावा यासह डॉ. आंबेडकर यांच्या जीवन प्रवासातील अनेक लक्ष वेधक देखावे मंडळांनी सादर केले होते. लक्षवेधक देखाव्यातून समाज प्रबोधन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सरस्वती चौक, मेकॅनिक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सम्राट चौक मार्गे न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे या मिरवणुकीचा रात्री १० वाजता समारोप करण्यात आला. मिरवणूकीसाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी झाली होती.

# घराचे स्वप्न साकार करणारी क्रेडाई

## आ. दिलीप सोपल : बार्शीत क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पोचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

बार्शी शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता बांधकाम क्षेत्रात योग्य नियोजन आवश्यक आहे. नव्या तरुण बिल्डर्सच्या सहभागामुळे रिअल इस्टेट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुणवत्ता आणि स्पर्धा वाढली आहे. या क्षेत्राचा विकास रचनात्मक असावा, याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बांधकाम व्यावसायिक आणि ग्राहक यांच्यातील दुवा म्हणून काम करणारी क्रेडाई ही संघटना घराचे स्वप्न साकार करणारी विश्वासार्ह संस्था असल्याचे प्रतिपादन आ. दिलीप सोपल यांनी केले.

क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पोच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी तहसीलदार एफ.आर. शेख, क्रेडाई राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनिल फुरडे, सिनेअभिनेत्री प्रतिक्षा जाधव, क्रेडाई बार्शी अध्यक्ष सतीश अंधारे, प्रोजेक्ट प्रमुख अमर काळे, तसेच नितीन देशमुख, अमित इंगोले, समाधान पाटील, चेतन शहा, निलेश परमार, भरत परमार, ड. नागेश अक्कलकोटे, ड. विकास जाधव, ड. विक्रम सावळे, रिव्हरनेस्टचे घुले, अश्विनी पवार, भूषण कटारिया आदी मान्यवर उपस्थित होते.क्रेडाई ही संपूर्ण भारतभर कार्यरत असलेली संघटना असून, ग्राहक आणि शासन यांच्यातील दुवा म्हणून काम करते. सर्व बांधकाम नियमांचे पालन करणारी संघटना म्हणून क्रेडाईची ओळख आहे. रेरा कायदा लागू झाल्यापासून ग्राहकांची फसवणूक रोखण्याची जबाबदारी क्रेडाई पार पाडते. त्यामुळे ग्राहकांनी घर किंवा प्लॉट खरेदी करताना क्रेडाई सदस्यांकडूनच व्यवहार करावा, असे आवाहन क्रेडाईचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनिल फुरडे यांनी केले. तसेच एप्रिल महिन्यानंतर रेडीरेकनर दर वाढण्याची शक्यता असल्याने घरांच्या किंमती वाढू शकतात. त्यामुळे सरकारने यावर नियंत्रण ठेवून सामान्य जनतेवर आर्थिक बोजा पडणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

तहसीलदार एफ. आर. शेख यांनी रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी आणि नव्याने घर घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी हा एक्स्पो एक महत्त्वाचा प्लॅटफॉर्म आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या गृहयोजना प्रभावीपणे राबवून गोरगरीब व मध्यमवर्गीयांसाठी परवडणारी घरे, प्लॉट आणि फ्लॅट्स उपलब्ध करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन नीता देव यांनी तर आभार समाधान पाटील यांनी मानले.



**बार्शीचा सर्वांगीण विकास**

एक घर असावे, ही प्रत्येकाची महत्वाकांक्षा असते. बार्शी शहराचा सर्वांगीण विकास होत असल्याने गुंतवणुकीच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. गृहप्रेमींना बांधकाम साहित्य, प्लॉटिंग आणि प्रॉपर्टीविषयी संपूर्ण माहिती एकाच छताखाली मिळावी आणि त्यांच्या घराचे स्वप्न साकार व्हावे, या उद्देशाने या एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे, असे क्रेडाई बार्शी अध्यक्ष सतीश अंधारे यांनी सांगितले.



# बार्शी आगाराचा नव्या बससाठीचा वनवास संपला

## आजी-माजी आमदारांच्या हस्ते बसचे झाले पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

दहा वर्षानंतर बार्शी आगाराचा नव्या बससाठीचा वनवास संपला आहे. कारण बार्शी आगारात नवीन लेलॅन्ड कंपनीच्या बीएस ६ मानाकंनाच्या एकुण १० रा.प. बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी दाखल झाल्या आहेत. सदर बसेसची पूजा आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी तहसीलदार एफ.आर. शेख, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, नागेश अक्कलकोटे, सोलापुर विभागाचे विभाग नियत्रंक अमोल गोंजारी, विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील, यंत्र अभियंता शीतल बिराजदार, विभागीय अभियंता चौधरी, आगार व्यवस्थापक श्रीमती मधुरा जाधवर, सहाय्यक वाहतुक अधीक्षक विजय हांडे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक आकाश नाईक उपस्थित होते. सदर नवीन लेलॅन्ड कंपनीच्या बीएस ६ मानाकंनाच्या १० रा.प. बसेस आल्यामुळे रा.प. बार्शी आगाराचा वाहतुकीचा ताण थोड कमी होणार असुन प्रवाशांना दर्जेदार सोयी सुविधा मिळणार आहेत. सदरच्या बसेस लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला तसेच सोलापुर मार्गावर वापरण्यात येणार आहेत. बसेस मिळण्याकरीता आ. दिलीप सोपल व माजी आ.राजेंद्र राऊत यांनी प्रयत्न केले आहेत.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आगारातील वाहतूक निरीक्षक नितीन गावडे, वाहतुक नियत्रंक जयसिंग परदेशी, आगार लेखाकार गिरीष नवले, वरिष्ठ लिपीक पुरुषोत्तम वाघुलकर, वरिष्ठ लिपीक महेंद्र क्षीरसागर, लिपीक संदेश थोरात, श्रीमती राजश्री राऊत, श्रीमती पल्लवी जाधव, श्रीमती बाली हालमे, श्रीमती रेखा सुपेकर तसेच कार्यशाळेतील यांत्रिक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**वाहतूक कोंडी सोडवा : आ. सोपल**

या कार्यक्रमामध्ये बार्शी बसस्थानकाचे नुतनीकरणाबाबत चर्चा करण्यात आली. नुतनीकरणाकरीता लागणारा उर्वरित निधी शासनाकडुन मिळवुन देण्याबाबत माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आश्वासन दिले. तसेच बसस्थानकाच्या बाहेरील बाजूने वाहतूक कोंडी सोडविण्याकरीताच्या सूचना आ.सोपलांनी दिल्या.

# वार्षिक योजनेंतर्गत वाढीव निधी देणार : उपमुख्यमंत्री

- अजित पवार यांच्याकडून उजनी धरणातील जल पर्यटनाच्या अनुषंगाने आढावा
- आता एक टक्का निधी दिव्यांगासाठी राखीव ठेवण्यात येणार

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे/सोलापूर, दि ७ फेब्रुवारी-**

राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या राज्यस्तरीय वार्षिक योजनांचा आढावा झाल्यानंतर प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ सर्वसाधारण अंतर्गत निधी वाढवून देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्याने अतिरिक्त २०० कोटीच्या निधीची मागणी केलेली असून त्यांना यातील जास्तीत जास्त वाढीव निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी केले.

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, वित्त व नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, आमदार देवेंद्र कोठे, आमदार नारायण पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, प्रीतम कुंटला यांच्यासह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

वित्त नियोजन मंत्री पवार पुढे म्हणाले की सर्व जिल्ह्यांना निधी वाढवून देण्यात येणार आहे, परंतु सर्व यंत्रणांनी मंजूर झालेला निधी १०० टक्के खर्च करण्याबाबतचे योग्य नियोजन करावे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतील मंजूर निधी त्या अंतर्गत प्रस्तावित केलेल्या नाविन्यपूर्ण कामावरच खर्च झाला पाहिजे याबाबत दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसवून घ्यावेत. तसेच यावर्षी पासून जिल्हा वार्षिक योजनेतील १ टक्का निधी दिव्यांगासाठी ठेवण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याप्रमाणेच सोलापूर जिल्हा एकात्मिक प्रारूप आराखड्या अंतर्गत मंजूर केलेल्या २८२ कोटीच्या निधीतून उजनी धरणात प्रस्तावित असलेल्या जल पर्यटन आराखड्याची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्याला ६० टक्के निधी प्राप्त झालेला असून उर्वरित ४० टक्के निधी लवकरात लवकर देण्याची मागणी ही यावेळी त्यांनी केली.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत ८६१.८९ कोटीचा प्रारूप आराखडा समिती समोर सादर केला. शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला. परंतु शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्याच्या एकात्मिक प्रारूप आराखडा अंतर्गत मंजूर २८२ कोटीच्या निधीतून उजनी धरण जलपर्यटन, विनयार्ड पर्यटन, कृषी व धार्मिक पर्यटन अंतर्गत सद्यस्थिती बाबत तसेच पंढरपूर येथे दर्शन मंडप व स्कायवॉक उभारण्यात येणाऱ्या १२९.४९ कोटी रुपयांच्या कामाची सद्यस्थितीची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.





**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता**

**राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा - ६६१.८९ कोटी, यंत्रणांची मागणी-१६१०.९० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत-६६१.८९ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी-२०० कोटी, एकूण आराखडा-८६१.८९ कोटी.**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK


# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## संचिता तुपदौरुचे भरतनाट्यम् परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**
अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्याकडून घेण्यात आलेल्या भरतनाट्यम् विशारद पूर्ण परिक्षेमध्ये सह दिवाणी न्यायालय क. स्तर, पंढरपूर येथे कार्यरत लघुलेखिका सुषमा तुपदौरु आणि श्री. सुहास महादेव तुपदौरु यांची कन्या संचिता सुहास तुपदौरा हिने यश मिळविले आहे.

जिल्हयातील पहिले भरतनाट्यम् विशारद रघुनाथ गड्डुम यांच्या श्री नटराज नृत्य संगीत विद्यालयातून तिने प्रशिक्षण घेतलेले आहे. रघुनाथ गड्डुम, मोनिका द्यावनपल्ली गड्डुम, लतिका बल्ला गड्डुम यांच्या म ार्गदर्शनाखाली डिसेंबर २०२४ मध्ये विशारद पूर्णची लेखी आणि प्रात्यक्षिक परिक्षा देऊन प्रथम श्रेणीतून ती उत्तीर्ण झाली आहे. ती सध्या पीएसपीएम. महिला होमिओपेथिक वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे बीएचएमएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. वयाच्या पाचव्या वर्षांपासून संचिता ही भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेत आहे. विशारद पूर्ण होण्यासाठी लागणा-या सातही परिक्षा प्रथम श्रेणीतून उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### शिवतेज शिवजन्मोत्सव युवक मंडळ अध्यक्षपदी मिथुन कामत

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
नवीपेठ येथील शिवतेज शिवजन्मोत्सव युवक मंडळ अध्यक्षपदी मिथुन कामत यांची निवड झाली. संस्थापक अजित शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मिटिंगमध्ये नूतन पदाधिकारी निवड करण्यात आली. यावेळी शिवजयंती निमित्ताने विविध उपक्रम घेण्याचे ठरवण्यात आले. व्यापारी, महिला तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर खेळाडू यांच्या हस्ते रोज पूजा करण्यात येणार आहे.



तसेच १९ फेब्रुवारी रोजी प्रसादवाटप तसेच विविध उपक्रम साजरे करण्यात येणार आहे. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नवीपेठ परिसरातील व्यापारी, कार्यकर्ते, पदाधिकारीउपस्थित होते. सुजित शिंदे यांनी प्रास्ताविक केले व निलेश शिंदे यांनी आभार मानले. अन्य पदाधिकारी असे : उपाध्यक्ष: अभिषेक फताटे, निलेश बलरामनवर, खजिनदार: विश्वजित शिंदे, सचिव: महेश ताकभते, कार्याध्यक्ष: गणेश परदेशी, कार्यक्रम प्रमुख:- राजू खुर्द, राम चंद्रबन्सी, सल्लागार : उमेश ताकभते, मनोहर दासरी, उमेश मोहिते, राजकुमार परदेशी.

### पत्नीस लाकडाने मारहाण; पतीविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
घरगुती वादाचा राग मनात धरून पत्नीस लाकडाने डोक्यात मारहाण करणाऱ्या पतीविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रत्नाबाई हर्षवर्धन नागशेट्टी (वय ३४, रा. कलावती नगर, अविनाश नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन हर्षवर्धन सुभाष नागशेट्टी याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ फेब्रुवारी रोजी दुपारी कलावती नगर येथे सकाळी झालेल्या घरगुती वादाचा राग मनात धरून रत्नाबाई यांना पती हर्षवर्धन याने शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण करीत लाकडाने डोक्यात मारून जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### कुंभारीजवळ बुलेटच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
कुंभारीजवळ राँग साईटने आलेल्या बुलेटच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी झाला. म. शकील इलाईबक्ष सालार (वय ६२, रा. शिवगंगा नगर, मजरेवाडी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी म. शकील सालार हे अक्कलकोट ते सोलापूर दुचाकीवरून येत होते. कुंभारीजवळ राँग साईडने आलेल्या बुलेटने सालार यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये सालार हे जखमी झाल्याने त्यांना मुलगा साकिब सालार याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पूर्व वैमनस्यातून मारहाण

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
पूर्व वैमनस्यातून लाकडाने मारहाण केल्याने एकजण जखमी झाला. सुरेश प्रभाकर हावळे (वय ४६, रा. अर्जुनसोंड, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. ६ फेब्रुवारी रोजी रात्री सुरेश हावळे हे अर्जुनसोंड फाटा येथील येरमाळा हॉटेल येथे जेवण्यासाठी गेले होते. त्यावेळी मागील भांडणाचा राग मनात धरून छग्या हावळे व इतर ५ जणांनी सुरेश हावळे यास लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये सुरेश हावळे जखमी झाल्याने त्यास पत्नी रेखा हावळे हिने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मला बघून दगड मारतो का म्हणत तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
मला बघून दगड मारतो का असे म्हणून तरूणास लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करण्यात आली. बसवराज गेनसिध्द स्वामी (वय ३५, रा. शिंगडगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. १ फेब्रुवारी रोजी स्वतःच्या शेतात बसवराज स्वामी हे पक्ष्यांना दगड मारत होते, त्यावेळी तु मला बघून दगड मारतो का असे म्हणून मल्लय्या स्वामी याने लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण केली. यामध्ये बसवराज यांच्या सर्वांगास मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# माघी यात्रेसाठी चार लाख भाविकांची पंढरीत मांदियाळी

## पदस्पर्श दर्शनासाठी लागताहेत चौदा ते पंधरा तासांचा कालावधी





पंढरपूर : नगरप्रदक्षिणा रस्त्यावर शुक्रवारी दिंड्यांची माघी दशमी निमित्ताने नगरप्रदक्षिणेसाठी गर्दी दिसत होती. तर दुसऱ्या छायाचित्रात नगरप्रदक्षिणा रस्त्यावर नाथचौकात शुक्रवारी नगरप्रदक्षिणा करणाऱ्या भाविकांना गाड्यांच्या वर्दळीमुळे वारंवार वाहतूक कोंडी होऊन निर्माण झालेल्या गर्दीचा भक्तांना त्रास सहन करावा लागत होता. (छायाचित्र: उमेश टोमके, पंढरपूर )

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ फेब्रुवारी-**
माघी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या विविध रेल्वे, एसटी आणि खासगी वाहनांमधून सुमारे चार लाख भाविक येथे दाखल झालेले आहेत. विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांना सुमारे चौदा ते पंधरा तासांचा कालावधी लागत आहे. माघी यात्रे निमित्त विठ्ठलरुक्मिणी मंदिरावर आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली आहे.

राज्याच्या विविध भागातून संतांच्या लहानमोठ्या दिंड्याचे पंढरीनगरीत आगमन होवू लागलेले आहे.विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची रांग शुक्रवारी (ता.७) सकाळी गोपाळपूर रस्त्यावरील सर्व आठव्या क्रमाकांच्या पत्राशेड मध्ये गेली होती. मुखदर्शनासाठी देखील भाविकांची रांग लागलेली दिसत आहे. माघी यात्रेतील मुख्य एकादशीचा सोहळा शनिवारी (ता.८) रोजी संपन्न होत आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांमुळे सध्या पंढरीनगरीतील विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा वाळवंट, स्टेशन रस्ता आणि पासष्ठ एकर परिसर फुलून गेलेला दिसत आहे. चंद्रभागेच्या पात्रात येथील बंधाऱ्यामधून पाणी सोडल्यामुळे पुरेसा पाणी साठा नदीपात्रात उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे भाविकांना चंद्रभागा स्नानाची पर्वणी आनंदाने लुटता येत आहे. वाळवंटा मध्ये भाविकांचे स्नाना नंतरचे पुजा, हरिपाठ वाचनाचे दैनंदिन नित्य कार्यक्रम सुरु आहेत.

### प्रदक्षिणा मार्गावर चारचाकी गाड्यांची वर्दळ

मोठ्या यात्रांच्या वेळी नगरप्रदक्षिणा मार्ग तसेच चौफाळ्याच्या आतील (जुना गावठाण किंवा मंदिर परिसर) बाजूस चारचाकी वाहनांना बंदी करणे गरजेचे आहे. यावर्षी पोलिसांकडून बऱ्या पैकी याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. मात्र तरी देखील शुक्रवारी नगरप्रदक्षिणा मार्गावर नाथचौक परिसरात चारचाकी वाहने बिनदिक्कत फिरताना दिसत होती. त्यामुळे नगरप्रदक्षिणा करणाऱ्या वारकरी भाविकांना याचा त्रास सहन करावा लागत होता. विशेष म्हणजे या भागात वाहतूक पोलिस देखील तैनात करण्यात आलेला असून तो चक्क हाताची घडी घालून नुसते पाहण्याशिवाय दुसरे काहीही करु शकत नव्हता असे दिसुन आले. निदान शनिवारी एकादशीच्या दिवशी तरी नगरप्रदक्षिणा चालू असताना चारचाकी वाहने नगरप्रदक्षिणा रस्त्यावर फिरणार नाहीत, जेणे करुन त्याचा भाविकांना त्याचा त्रास होवू नये याची दक्षता तरी पोलिसांनी घ्यावी अशी अपेक्षा वारकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

### पोलिसांचा मोठा बंदोबस्त

शहरात विठ्ठल मंदिर, वाळवंट, पत्राशेड, पदस्पर्श दर्शन रांग, मुखदर्शन रांग, पासष्ठ एकर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आदी गर्दीच्या ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

### पदस्पर्श रांगेत सातत्य नाही

विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शन रांग खूपच रेंगाळत आहे. दर्शन रांगेत सातत्य रहात नसल्याने दर्शन रांग वारंवार खोळांबत असल्याचे दर्शन रांगेतीलभाविकांमधून सांगितले जात आहे.

### शहरातील मठ, धर्मशाळांमधून वारकऱ्यांची लगबग

येथील गजानन महाराज मठ, संत तनपुरे महाराज मठ, कैकाडी महाराज मठातून तसेच मंदिर समितीचे सुमारे तीनशे खोल्यांचे भव्य भक्तनिवास, या बरोबरच मंदिर समितीच्या वेदांत, व्हिडीओकॉन तसेच रेल्वेस्टेशन जवळील भक्तनिवास (पर्यटक निवास) या मधुन देखील भाविकांची वर्दळ वाढल्याचे दिसत आहे.

### ६५ एकरात राहुट्यांची गर्दी

चंद्रभागा नदीच्या पैलतिरावर वसविलेल्या पासष्ठ एकर परिसरात काही दिंड्या सध्या मुक्कामासाठी दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे या परिसरात राहूट्या उभारण्याच्या कामात वारकरी व्यस्त दिसत आहे.

### छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची दुकाने सज्ज

यात्रेसाठी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच प्रदक्षिणा मागार्वर छोट्या मोठ्या व्यावसायीकांनी आपली दुकाने थाटलेली दिसत आहेत. गेले एक दोन दिवस रात्रभर् मेहनत घेवून आपल्या दुकानांमधून आकर्षक पध्दतीने त्यांनी मालाची मांडणी केलेली दिसत आहे. या मध्ये प्रासादिक वस्तु, फोटोफ्रेम, देवतांच्या ताब्या पितळेच्या मुर्ती, तुळशीच्या माळा, विविध धामिर्क ग्रंथ, सी.डी कॅसेट आदी दुकानांचा समावेश आहे. ही सर्व दुकाने विक्रीसाठी सज्ज झालेली आहेत.

या बरोबरच वाळंटात महाराज मंडळींच्या विविध फडावर सुरु असलेल्या भजन, कीर्तन तसेच प्रवचनाच्या कार्यक्रमा मध्ये वारकरी भाविक सहभागी होताना दिसत आहेत.

# जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी लावा

## 31 मार्चपर्यंत मुदत

## अन्यथा 1 हजार रुपये दंड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
राज्यातील एक एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (हाय सिक्युरीटी नंबर प्लेट एचएसआरपी) बसवून घेणे बंधनकारक आहे. मात्र, आतापर्यंत दीड कोटी जुन्या वाहनांपैकी सुमारे एक लाख वाहनांनाच नवीन क्रम ांकाची पाटी लावल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने तातडीने अंमलबजावणीचे आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार वाहनधारकांनी ३१ मार्चपूर्वी एचएसआरपी न लावल्यास एक हजार रुपयांचा दंड आकारण्याचा निर्णय प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) घेतला आहे. वाहनांची ओळख पटविणे, वाहन क्रमांकाच्या पाट्यांमध्ये होणारी छेडछाड थांबविण्यासाठी; तसेच वाहनांचा वापर करून होणारे गुन्हे रोखण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने वाहनांना उच्च सुरक्षा क्रमांक पाटी बंधनकारक करून राज्यांना अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यात आरटीओच्या नोंदणीनुसार एक एप्रिल २०१९ पूर्वीची तब्बल दीड कोटी जुनी वाहने आहेत.

### अशी करा नोंदणी

अर्जदाराने transport. maharashtra. gov. in या संकेतस्थळावर जावे. अर्जासह पुढे जाण्यासाठी तुमचे कार्यालय निवडा. वाहनाचे पहिले ४ अंक टाकावे. आरटीओ कार्यालयीन कक्षेनुसार विक्रेत्याचे संकेतस्थळ निवडावे. वाहन घेताना नोंदणी केलेला मोबाइल क्रमांक, वाहनाचा मूलभूत तपशील भरावा. वाहन स्वास्थ्य केंद्राची सोयीनुसार वेळ आणि तारीख निश्चित करावी. ऑनलाइन शुल्क भरावे. निवडलेल्या तारखेनुसार आणि वेळेनुसार संबंधित केंद्रावर उपस्थित राहावे.

उच्च सुरक्षा क्रमांक पाटीची प्रक्रिया राबविताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी केंद्रांची संख्या आणि वाहन स्वास्थ्य चाचणी केंद्रे वाढविण्यात आली आहेत. उपप्रादेशिक कार्यालयांची विभागणी करून कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वाहनधारकांनी ३१ मार्चपूर्वी आधुनिक क्रमांकाची पाटी लावून घ्यावी. अन्यथा एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल.
**- विवेक भीमनवार, परिवहन आयुक्त.**

# महावीर बँकेस बँको ब्लू रिबन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
सोलापूर येथील श्री महावीर अर्बन को ऑप. बँकेस नुकत्याच ॲम्बे व्हेली, लोणावळा येथे झालेल्या सहकारी बँकांच्या परिषदेत उत्कृष्ट आर्थिक कामगिरीबद्दल बँको ब्लु रिबन २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त मुख्य महाव्यवस्थापक भार्गेश्वर बॅनर्जी यांच्या हस्ते व बँको एवीसचे मुख्य संपादक अविनाश शिंत्रे, गॅलेक्सी पुणेचे संस्थापक अशोक नाईक यांच्या हस्ते महावीर बँकेचे विद्यमान चेअरमन दीपक मुनोत यांनी पुरस्कार स्वीकारला.

जिल्ह्यात ५ शाखांद्वारे कार्यरत असणाऱ्या महावीर बँकेच्या ५०० कोटींच्या ठेवी आहेत. बँकेस (फायनान्शिअल साउंड अँड वेल मॅनेजड बँक) या वर्गवारी मध्ये रिझर्व बँकने समाविष्ट केलेले आहे. डीजीटल बँकिंगकडे वाटचाल करीत असताना बँकेने मोबाईल बँकिंग, णझख या सारख्या ग्राहकाभिमुख सेवा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. सध्या बँकेच्या स्वमालकीच्या ४ वास्तू आहेत, बँकेने सभासदांना सतत १० टक्के लाभांश दिलेला आहे तसेच बँकेस सतत ऑडीट वर्ग अ प्राप्त झालेला आहे. बँकेचे कार्यक्षेत्र सोलापूर तसेच पुणे, धाराशिव, अहमदनगर, सांगली, सातारा येथे विस्तारित करण्यास मान्यता मिळालेली आहे.



# अग्निशामक दलाने ९ महिन्यांत विझविली २१८ ठिकाणची आग

## आगीमध्ये ५१ कोटी ५७ लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**
निष्काळजीपणामुळे आगी लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्याच्या कालावधीत सोलापुरात २१८ ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या असून यामध्ये नागरीकांचे ५१ कोटी ८७ लाख ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

सोलापुरात नागरीकांच्या मालमत्तेला कोणत्याही प्रकाराच्या घटनेमुळे आग लागल्यास ती विझविण्यासाठी अग्निशामक दल कार्यरत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होते. अनेकदा हलगर्जीपणामुळे आग लागते. आग लागल्यानंतर प्राथमि क उपाययोजना न केल्यामुळे अग्निशमन विभागाला आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागतात. पाणी फवारण्याबरोबरच अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करून विविध प्रकारांच्या आगी आटोक्यात आणल्या जातात. एखाद्या ठिकाणी आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर कमीत कमी वेळेत घटनास्थळी पोहचणे हीदेखील मोठी कसरत असते.







सोलापूर महानगरपालिकेकडे असलेल्या अग्निशामक विभागात अधिकारी कर्मचारी मिळून ९० जणांच्या नियुक्तीला मंजुरी आहे. परंतु, सध्या केवळ ५४ फायरमन या विभागात कार्यरत आहेत. सोलापूर महानगरपालिकेचे सोलापूर शहरातील विविध ५ ठिकाणी अग्निशामक दलाची केंद्रे आहेत. तर देगावजवळ नविन केंद्र प्रस्तावित आहे. महानगरपालिकेकडे एकूण ५ वॉटर टँकर, २ फोम टँकर, १ रेस्क्यू व्हॅन, १ फोर्टेबल पंम्प व्हॅन आहे. एक बंब एकूण चार बंब शहरात आहेत. शहरातील आगीच्या घटनांसाठी अग्निशमन विभागाची मोफत सेवा दिली जाते.

### एप्रिल ते डिसेंबर २०२४ मध्ये लागलेल्या आगीच्या घटना व झालेले नुकसान


| महिना | आगीचे कॉल | झालेले नुकसान |
|---|---|---|
| एप्रिल | ५० | ५०,३२,२०,०००/- |
| मे | ४७ | १४,२५,०००/- |
| जून | १५ | ७०,०००/- |
| जुलै | ०७ | २०,५०,०००/- |
| ऑगस्ट | ११ | १०,४०,०००/- |
| सप्टेंबर | १५ | निरंक |
| ऑक्टोबर | २१ | ४३,००,०००/- |
| नोव्हेंबर | ४४ | ५७,५०,०००/- |
| डिसेंबर | ८ | ९,००,०००/- |

सोलापूर महानगपालिच्या अग्निशामक दलामध्ये कर्मचाऱ्यांची नव्याने भरती करण्यात आलेली आहे. दलामध्ये आता लवकरच नव्याने १३ जणांची भरती होणार असून त्यानंतर सोलापर अग्निशामक दलामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवार नाही. अग्निशाम दलाचे आधुनुकीकरण करण्यासाठी प्रयत्न करू.
**- राकेश साळुंके, मुख्य अग्निशमन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका.**

# तीन लाखांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**
तीन लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ करून तिला ठार मारण्याची धमकी देऊन माहेरी हाकलून दिल्याप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संध्या बालाजी फुलपाटी (वय २४, रा. लोकसेवा हायस्कुलच्या पाठीमागे, वडार गल्ली, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती बालाजी नरेश फुलपाटी, सासू पद्मावती फुलपाटी, दीर शशिकांत फुलपाटी, नणंद वर्षा विजय गुर्रम (रा. गोदूताई परूळेकर नविन विडी घरकुल नं. १, हॉल शेजारी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२३ जानेवारी २०२१ ते २३ जुलै २०२२ या कालावधीत संध्या या त्यांच्या सासरी गोदूताई परूळेकर नविन विडी घरकुलमध्ये राहण्यास होत्या. त्यावेळी पती व त्याच्या घरातील इतर लोकांनी संध्या हिस लग्नात झालेला खर्च तीन लाख रुपये माहेरून घेऊन ये म्हणून तिचा शारीरीक व मानसिक त्रास देऊन मारहाण केली. तसेच ठार मारण्याची धमकी देऊन माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार ईनामदार पुढील तपास करीत आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२३

**तया स्वांत:करणजिता । सकळ कामोपशांता ।**
**परमात्मा परौता । दुरी नाहीं ।।**

या नाशिवंत देहाला माणूस मी म्हणत असतो. पण प्रत्यक्षात या देहात नांदणा-या आत्म्याला तो ओळखत नाही. ज्याला आत्म्याचा परिचय होतो त्याला भगवंताचे स्थान समजते. तो स्वत:चे अंत:करण जिंकतो. ज्याच्या कामवासना नष्ट झाल्या आहेत, त्याला परमात्मा स्वत:पासून वेगळा वाटत नाही. हे सांगतांना भगवंत म्हणतात, तया स्वांत:करणजिता ! सकळ कामोपशांता ! परमात्मा परौता ! दुरी नाहीं !! ज्याप्रमाणे सोन्यात मिसळलेला हीनाचा दोष नाहीसा झाला म्हणजे खाली फक्त शुध्द सोने उरते. त्याप्रमाणे अंहकाराचा भ्रम नष्ट झाला, की जीवाला नित्य प्राप्तच असलेला ब्रम्हभाव प्राप्त होतो. ज्याप्रमाणे घटाचा आकार नाहीसा झाल्यानंतर त्यातील पोकळीला आकाशात मिळून जाण्यासाठी स्थलांतर करावे लागत नाही. ते आपोआप आकाशात मिसळते. त्याप्रमाणेच देहाच्या ठिकाणी असलेला खोटा अहंकार अज्ञानासह नष्ट झाला म्हणजे, त्याला आपण परमात्मस्वरुप असल्याचे जाणवते. अर्थात परमात्मस्वरुपात विलीन होण्यासाठी त्याला काही वेगळे करावे लागत नाही.आजच्या या ओवीत फार मोठा सिध्दान्त माऊलींनी स्पष्ट केला आहे. आपण म्हणजेच परब्रम्ह हे त्यांनी दाखवून दिले आहे. आपण आणि परमात्मा कांही वेगळे नाही. फक्त आपणाला त्याचा परिचय होत नाही, म्हध्णून त्याला आपण इतरत्र शोधत असतो. नामदेव महाराजांनी म्हटले आहे की, नामदेव कहे सुनेरे धगडा, आतम्देव न पुजौ दगडा. अर्थात आपल्यातच देव आहे, त्याचा शोध घ्यायला पाहिजे. संत कबीरही म्हणतात, तेरा साहब है घर भीतर, बाहर नैना क्यों खोले. माऊलींच्या आपल्यातच देव आहे या वाक्याला इतर संतांनीही दुजोरा दिल्याचे आपणास पाहायला मिळते. आपण या नाशिवंत देहालाच सर्वस्व समजून बसलो असल्याने, परमात्म्याचा शोध आपणाला लागत नाही. जवळी आहे परी भेटेना, असे म्हटल्याप्रमाणे अवस्था होत असते. शोधा म्हणजे सापडेल, ही संतोक्ती आपणाला प्रत्यक्ष कृतीत उतरवावी लागेल. तुज आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी, हे आता आपणाला समजले असल्याने आपण स्वत:चा म्हणजे प्रत्यक्षात आपण कोण आहोत याचा परीचय करुन घ्यायलाच पाहीजे. हा परीयच व्हावा म्हणून आपणाला मार्ग दाखविणारा कोणीतरी भेटला पाहिजे. संत महात्म्याशिवाय हा मार्ग कोण दाखविणार आहे. योग्य मार्गदर्शक किंवा संतपुरुष आपणाला शोधूनही सापडत नसेल तर,संत महात्म्यांचे ग्रंथ आपल्याकडे आहेतच. गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध, कबीरवाणी असे अनेक ग्रंथ आपणाला मार्गदर्शन करु शकतील. ग्रंथ हेच गुरु, म्हटल्याप्रमाणे त्यांना गुरु मानून त्यातून पाहिजे तेवढे सकारात्मक दृष्टीकोण ठेवून घेण्यास हरकत नाही. ग्रंथातून किंवा सदगुरुकडून घेत असतांना, आपला देहाचा अहंकार सोडणे आवश्यक आहे हे मात्र विसरता कामा नये. मीपणा चा अहंकार गेला म्हणजे तो सापडतो. अर्थात, मी गेल्याशिवाय तो येत नाही. आपल्यातून मी गेला म्हणजे, राग, लोभ, मोह, क्रोध, काम, मत्सर हे सर्व आपोआप निघुन जातात. हे सर्व निघुन गेले म्हणजे आपोआप सुख, समाधान, शांती, स्थैर्य आपल्यात निर्माण होऊ लागते.



**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार**
**दि. ८ फेब्रुवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. एकादशी (२०.१६)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - मृग (१८.०६)**
**योग - वैधृति (१४.०३)**
**करण - वणिज (०८.४८)**

**दिनविशेष - चांगला दिवस, माघी वारी यात्रा पंढरपूर जया एकादशी**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. जिवनात यश मिळेल. आज आनंदी दिवस जाईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# ई-केवायसीसाठी १५ फेब्रुवारीची डेडलाईन

## शिधापत्रिकाधारक अन् धान्य दुकानदारांची धावपळ सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ फेब्रुवारी-**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करण्याच्या शासनाच्या सुचना आहेत. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी आधार प्रमाणीकरण ई-केवायसी १५ फेब्रुवारीपर्यंत करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केले असल्याने शिधापत्रिकाधारक अन् रास्त भाव दुकानदारांची एकच धावपळ सुरू झाली आहे.



लाभार्थ्यांचे ई-केवायसी करण्याकरिता गावोगावी कॅम्प आयोजित केले आहेत. या करिता शिधापत्रिकेतील अर्थात कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या नजीकच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष आधार कार्ड दाखवून, अंगठ्याचा ठसा देऊन आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करावयाचे आहे. सदरील प्रक्रिया दि. १५ फेब्रुवारीपर्यंत करावयाची असल्याने लाभार्थ्यांनी जवळच्या रास्तभाव धान्य दुकानामध्ये अथवा कॅम्पमध्ये जाऊन आपल्या अंगठ्याचा ठसा व आधार नंबर देऊन ई-केवायसी करावी. ई-केवायसी केले नाही, तर दि. १५ फेब्रुवारीनंतर धान्य दिले जाणार नाही, असा इशारा दिल्याने आता लाभार्थी व रास्तभाव धान्य दुकानदार ई-केवायसी करण्यासाठी धावपळ करत असल्याचे दिसत आहे.

### रेशनकार्ड नसलेल्या नोंदणीकृत कामगारांना तातडीने शिधापत्रिका देणार

केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत, असंघटीत कामगार ज्यांच्याकडे अद्याप रेशनकार्ड नाही, अशा कामगारांना प्रचलित निकषानुसार विशेष मोहिमेअंतर्गत तातडीने शिधापत्रिका वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत स्थलांतरीत, असंघटीत कामगारांना जिल्ह्यातील सर्व तहसिल कार्यालयामध्ये सुरू आहे. त्यानुसार ज्या व्यक्तींनी स्वत:चे नाव ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत केलेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारच्या शिधापत्रिकेचा लाभ नाही, अशा व्यक्तींनी आवश्यक त्या कागदपत्रांस जवळच्या तहसिल कार्यालयामध्ये संपर्क करून शिधापत्रिका प्राप्त करून घ्यावी.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

## प्रश्नमंजुषा स्पर्धेची उद्या अंतिम फेरी

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील रोटरी क्लब ऑफ सोलापूर द्वारा आयोजित आंतरशालेय प्रश्न मंजुषा स्पर्धेची अंतिम फेरी रविवारी दुपारी ४ वाजता इंडियन मॉडेल स्कूलच्या सभागृहंत संपन्न होणार असल्याची माहिती अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी यांनी दिली आहे.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी २ फेब्रुवारी रोजी मंगळवेढेकर इन्स्टिटयूट येथे आयोजित करण्यात आली होती. एकूण ५० शाळे च्या विध्यार्थी प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता व त्यामधून १० संघांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली अशी माहिती या प्रकल्पाच्या संयोजिका धनश्री केळकर यांनी दिली. अंतिम फेरीत पोहोचलेल्या संघात तीव्र बुद्धिमतेची चुरस पहायला मिळणार आहे विजेत्या संघांना उपविजेत्या संघांना प्रमाणपत्र , स्मृतिचिन्ह सह रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. स्पर्धा नवनीत ट्रेंडर्स व स्मायल्स ३२ दंत चिकित्सा केंद्र द्वारा प्रायोजित करण्यात आल्याची माहिती सचिव ब्रिजकुमर गोयदानी यांनी दिली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक: (४५) सहयोग

१९१० मध्ये डॉक्टर शिक्षणासाठी हेडगेवार कलकत्त्याला गेले होते. तेव्हा देशाची नामांकित क्रांतिकारी संस्था अनुशीलन समिती बरोबर ते जोडल्या गेले. डॉक्टरांच्या महाविद्यालयात तेव्हा नारायणराव सावरकर पण शिकत होते. अर्थात हे दोघे मित्र होते. या समितीचे प्रमुख होते श्री पुलिनबाबू, या दरम्यान डॉक्टरांच्या अनेक क्रांतिकारकांशी गुप्त भेटी झाल्या होत्या. १९१५ मध्ये डॉक्टर बनून नागपूरला परत आले; तेव्हा ते कॉंग्रेसमध्ये सक्रिय झाले. व विदर्भ प्रांतीय कॉंग्रेसचे सचिव झाले. १९२० मध्ये कॉंग्रेसचे देशस्तरीय अधिवेशन झाले. त्यात डॉक्टरांनी पूर्ण स्वतंत्रता हेच ध्येय हवे असे सर्वप्रथम सांगितले होते. १९२१ मध्ये कॉंग्रेसच्या असहयोग आंदोलनात डॉक्टर सहभागी झाले; तेव्हा एक वर्ष जेलमध्ये होते. परंतु अहो आश्चर्यम... जेलच्या बाहेर आले तेव्हा त्यांच्यासाठीच्या स्वागत समारंभात पंडित मोतीलाल नेहरू आणि हकीम अजमल खान अशा नेत्यांनी त्यांना संबोधित केले.

**- क्रमशः**

## नवीन आठ स्कूटर्स केल्या लाँच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी ओला इलेक्ट्रिकने त्यांचा रस वन जेन ३ पोर्टफोलिओ लाँच केला आहे. जेन ३ प्लॅटफॉर्मवर बनवलेल्या या प्रगत स्कूटर्सनी इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाला पुढील स्तरावर नेले आहे.हा पोर्टफोलिओ एसवन एक्स + २ केडब्ल्यूएचसाठी ७९,९९९ रुपयांपासून सुरू होतो, जो एसवन प्रो+ ५.३ केडब्ल्यूएच साठी १,६९,९९९ रुपयांपर्यंत (प्रारंभिक किंमत) जातो.मॅनेजिंग डायरेक्टर,भाविश अग्रवाल म्हणाले. आता जेन ३ पोर्टफोलिओ इलेक्ट्रिक स्कूटर उद्योगाला 'पुढील स्तरावर' घेऊन जात आहे. जेन ३ स्कूटर्सची अतुलनीय कामगिरी आणि सुधारित कार्यक्षमता नवीन बेंचमार्क स्थापित करेल.

## रमाईची लेक पुरस्कारांचे सोमवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील रमाई सेवाभावी बहुउद्देशीय सामाजिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षीपासून रमाईची लेक हा पुरस्कार देण्यात येणार आहे. सोमवार दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती संस्थापक राजा माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमासाठी आ. देवेंद्र कोठे, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड, राज्य उत्पादन शुल्कच्या भाग्यश्री जाधव, संशोधक डॉ. धम्मपाल माशाळकर आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोलापूर शहर जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे. यंदा प्रशासकीय सेवेसाठी नगर अभियंता सारिका अकुलवार, पोलीस विभागातून संजीवनी व्हट्टे, आरटीओ विभागातील निरीक्षक अमृता देशमुख, बालगृह अधीक्षक अश्विनी शिंदे, उत्कृष्ट नगरसेविका वंदना गायकवाड, क्रीडा विभागात जान्हवी चंदनशिवे, समाजसेवेसाठी प्रा. डॉ. अंजना गायकवाड,आरोग्य सेवेसाठी नेत्रतज्ञ डॉ. क्षितिजा पैके, आशा वर्कर आशालता मस्के, पत्रकारिता अश्विनी तडवळकर आणि आदर्श माता म्हणून जमुना लोंढे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस विनोद माने, संजय बनसोडे, शंकर शिंदे, संतोष कदम आदी उपस्थित होते.

## वैज्ञानिक प्रकल्प बांधणी स्पर्धेत अंबिका नगर जिल्हा परिषद शाळा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे घेण्यात आलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रकल्प बांधणी व सादरीकरण स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा अंबिका नगर (ता. उत्तर सोलापूर) शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले आहे. सोसायटी ऑफ आटोमोटिव्ह इंजिनिअर्स इंडिया, महिंद्रा राईज व आविम सोलापूर ओलेम्पिक्स सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील नामवंत शाळा सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत सहभागी होणारी जिल्हा परिषद शाळा अंबिका नगर ही एकमेव जिल्हापरिषद शाळा होती.



पहिल्यांदाच सहभागी होऊन शाळेने जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावले आहे. त्यामुळे सिम्बायसिस इन्स्टिट्यूट पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शाळेची निवड झाली आहे. या स्पर्धेत जेट टॉय स्पर्धेत वैष्णवी कवडे, गणेश एडके, आर्यन कवडे, श्रुती राऊत व आरव बोराडे हे सहभागी होते. त्याचप्रमाणे स्कीमर स्पर्धेत अक्षता राठोड, स्वरा राऊत शहाना शेख,श्रद्धा कारंडे व साहिल सय्यद हे विध्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक शिवशंकर राठोड, शिवाजी वडते, श्रीमती रंजना काटकर, वैशाली गोंदकर, रसिका बंदिछोडे व मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे व आर्किड कॉलेज येथील विद्यार्थिनी स्नेहल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मी कनकधर, प्रा. बी. आर. बिराजदार, प्रा. डी. डी.भोगे व प्रा.एस.एस. काळे यांनी अभिनंदन केले आहे.



## डीसीसी बँकेचे कर्मचारी कानिफनाथ थोरात यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्मचारी कानिफनाथ थोरात हे २७ वर्ष प्रदीर्घ सेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सोलापूर विशेष लेखा परीक्षक वर्ग दोनचे संतोष मानुरकर यांच्या हस्ते कानिफनाथ थोरात व पत्नी सविता थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कामगार नेते चांगदेव सोनवणे, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, पत्रकार नंदकुमार येच्चे, पत्रकार विजय गायकवाड, पत्रकार संजय घोलप, मनपा चतुर्थश्रेणी कर्मचारी पतसंस्थेचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे, जन मंगल पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन नयना पलंगे, मनपा आरोग्य निरीक्षक संघटनचे अध्यक्ष शशी शिरसट, लातूर जिल्हा न्यायालयाचे ॲड. विजयकुमार कनकदर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन कुणाल घोडके आणि भंडारे यांनी केले. याप्रसंगी केरबा माने, दत्ता भोसले उपस्थित होते.

## पनाश अपार्टमेंटचा बिल्डर थेपडे भागीदार असलेल्या पुण्यातील प्रॉपर्टीचा ई-लिलाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापुरातील विजापूर रोडवरील पनाश अपार्टमेंटचे बिल्डर अमित अशोक थेपडे भागीदार असलेल्या पुण्यातील पिरॅमिड एन्टरप्रायजेसने कर्ज न फेडल्यामुळे इंडियन बँकेने जामीनदार/भागीदार विलास अटल यांची प्रॉपर्टी ताब्यात घेतली आहे. ८ कोटी ७५ लाखांच्या वसुलीसाठी ई लिलाव पुकारल्याचे नमूद केले आहे.

सोलापुरातील पनाश अपार्टमेंटचे प्रकरण विविध कारणांनी चर्चेत आहे. सोलापुरातही बिल्डर थेपडे विरुध्द अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. बिल्डर थेपडे हे पिरॅमिड एंटरप्रायजेसमध्ये भागीदार/जामीनदार आहेत. इंडियन बँकेने प्रॉपर्टीचा प्रतीकात्मक ताबा यापूर्वीच घेतला आहे. पिरॅमिड एंटरप्रायजेसमध्ये थेपडे आणि विलास माधव अटल हे बिल्डर उद्योजक आहेत. या प्रकरणात ई लिलाव करण्याची नोटीस बँकेने बजावली आहे. विलास अटल यांच्या मालकीच्या गॅलक्सी वन या कंपनीच्या नावाने खराडी जवळील ७६९ चौ. फुट जागेची मालमत्ता आहे. आता येत्या २१ फेब्रुवारी २०२५ रोजी ई लिलाव पुकारणार आहे.

तसेच मे. हिमालय ट्रेडलिंक्समध्येही अटल भागीदार आहेत. या कंपनीची स्थावर मालमत्ता इंडियन बँकेने ताब्यात घेतली आहे. ही रक्कम ५ कोटी ३८ लाख रुपये आहे. त्यामध्ये अटल यांचे सहकारी कोतवाल हे देखील जामीनदार/भागीदार आहेत. मार्च एंडिंगमुळे बहुतेक बँका कर्ज प्रकरण वसुलीसाठी धडक कारवाई करतात. त्यापैकीच हा एक प्रकार आहे.



## बाणेगाव शाळेत बांधलेल्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बाणेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे बालाजी अमाईन्सने सीएसआर फंडातून स्वच्छतागृह बांधून दिले असून, त्याचे लोकार्पण बालाजी अमाईन्सचे तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार यांचे हस्ते आज करण्यात आले.


या शाळेला स्वच्छतागृह बांधकाम करून मिळावे, अशी मागणी शाळेतील पालक समिती व शिक्षकांनी बालाजी अमाईन्स कंपनीच्या संचालक मंडळाकडे केली होती. त्या अनुसार बालाजी अमाईन्सचे संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी यांनी बालाजी अमाईन्स कंपनीच्यावतीने सी. एस. आर. अंर्तगत नविन स्वच्छतागृहाचे बांधकाम केले. शिक्षिका वंदना गाडे यांनी कंपनीचे आभार मानले. या कार्यकमास बाणेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच लिंबाजी जाधव, उपसरपंच सुयोग कांबळे, सदस्य अनिल पाटील, बाबासाहेब पांढरे, पोलिस पाटील, मधुकर पांढरे, राजन चंदनशिव, उषा मोटे, कविता माशाळ, शिक्षक तुकाराम काळे, अफजल शेख, ज्योती सुरवसे, सारीका कलशेट्टी, दत्तप्रसाद सांजेकर, आंटद, नचिकेत शहा आदी उपस्थित होते.

## सिंहगड महाविद्यालयात 'उमंग'चा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

केगाव येथील एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात उमंग २ के २५ चा समारोप झाला.

एका पेक्षा एक मराठी, हिंदी गाण्यांवर नृत्याविष्कार, ट्रॅडिशनल डे, फनी गेम्स, समूह गायन, लावणी, फॅशन शो आदी कला प्रकार सादर करण्यात आले.




३० रोजी ट्रॅडिशनल इव्हेंट, मिस्टर अँड मिसेस सिंहगड, प्रश्न मंजुषा, वकृत्व, रंगोली, फेस पेंटींग, पोस्टर पेंटींग, फोटोग्राफी, वादविवाद, मेहंदी, पथनाट्य अशा स्पर्धा पार पडल्या.

विजेत्यांना सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, माजी कुलगुरू प्रा.डॉ. शिवाजी पवार, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ. शेखर जगदे, सिंहगड पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य प्रकाश नवले, डॉ. विनोद खरात, डॉ. विजय बिरादार, डॉ. करीम मुजावर, डॉ.प्रदीप तपकिरे, डॉ. शशीकांत हिप्परगी, प्रो. के. एस. पाटील, प्रो. आयेशा अलीम यांच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक देण्यात आले.

जनरल चॅम्पियनशिप (सांस्कृतिक) सामान्य विज्ञान अभियांत्रिकी विभागाने पटकाविला. पथनाट्य मध्ये प्रथम गौरी जिंदे आणि समूह, उपविजेता म्हणून भार्गव कटकम आणि समूह, सोलो सिंगिंग मध्ये प्रथम कीर्तन करवा, उपविजेता साक्षी स्वामी, ग्रुप सिंगिंग मध्ये प्रथम तृप्ती पाटील आणि ग्रुप, उपविजेता रोहित शालघर आणि ग्रुप, सोलो डान्स मध्ये प्रथम मनस्वी पुजारी आणि सहाना लोणीकर, उपविजेता देवश्री अग्निहोत्री आणि जान्हवी वैद्यकर, ग्रुप डान्स मध्ये प्रथम ऋषिकेश देगील आणि ग्रुप आणि उपविजेता गौरी जिंदे आणि भार्गव कमटम ग्रुप, फॅशन शो मध्ये प्रथम स्वरूप आराध्ये आणि ग्रुप तर उपविजेता स्वरूप कामतीकर आणि ग्रुप.

### मिस्टर अँड मिसेस सिंहगड

उमंग २ के २५ मध्ये मिस्टर सिंहगड म्हणून आदित्य नागणे तर मिस सिंहगड म्हणून देवश्री अग्निहोत्री या बनल्या आहेत. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते ट्रॉफी आणि मुकुट घालून त्यांचा सन्मान करण्यात आला.

## संत शिरोमणी आचार्य विद्यासागर महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

संत शिरोमणी आचार्य १०८ श्री विद्यासागर महाराज यांच्या प्रथम समाधी दिनानिमित्त रंगभवन परिसरात शांतीसागर चौकातील कीर्ती स्तंभ येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



यावेळी भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य श्याम पाटील, अभिनंदन विभुते, देशभुषण व्हसाळे, दीपक शेटे, प्रशांत वर्धमाने, प्रथमेश कासार, प्रा.मनिष शहा, सुभाषचंद्र बागेवाडी, हिराचंद कासार, ज्येष्ठ नागरिक संघाच्या रेखा शहा, पंडित उपाध्ये, कोमल पाचोरे, आनंद मेहता उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### नवीन चार कामगार कायदे रद्द करण्याची मागणी

**करमाळा, दि. ७ फेब्रुवारी-**

केंद्र सरकारने दहा वर्षात कामगार क्षेत्रातील संघटित कामगारांचे न्याय, हक्क डावलून भांडवलदारांना पूरक ठरतील अशी धेय्य धोरणे राबवली आहेत. या निषेधार्थ अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी निवेदन देऊन आंदोलन करण्यात आले. यावेळी जाधव म्हणाले की, प्रचलित कामगार कायदे रद्द करून नवीन चार कामगार कायदे केले आहेत कामगार कायद्यात बदल करावा अशी देशातील कोणत्याही कामगार संघटनाची मागणी नव्हती कोरोना काळात देशभर लॉक डाऊन असताना  संसदेत देशाचे विरोधी पक्ष नेते व कोणत्याही विरोधी पक्षाला विश्वासात न घेता केंद्र सरकारने हे कायदे कामगारांवर लादले आहेत नवीन कामगार कायद्यामुळे आर्थिक, सामजिक, कौटुंबिक अस्तित्व धोक्यात आलेले आहे.



### श्रीनाथ विद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सदाशिवनगर, दि. ७ फेब्रुवारी-**

श्रीनाथ विद्यालय व ज्युनियर कॉलेज माळशिरस याठिकाणी बारावीतील विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर बारावीतील विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक व विद्यालयाबद्दल वाटणारा आदर यावेळी व्यक्त केला. त्यानंतर विजय नरसाळे, सचिन बोरावके, प्राचार्य योगेश गुजरे यांनी मनोगत मांडले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख, नगराध्यक्ष विजय देशमुख, संचालक रावसाहेब देशमुख, महादेव माने, गौरव गांधी, निलेश घाडगे, हसन मुलाणी, बाबासाहेब माने, प्राचार्य योगेश गुजर उपस्थित होते.



### टेंभुर्णी येथे पुस्तक अभिप्राय स्पर्धेला चांगला प्रतिसाद

**टेंभुर्णी, दि. ७ फेब्रुवारी-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णीच्या सचिवा शिवमती सुरजाताई बोबडे यांच्या वाढदिवसानिमित्त वाचाल तर वाचाल या उपक्रमांतर्गत वाचलेल्या पुस्तकावर अभिप्राय देणे ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विविध शाळांनी सहभाग घेतला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे, प्राचार्य विकास करळे, सागर खुळे, प्रा. वजाळे, आडणे, अर्जुन खटके, गणेश माडेकर, प्रदीप तांडल उपस्थित होते. प्रा. शक्ती सोनवणे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रास्ताविक नववीतील विद्यार्थिनी अनुष्का सरडे हिने केले, सूत्रसंचालन शिवानी गायकवाड तर आभार सुहाना शेख हिने मानले.




### सी. बी. खेडगी स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे

**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. उद्घाटन श्रीमनिप्र बसवलिंग महास्वामी यांनी केले. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी होत्या. यावेळी तहसीलदार विनायक मगर, दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, गटविकास अधिकारी शंकर कवितके, संस्थेच्या उपाध्यक्षा भारतीताई खेडगी, संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, व्हाईस चेअरमन अशोक हरकूड, सेक्रेटरी सुभाष धरणे, संचालिका पवित्राताई खेडगी, ज्योती धरणे, सुधीर माळशेट्टी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकार सादर केले. सूत्रसंचालन सुनीता हिंडोळे यांनी केले तर प्रतिभा कवडे यांनी आभार मानले.



### पिलीवमधील बारावी विद्यार्थ्यांना निरोप

**पिलीव, दि. ७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे ज्युनिअर कॉलेजच्या बारावी कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना निरोप देणयात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य शिवाजीराव कापसे होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, प्रमोद भैस, संजय पाटील, वाघमोडे, दिघे, शिंदे, ढोबळे, बिराजदार, माने उपस्थित होते. या ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख सचिन पाटील यांनी परीक्षेच्या काळात घ्यावयाची काळजी, पेपर सोडविताना घ्यावयाची काळजी, तसेच कापीमुक्त परीक्षा द्यावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल. याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य शिवाजीराव कापसे यांनी भविष्यात स्पर्धेत टिकण्यासाठी चांगली गुणवत्ता मिळवून चांगल्या ठिकाणी प्रवेश मिळवावा असे आवाहन केले. वाघमोडे यांनी प्रास्ताविक केले.

# सत्, चित्त, आनंद भगवंतांची तीन रूपे

## बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर : मोडनिंब येथे संगीतमय भागवत सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ७ फेब्रुवारी-**

भगवंताचे तीन रूप आहेत. पहिले सत्, चित्त आणि आनंद अशी तीन रूप आहेत. जगताला निर्माण करणे, जगताच पालन करणे ही भगवंताची कार्य आहेत. भगवंताला मनोरुपी पुष्प अर्पण करा, तुम चा वेडा पार होईल. परमात्मा सदस्वरूप आहे. परमात्मा चित्त स्वरूप आहे. आणि परमात्मा आनंद स्वरूप आहे. पण निरामय आनंदाला प्रगट करण्याकरता द्वैत घालवावे लागते. द्वैत जातो तपश्चर्या केल्याने नाही, प्रपंच सोडल्याने नाही, विविध



ग्रंथांचे वाचन केल्याने नाही, मग द्वैताला घालवण्याकरिता महापुरुषांची संगत करावी लागते, असे परम पूज्य बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांनी श्रीमद भागवत कथेच्या विवेचनात सांगितले.

मोडनिंब (ता.माढा) येथे बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांची भागवत कथा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरु आहे. प्रारंभी या संगीतमय कथेचे पुष्प गुंफताना बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांनीकलीयुगामध्ये परमात्म्याचे नाम, भगवंत दर्शन आणि साधुसंगती श्रेष्ठ असल्याचे सांगितले.थोडा वेळ साधूंच्या संगे जीवनाला बदलून टाकतो. थोड्या वेळाचा कुसंग जीवन बरबाद करून टाकते म्हणून कधीच कुसंग करू नका. बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या संगीतमय भागवत कथा सप्ताहाचा आज तिसरा दिवस आहे.बुधवार पासून कथेला सुरवात झाली. राष्ट्रसंत सद्गुरू श्रीपादबाबा यांच्या २७ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्त या संगीतमय सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

### श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

श्री संगनबसवेश्वर मठ येथे सप्ताह पार पडणार आहे. या सप्ताहाचे आयोजन समस्त मोडनिंब ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. रोज सायंकाळी सात ते दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात टेंभुर्णी, मोडनिंब, अरण व बावी, गिड्डेवाडी, आष्टी, तेलंगवाडी, शेटफळ, जाधववाडी, तुळशी, बैरागवाडी,भेंड येथील हजारो भाविक सहभागी होतात. प्रासादिक अमृत वाणीतून कथा श्रवनाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## गोगांव येथे सोमवारी श्री कल्लेश्वर मंदिराचे कळसारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

तालुक्यातील गोगांव श्री कल्लेश्वर मंदिराचा कळसारोहण समारंभ सोमवारी १० फेब्रुवारी रोजी होणार असुन, श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य भगवदपादरु यांच्या हस्ते होणार असून श्री मनिप्र राजशेखर महास्वामी, श्रीमनिप्र बसवलिंग महास्वामी, श्री मनिप्र प्रशांत महास्वामी, श्री मनिप्र शिवलिंग महास्वामी, श्रीषब्र श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी उपस्थित राहणार असल्याचे ट्रस्ट अध्यक्ष अशोक मुलगे यांनी सांगितले.

सलग तीन दिवस धार्मिक कार्यक्रम होणार असून यावेळी खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. सुभाष देशमुख, माजी गृहराज्य मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडकाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, माजी कृषि सभापती मल्लिकार्जुन पाटील, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, माजी जि प. सदस्य शिवानंद पाटील, बसवराज शेळके, भाजपाचे तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, स्वामीनाथ नागुरे, अविनाश मडीखांबे, आनंद



तानवडे उपस्थित राहणार आहेत.

शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ दरम्यान महिला भजन मंडळ यांचे भक्तीसंगीत, सायंकाळी ५ ते ८ पर्यंत दयानंद कॉलेज, सोलापूर राजकुमार कटकधोंड, पोलीस निरिक्षक किरण नीळ-देशमुख यांचा गायनाचा कार्यक्रम तर हभप  वैष्णवीताई भुसाळे यांचे रात्री ८ ते १० वाजता कीर्तन, रविवार ९  रोजी पहाटे ५ ते ८ श्री कल्लेश्वरास रुद्राभिषेक, सकाळी ९ वाजता दांपत्य पूजन, सकाळी १० वाजता आरोग्य शिबीर, पद्मावती माता मल्टिस्टेटतर्फे दु. ४ ते ५.३० वा. हभप काशिनाथ महाराज गुरव यांचे प्रवचन, सायंकाळी ५.३० वा. लक्ष दीपोत्सव श्रीमनिप्र राजशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या सानिध्यात होणार आहे. रात्री ८.३० वा. श्री हनुमान भजन मंडळ, उजनी, व श्री हनुमान भजन मंडळ, खैराट, शिवभजन मंडळ चिंचोळी के. यांचे भजन, संभाजी घरे महाराज, गोराळ यांचे भजन, भारुड व जागरण कार्यक्रम, सोमवारी १० सकाळी ८ वा. श्री कल्लेश्वराचे पालखी व कळस समारंभ, सुहासिनींकडून गंगास्थळ व कुंभ मिरवणूक, हरिभजन मंडळ वेदांत आश्रमशाळा, शेळगांव यांचे भक्तीसंगीत, श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्याय शिवाचार्य यांची वाजतगाजत मिरवणूक व कळसारोहण होणार आहे. अन्नदानसेवा ८ ते १० फेब्रुवारीपर्यंत मल्लप्पा अमृत कलशेट्टी, मधुकर चंद्रकांत सुरवसे, दत्तात्रय हणमंतराव पाटील, रमेश लक्ष्मण बिराजदार हे बजावणार आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन सरपंच वनिता मधुकर सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, खजिनदार प्रदीप जगताप, सचिव संजय सुरवसे यांनी केले आहे.



## पंढरपूर माघवारी पायी दिंडीचे कुरुलमध्ये स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

अक्कलकोट ते पंढरपूर माघवारी पायी दिंडीचे कुरुल येथे गोवर्धन परिवाराकडून स्वागत करण्यात आले. गोवर्धन परिवाराने सत्कार केला.

यावेळी दिंडी चालक श्रीमुख जगदाळे, हभप मारुती महाराज कासार, हभप लक्ष्मी मुळजे, धनराज ढगे-पाटील, अनंत पाटील, बाबुराव पांचाळ, बिदर जिपच्या माजी सदस्या मुक्ताबाई मदने, दिंडीचालक दिनकर पाटील, अप्पाराव चव्हाण, राजेद्र मोरे-पाटील, शशिकांत मोरे-पाटील, व्यंकट पाटील, धोंडीराम पाटील, मधुकर महाराज, शिवाजी केदारे, अण्णाराव पाटील, जगन्नाथ दासीमे, बाळासाहेब मोरे, हरी मुळे, पांडुरंग शिंदे, बाळू कोकरे, पद्माकर पाटील, सुभाष कोकरे, मारुती चव्हाण, मुरलीधर पाटील, बालाजी बिराजदार, मुरलीधर बिराजदार, राजू आवले, सदानंद जाधव, अविनाश जाधव, मंगलाबाई गोवले, मंगलाबाई जाधव, सुधाकर नागदे, चंद्रकांत गवळी, तुकाराम थोराजी, करण पाटील, अमोल ढगे, चित्रसेन ढगे-पाटील आदी सहभागी झाले होते.



## सुस्ते येथे गोल रिंगळ सोहळा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील माघवारीला जाणाऱ्या सर्व दिंडीचे एकत्रीकरण भाविक वारकरी मंडळाच्या माध्यमातून करून प्रस्थान व रिंगण सोहळा सुरु केला आहे. माघ शुद्ध नवमीला मंगळवारी सायंकाळी ५ वा. प्रदीप मोरे महाराज, दगडू डोंगरे यांच्या हस्ते पालखी पूजन झाले. वारकरी प्रथेप्रमाणे नित्यनियमाचे अभंग व भजन झाले. दिलीप घाडगे, अनिल घाडगे, ग्रामपंचायतीने सगळ्यांचे स्वागत केले.

ज्ञानोबा तुकाराम भजन करत श्री दत्त प्रशाला, सुस्ते येथे पोहोचला आणि नंतर मान्यवर व दिंडी प्रमुख यांच्या हस्ते अश्व पूजन केले व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. तुळशी वृंदावनधारी महिला व मृदंगाचे रिंगण झाल्यानंतर विणेकरी रिंगण केले. शेवटी अश्व रिंगण सुरु झाले आणि भाविकांमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले. यामध्ये २३ दिंडी सहभागी झाल्या होत्या.

हा सोहळा पाहण्यासाठी परिसरातील हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. सुधाकर इंगळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. जोतिराम चांगभले, तानाजी बेलेराव, सुरेश पोखरकर, गोरख शिंदे, ज्ञानेश्वर भोसले उपस्थित होते.

## मंगळवेढा बाजार समितीच्या निरीक्षकास जातीवाचक शिवीगाळ; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ७ फेब्रुवारी-**

तू आमच्या विरोधातील कागदपत्र ऑफिसला घेऊन येतो काय? असे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे निरीक्षकांना जातीवाचक शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धकमी दिल्याप्रकरणी गोपीनाथ रामचंद्र माळी (रा. सराफ गल्ली), विष्णूदास बंसीलाल मर्दा (रा. मारवाडी गल्ली), इमाम हुसेन कोकणे (रा. दत्तू गल्ली), महेश रामचंद्र गवळी (रा.मित्रनगर) या चौघाविरुध्द अनुसुचित जाती जमाती कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी दत्तात्रय चंद्रकांत कांबळे (रा. डोणज) हे मंगळवेढा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे निरीक्षक म्हणून काम करीत आहेत. कृषी उत्पन बाजार समितीचे गाळा व प्लॉटच्या संदर्भातील कायदेशीर कामे असतील ते फिर्यादी करत आहेत. वरील आरोपी हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे गाळेधारक असून यांच्या विरुध्द गाळे भाडे मान्य नसले कारणाने त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या विरोधात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था मंगळवेढा यांच्याकडे अपिल दाखल केले आहे. त्या अपिलाची सुनावणी करिता फिर्यादी हे सर्व कागदपत्रे घेवून व बाजार समितीचे सचीव सजिन देशमुख असे दोघे जातात.

दि. २३ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता नमुद प्रकरणाची सुनावणी असल्याने ते दोघे कागदपत्रे घेवून निबंधक कार्यालय येथे दुपारी १२.१५ वाजता गेले होते. सुनावणी झाल्यानंतर फिर्यादी व सचिव सचिन देशमुख हे ऑफिसच्या बाहेर आल्यावर वरील आरोपींनी तु आमच्या विरोधातील कागदपत्र ऑफिसला घेवून येतो काय? असे म्हणून शिवीगाळी,दमदाटी करून तुला लय मस्ती आली आहे काय? असे म्हणत तु नोकरी करायच्या लायकीचा नाही, तू मंगळवेढ्यात कसा राहतो? आम्ही बघून घेतो असे म्हणत दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिली असल्याची दिलेल्या फिर्यादीत कांबळे यांनी म्हटले आहे. याचा अधिक तपास मंगळवेढ्याचे डीवायएसपी विक्रांत गायकवाड हे करीत आहेत.

## द्वेश भावना सोशल मीडियावर पसरवून बहुजन समाजाचा अपमान

### रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ फेब्रुवारी -**

बहुजन समाजाबाबत द्वेशाची भावना सोशल मिडीयावर पसरवून बहुजन समाजाचा अपमान केल्या प्रकरणी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अमरजित पाटील यांच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३, कलम २९९ व अनुसूचित जाती व अनसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ कलम ३(१)(यु) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फिर्यादीनुसार, सुरज मधुकर सरवदे (वय ३५, रा. प्रतिभाताई परिचारकत नगर, टाकळी रोड, पंढरपूर ता. पंढरपूर) यांच्या २०१० पासून एक्स (ट्विटर) या सोशल मेडिया अकांऊट आहे. गुरुवारी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास त्यांचे एक्स अकांऊट ओपन केले. एक्स अकांउटवर अपडेट घेत असताना मला अमरजीत पाटील यांचे एक्स अकांउट चठगएए९२३६११५५ या आय.डी. वरून एक पोस्ट केलेली दिसली. मी ती पोस्ट पाहीली असता त्यावर संत तुकाराम महाराजांच्या ओवीं असल्याचे सांगून घेऊन बहुजन समाजाच्या भावना दुखावणारा मजकूर होता.

दरम्यान ती पोस्ट वाचल्यानंतर अमरजीत पाटील हे बहुजन समाजाबाबत द्वेष भावना व्यक्त करत असल्याचे दिसून आले. तसेच सदर पोस्ट ही गुरुवारी एक्स हॅन्डलवर टाकली होती. सोशल मिडीयावर त्याबाबत चर्चा झाली आहे, त्याबाबत अमरजीत पाटील यांचा निषेध करणा-या पोस्ट व्हॉट्सअप व फेसबुकवर प्रसारीत झाल्या आहेत. पाहणारे लोकांचे मला त्याबाबत फोन आले. समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून समस्त बहुजन समाजाचा अमरजीत पाटील यांनी अपमान केला आहे. यामुळे त्यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली आहे.

## तोपर्यंत प्रारूप विकास आराखड्याची कार्यवाही करू नये

### माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

महापालिकेच्या निवडणुका होऊन नवीन लोकप्रतिनिधींची सर्वसाधारण सभा स्थापित होईपर्यंत सोलापूर शहर प्रारूप विकास आराखड्याची कार्यवाही अथवा अंमलबजावणी करू नये, अशी मागणी माजी महापौर ड. यु. एन. बेरिया यांनी पत्रकार परिषदेत केली आहे

महापालिका निवडणूक झाल्यानंतर नव्या लोकप्रतिनिधींच्या सर्वसाधारण सभेत हा प्रारूप विकास आराखडा मांडावा. त्यावर चर्चा करून लोकप्रतिनिधी शहराला योग्य असा विकास आराखडा तयार करतील, अशी मागणी यावेळी ॲड. बेरिया यांनी केली. केवळ सॅटेलाइटवरून फोटो घेऊन आराखड्याची कॉपी करण्यात आलेले आहे. मागील वीस वर्षाचा अभ्यास करून गरजेप्रमाणे आरक्षण टाकणे आवश्यक होते. परंतु मागील विकास आराखड्यातीलच आरक्षण ठेवण्यात आली आहेत. सोलापूर महापालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक ११०० कोटी रुपयाचे आहे असे असताना ९२१ जागांवर आराखड्यांतर्गत आरक्षण टाकण्यात आले आहेत.

# दर्जेदार उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणेच खरे परिवर्तन

## डॉ. संजय अंधारे : अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी केलेल्या निधीवरुन विधान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

आरोग्य क्षेत्राला वाढीव निधी  पण अजूनही अपेक्षेपेक्षा कमी आहे. सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार उपचार देणे ही काळाची गरज असून त्यासाठी आरोग्य विभागाचा निधी आणखीन वाढला पाहिजे, असे मत बार्शीचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. संजय अंधारे यांनी नुकत्याच अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी केलेल्या निधीच्या संदर्भात केले आहे.

जीडीपीच्या केवळ १.५ टक्के इतकाच आरोग्य खर्च केला जातो. हा आकडा ५



टक्क्यापेक्षा जास्त असायला हवा. परवा पुन्हा एकदा अर्थसंकल्प सादर झाला आणि आरोग्य क्षेत्रासाठी रु. ९९.८५९ कोटींचं तरतूद जाहीर झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत ९.८ टक्के वाढ झाल्याचं सांगितलं जातंय. ऐकायला छान वाटतंय, पण हे खरंच पुरेसं आहे का? अजून बरंच काही करण्याची गरज आहे. यंदा काही चांगल्या योजना जाहीर झाल्यात. डे केअर कॅन्सर सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतलाय आणि काही कॅन्सरवरील जीवनावश्यक औषधांना कस्टम ड्युटीपासून सूट दिलीय. हाच दृष्टिकोन ठेवून पुढे गेलं तर रुग्णांना दिलासा मिळेल. पण खरी अडचण ही की, आपल्याकडे जीडीपीच्या केवळ १.५ टक्के इतकाच आरोग्य खर्च केला जातो. हा आकडा ५ टक्क्यापेक्षा जास्त असायला हवा. फार्मास्युटिकल क्षेत्रासाठी झडख स्कीमअंतर्गत २,४४५ कोटींची तरतूद केलीय. याचा उपयोग देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी होईल. पण सरकारी हॉस्पिटल्स, प्राथमिक आरोग्य केंद्रं यांचं काय? तिथलं चित्र अजूनही वेदनादायक आहे.

### तज्ज्ञ डॉक्टर, प्राध्यापकांचा अभाव

देशभर नवनवीन वैद्यकीय महाविद्यालयं उभी राहतायत. पण तिथं शिकवायला पुरेसे तज्ज्ञ डॉक्टर आणि प्राध्यापकच नाहीत. आरोग्य क्षेत्राचा पाया मजबूत करायचा असेल, तर फक्त इमारती उभारुन चालणार नाही, तर सक्षम शिक्षक आणि प्रशिक्षित कर्मचारी यांचीही भर घालावी लागेल.  केवळ वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या जागा वाढवून प्रश्न मिटणार नसून त्यांना योग्य शिक्षण देणे ही बाब सुनिश्चित करणे हे वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या दृष्टिकोनातून अत्यंत गरजेचे आहे.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सूर्यनमस्कार स्पर्धेत अवंती शिक्षण संस्थेस उपविजेतेपद

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सूर्यनमस्कार स्पर्धेत अवंती शिक्षण संस्थेच्या विध्यार्थांनी उपविजेतेपद संपादिले. यश-रथसप्तमी निमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज शिवस्मारक मंडळ यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत संस्थेच्या ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांना स्मृतिचिन्ह , प्रमाणपत्र व तीन हजार रुपये असे पारितोषिक मिळाले. या खेळाडूना रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या खेळाडूंचा सत्कार अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी लोकमंगल माध्यमिक



प्रशाला अवंती नगरच्या मुख्याध्यापिका शुभांगी साठे उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक अभयसिंह साठे यांनी अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



सोलापूर : आमदार सचिन कल्यानशेट्टी यांच्यामार्फत दि. ५ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासोबत बैठक झाली. बैठकीत संस्थेला प्राप्त झालेले शासनाचे परिपत्रक दि. ३ मार्च २०२४, ५ जुलै २०२४ या दोन्ही परिपत्रकामुळे संस्थेला येत असलेल्या अडचणी उद्योग मंत्र्यांसमोर मांडण्यात आल्या. अडचणींबाबत उद्योग मंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यावेळी सर्व रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. या बैठकीला आ. सचिन कल्यानशेट्टी, संस्थेचे सभासद नितीन बिजर्गी, संस्थेचे मॅनेजर राजगिरी उपस्थित होते.

### पिलीवच्या रणजित तावरे यांची कनिष्ठ कामगार अन्वेषकपदावर पदोन्नती

**पिलीव, दि. ७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रणजित प्रकाश तावरे यांची लिपीक टंकलेखक पदावरुन नुकतीच पुणे येथे कनिष्ठ कामगार अन्वेषक या पदावरती नुकतीच पदोन्नती झाली आहे. यापूर्वी त्यांनी वांद्रे येथे कामगार आयुक्त कार्यालयात सहा वर्ष लिपीक टंकलेखक या पदावर तर दोन वर्ष कामगार विभाग मंत्रालय याठिकाणी कामकाज ग्राहक मूल्य निर्देशांक काढणे तसेच कामगार नोंदणी अधिकारी म्हणुन कामकाज पाहिले आहे. रणजित तावरे यांची नियुक्ती एमपीएससीद्वारे २०१६ मध्ये घेणयात आलेल्या परिक्षेतून झाली होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण पिलीव येथील जिल्हा परिषद शाळेत, हायस्कूलचे शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिलीव याठिकाणी तर पदवीचे शिक्षण अकलुज येथील शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात झाले होते. रणजित तावरे यांच्या या पदोन्नतीबद्दल पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवराकडून रणजित तावरे यांचे अभिनंदन होत आहे.





### टेंभुर्णीतील जिजाऊ ब्रिगेडच्या हळदी-कुंकू समारंभामध्ये ४०० ग्रंथांचे वाटप


**टेंभूर्णी, दि. ७ फेब्रुवारी-**

जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने पुणे विभागीय अध्यक्षा प्रा. मिनाक्षी अमोल जगदाळे यांच्या घरात हळदी-कुंकू आणि तिळगूळ स्नेहमेळावा पार पडला. यावेळी चारशे महापुरुष आणि महानायिकांच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शितलादेवी मोहिते-पाटील, शिवन्यादेवी मोहिते-पाटील, स्नेहल घाडगे, करुणा धुमाळ, हेमलता मुलीक, आशा सावंत, सुवर्णा क्षीरसागर, चव्हाण, गायकवाड, संगीता जगदाळे, भावना देशमुख, पाटील, सुवर्णा शेंडगे, खटके, गोवे, डॉ. अर्चना गवळी, संध्या सावंत, अर्चना सूर्यवंशी, डॉ. अंजली कदम, डॉ. खडतरे, डॉ. श्रद्धा जवानजाळ, डॉ. देवडीकर, डॉ. गांधी, डॉ. बुरुंगुले, डॉ. एकतपुरे, डॉ. प्रीती गांधी आदी उपस्थित होत्या.

### पतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी माहेरच्या तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि. ७ फेब्रुवारी-**

पत्नीला नांदविण्यासाठी पाठवणार नाही. तिचे दुसरे लग्न लावून देणार आहोत असे सांगून वारंवार फोन करुन शारिरीक व मानसिक त्रास देवून तिच्या पती राजेश बाळू शिंदे (वय २५,रा.खडकी) याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सुरेश दुर्योधन काळे,मिथुन दुर्योधन काळे,वैशाली दुर्योधन काळे (सर्व रा.औसारी ता.इंदापूर) या तिघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी दिलमाबाई बाळू शिंदे (वय ६५,रा.खडकी) यांचा मयत मुलगा राजेश बाळू शिंदे (वय २५) याला त्याचे मेव्हुणे तथा वरील आरोपी सुरेश काळे, मिथुन काळे,पत्नी वैशाली काळे आदींनी वारंवार फोन करुन पत्नी वैशाली हिस आम्ही नांदवण्यास पाठविणार नाही, तिचे दुसरीकडे लग्न करुन देणार आहोत,तु आमचेकडे यायचे नाही,आलास तर बघ असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी करुन शारिरीक व मानसिक त्रास देवून त्याला आत्महत्येस दि.२ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता आत्महत्येस प्रवृत्त केले. मयताने राहते घरी दोरीच्या सहाय्याने घराच्या छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे दिलमाबाई शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.




# आता जलजीवन, आयुष्मान कार्डला मिळणार गती

**● मुख्यमंत्र्यांनी विविध योजनांचा घेतला आढावा; जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या विभाग प्रमुखांना सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

प्रधानमंत्री आवास योजनेतील ग्रामीण तसेच शहरी आवास योजनांना गती द्यावी, जलजीवन मिशनची रेंगाळलेली कामे वेगाने पूर्ण करावीत आणि आयुष्मान कार्ड वितरणातील त्रुटी दूर करून कार्डचे वाटप गतीने पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिसीद्वारे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिले होते. त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी लागलीच विभागप्रमुखांच्या बैठका घेवून जिल्ह्यातील वरील योजनांच्या यंत्रणांना ॲक्टिव्ह मोडवर आणले असल्याने आता या कामांना गती मिळणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी केंद्र




व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश प्रशासकीय यंत्रणांना दिले होते.

यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला होता. शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतली होती.आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकुल मार्ट संकल्पना राबविण्यात यावी. यासाठी बचत गटांचे सहाय्य घ्यावे. तसेच आवास योजनांसाठी वाळू




देण्यासंदर्भातील परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात यावे. तसेच महसूल विभागाने गावठाणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. शहरी भागातील आवास योजनांना गती देण्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश द्यावे. आवास योजनांच्या प्रगतीची माहिती नियमित अद्ययावत करावी. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनची मंजुरी, कामे आदी कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगाने करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले होते. यामुळे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा चांगलीच कामाला लागली आहे. आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील रुग्णांना मिळावा, यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावी. तसेच यामधील मानवी हस्तक्षेप विरहित डिजिटल यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत. आयुष्मान कार्डच्या प्रत्यक्ष १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करून आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसाठीही आयुष्मान कार्ड सारखे कार्ड तयार करण्यात यावे, यासाठीही जिल्हा स्तरावरून जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेवून माहिती दिली आहे. जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी जलजीवन मिशन योजनेतील कामे गतीने, कालमर्यादेत व गुणवत्ता पूर्ण करावीत. यासाठी जिल्हा परिषदेचे सीईओ आणि संबंधित अभियंत्यांनाही जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य त्या सुचना देवून या योजनेला गती आणण्याचे आवाहन केले आहे. एकंदरीत, जिल्हाधिकाऱ्यांनी कडक सुचना दिल्याने वरील सर्व योजना जिल्ह्यात गतीने राबविण्यात येण्याची शक्यता आहे.

## आर्थिक अडचणीमुळे बांबू उडीपटू प्रशिक्षणापासून वंचित

**सदलापूरच्या नागम्मा बजेला मदतीची गरज**

### भोपाळ येथे राहणे, भोजन खर्चाची चिंता

**तभा वृत्तसेवा। नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

सदलापूर येथील नागम्मा रविंद्र बजे ही राष्ट्रीय स्तरावरील बांबू उडी या खेळ प्रकारातील विद्यार्थीनी तीवेळा राज्यस्तरावर आणि चारवेळा राष्ट्रीयस्तरावर खेळली आहे. तिची नुकत्याच मध्यप्रदेश भोपाल येथील आंतराष्ट्रीय प्रशिक्षकांच्या अधिपत्याखाली प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

मात्र आर्थिक अडचणीमुळे या प्रशिक्षणापासून ती वंचित राहण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. बांबू उडी खेळात महाराष्ट्रातली एकमेव खेळाडू आहे. तिला महाराष्ट्र आणि भारत देशाचे प्रतिनिधित्व करायचे आहे. मागील वेळेस महाराष्ट्र राज्याकडून मदत नसल्याने मी केरळ राज्याकडून नाईलाजास्तव खेळली आहे. पण माझ्या गावासाठी महाराष्ट्रासाठी मी खेळले तर मला अभिमान वाटेल आणि ती शक्ती खूप मोठी असेल. असे नागम्मा बजे हिने म्हटले आहे. भोपाळ येथील १ वर्ष प्रशिक्षणासाठी राहणे व जेवणाचा खर्च ती करू शकणार नाही. तिची आर्थिक स्थिती अंत्यत बेताची आहे. यामुळे तिला प्रशिक्षणासाठी आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. समाजातील आर्थिक संपन्न दानशूर व्यक्ती सामाजिक संस्था व शासनस्तरावर मदतीसाठी हालचाली होणे नितांत गरज आहे. नागम्मा बजे हिची आर्थिक परिस्थिती ठीक नसून तिला मदत जर मिळाली नाही तर प्रशिक्षणापासून एक राष्ट्रीयस्तरावरील खेळाडू वंचित राहू शकते. बजेची आर्थिक स्थिती पाहता हे सर्व आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. भोपाळ येथे राहणं कठीण आहे. मात्र सर्वांच्या मदतीने हे शक्य होऊ शकते. याकरिता सर्वांनी मदत व प्रयत्न करणे गरजेचे आहे.



## जीसीसी-टीबीसी परीक्षेत क्षितिजा बनसोडे प्रथम

**सूरज साळुंखे द्वितीय, काजल वळकुंडे तृतीय**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे वतीने डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय जीसीसी-टीबीसी (कॉम्प्युटर टायपिंग स्पीड) परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट, अकलूज या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम ठेवत दैदिप्यमान यश प्राप्त केले.

संस्थेतील क्षितिजा बनसोडे हिने कॉम्प्युटर टायपिंग परीक्षा जीसीसी-टीबीसी इंग्रजी ३० श.प्र.मि. या विषयात ९६ टक्के गुण प्राप्त करत माळशिरस तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला, तर याच विषयात सुरज साळुंखे याने ९४.५ गुण प्राप्त करत द्वितीय आणि काजल वळकुंडे हिने इंग्रजी ३० व मराठी ३० या विषयात ९३.५ टक्के गुण प्राप्त करत तालुक्यात तृतीय क्रमांकाचा बहुमान प्राप्त केला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे मार्फत शासकीय, निम-शासकीय विभागातील लिपिक (क्लार्क) पदांच्या भरतीसाठी जीसीसी-टीबीसी मराठी, इंग्रजी व हिंदी ३० व ४० शब्द प्रति मिनिट या विषयांचे कोर्सेस चालविले जात असून वर्षातून दोन वेळेस या परीक्षा घेतल्या जातात व परीक्षा पास झालेले विद्यार्थी सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे आदी विभागातील लिपिक पदांच्या भरतीसाठी पात्र ठरतात.

यश प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे प्राचार्य गजानन जवंजाळ, नितीन दुरणे, किरण भगत, ज्ञानदीप जवंजाळ यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या वतीने प्राचार्य गजानन जवंजाळ यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## लतादीदींच्या गीतांवर डोलले खुदावाडीकर

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ७ फेब्रुवारी-**

खुदावाडी ग्रामस्थांच्या वतीने स्वरसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त खास संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये लतादीदींनी गायलेली अवीट, जुनी, भावगीते, भक्तिगीते गावून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांच्या हस्ते लतादीदींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अणदूर येथील स्वरलता कराओके क्लबच्या गायक कलाकारांनी लता मंगेशकरांनी गायलेली अवीट, जुनी गाणी सादर केली. यामध्ये सचिन ढेपे, रेखा सोनटक्के, प्रशांत व्हरकट, भीमराव गवळी, सरिता ढेपे, केशर जाधवर, ज्ञानेश्वर बोंगरगे, डॉ. कांचन खैराटकर, ऋतुजा भालेराव



व चंद्रकांत गुड्डु यांनी गायनात सहभाग घेतला. रेखा सोनटक्के यांनी गायलेले ये मेरे वतन के लोगो हे देशभक्ती पर अजरामर गीत ऐकून प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. प्रास्ताविक प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले. मनोहर घोडके यांनी सूत्रसंचालन केले. आभार उमाशंकर चिंचोले यांनी मानले. कल्याण करपे, सालगे, राम जवळगे, भास्कर व्हलदुरे आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास निर्मलाताई खजुरे, मिराताई अहंकारी, सुनीता भालेराव, इंदुमती कबाडे, तुकाराम बोगरगे, शिवपुत्र कबाडे, वसंत कबाडे, महादेव चिंचोले आदी उपस्थित होते.

## सांगोला रोटरी क्लबने सप्तरंगी रत्नहार गुंफला

**● डॉ. प्रशांत कोल्हे : सांगोल्यातील कार्यक्रमात प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ फेब्रुवारी-**

सांगोला रोटरी क्लबने यावर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्कार प्रदान करुन सप्तरंगी रत्नहार गुंफला आहे, असे कौतुकोद्गार डॉ.प्रशांत कोल्हे यांनी काढले. ते सांगोला येथे रोटरी क्लबने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब सांगोलाचे चार्टर सदस्य डॉ. प्रभाकर माळी, अध्यक्ष इंजि. विकास देशपांडे, सचिव इंजि. विलास बिले, व्यवसाय सेवा समितीचे डायरेक्टर इंजि. संतोष गुळमिरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विकास देशपांडे यांनी रोटरी तर्फे दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. यावेळी डॉ.प्रशांत कोल्हे यांच्या हस्ते मेडिकल विभाग कुंडलिक मेखले, आरोग्य विभाग सुधामती गंगणे, डाक विभाग सौदागर होवाळ, पशूवैद्यक विभाग डॉ. मनोज कानडे, विद्युत व्यवसाय सेवा चंद्रशेखर दुधनी, वृत्तपत्र वितरण व जनरल स्टोअर्स रविंद्र बोत्रे, बॅंकिंग प्रसाद पाठक या क्षेत्रातील योगदानाबद्दल सप्त्नीक सन्मानित करण्यात आले. तसेच उत्कृष्ठ पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल मोहन मस्के, बेस्ट रोटरी डिस्ट्रिक्ट डायरेक्टर म्हणून इंजि. हमीद शेख, डिवोटेड रोटरी डायरेक्टर म्हणून डॉ. प्रभाकर माळी, पॉल हॅरिसबद्दल प्रतिमा माळी, रत्नप्रभा माळी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे नूतन अध्यक्ष म्हणून गुलाबराव पाटील यांना सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन इंजि. संतोष भोसले व प्रविण मोहिते यांनी केले.




## ध्येय निश्चित करुन विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे : बळीराम साठे

**भारत शिक्षण मंडळाचा बक्षीस वितरण समारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

पारंपारिक शिक्षण घेऊन फक्त पदवी संपादन न करता विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित ते पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण घ्यावे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांनी व्यक्त केले.

वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिक्षण संकुलांचा बक्षिस वितरण समारंभ प्रजासत्ताक दिनी साठे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. प्रारंभी त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष व वडाळा गावचे सरपंच जितेंद्र साठे, उपसरपंच अनिल माळी, राजाभाऊ साठे, दत्तात्रय गायकवाड गुरुजी, सुरेश साठे, प्रभाकर गायकवाड, सुधीर कांबळे, दत्तात्रय गायकवाड,



पांडुरंग नागणे, सी.एम.साठे, यशवंत गायकवाड, अर्जुन नागणे, प्राचार्या डॉ. वैशाली साठे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, मुख्याध्यापक संजयकुमार वाघमारे, बाळासाहेब सुतार, मनोज साठे, जयदीप साठे, दत्तात्रय वीर, संतोष सुभेदार यावेळी उपस्थित होते. आयआयटी उत्तीर्ण झालेला सुरज दिलीप भोसले या माजी विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी या वर्षात विविध पुरस्कार मिळालेले व गुणवत्ता सिद्ध केलेले प्रवीण सुतार, प्रा.स्मिता फंड, संजय साठे, सुधीर केवटे, प्रा.डॉ.बालाजी गंगावणे, प्राचार्य डॉ. शिरीष भोसले, प्रा. डॉ. विकास शिंदे, प्रा.डॉ. परमेश्वर हटकर प्रा.भारती जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. दहावीत प्रथम क्रमांक आलेली वैभवी निकम, बारावी (कला) शाखेतील प्रथम क्रमांक आलेली अश्विनी झाडे, बारावी (शास्त्र) परीक्षेत प्रथम क्रमांक आलेली गायत्री बेळंबे यांना बक्षिसे देण्यात आली. शिवशंकर साबळे, संस्कृती गाडे, प्रज्ञा गाडे, दर्शिल अवचारे, अनुष्का जमदाडे, वेदिका मोहिते, हर्षदा आवताडे या विद्यार्थिनींना यावेळी प्रशस्तीपत्र देण्यात आले. शिवशंकर साबळे या विद्यार्थ्यालाही बक्षीस देण्यात आले. शासनाच्या कुष्टरोग निर्मूल सप्ताहाचे औचित्य साधून आशा सेविका अर्चना कांबळे यांनी सर्वांना कुष्ठरोग निर्मुलनाची शपथ दिली. प्राचार्या डॉ. वैशाली साठे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रतापराव पाटील, दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.

### शिपायाचा मुलगा झाला आयआयटी

माऊली महाविद्यालयातील शिपाई दिलीप भोसले यांचा मुलगा सुरज हा पहिली ते बारावीपर्यंत न्यू हायस्कूलमध्ये शिकला. केरळ येथे जाऊन तो एम.टेक आय.आय.टी उत्तीर्ण झाला. अमेरिकन कंपनीत त्याची निवड झाली. या यशाबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सूरजचा आदर्श ठेवावा, असे आवाहन काका साठे यांनी केले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## परंड्यात मोफत दिव्यांग तपासणी शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ फेब्रुवारी -**

तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे व तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्यअध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा येथे दि.७ फेब्रुवारी रोजी दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले.

यासाठी जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा यांच्या वतीने हा कॅम्प यशस्वी पार पाडण्यात आला.

या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग, मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण ४५ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉक्टर डॉ. ज्योती कल्याणी डॉ. आयुश शिंदे, डॉ. खंडागळे यांनी कामकाज पाहिले

कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योगसमूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, शहराध्यक्ष गोरख देशमाने, सरपंच संतोष भुजे,

कानिफनाथ सरपने, हाजगुडे, जाधव, बापू खताळ, डॉ. शेटे आदी परांडा येथील कर्मचारी यांनी सहकार्य केले.



## संक्षिप्त वृत्त...



### तेरमध्ये माता रमाई जयंती साजरी

**तेर, दि.७ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुर्व भीमनगर येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आले. यावेळी मात रमाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामुदायिक वंदना घेण्यात आली. यावेळी अभिजीत सावंत, किशोर धावारे, अर्शद मुलाणी, भाऊराव धावारे, शकील शेख, भास्कर धावारे, प्रभाकर सोनवणे, आक्रम बागवान, माणिक गाल्टे, करण धावारे, सुरज नलावडे, रितेश धावारे आदी उपस्थित होते.

### अर्चनाची कबड्डी संघात निवड


**तुळजापूर, दि.७ फेब्रुवारी -**



तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय मधील संगणक विभागातील अंतिम वर्षात शिकणारी विद्यार्थिनी अर्चना कांबळे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेच्या कबड्डी टीममध्ये निवड झाली आहे. याबद्दल संगणक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. वाघमारे डीजे, प्राचार्य प्रा. आडेकर आर. एच., प्रा. डोईजोडे एस.एम. व महाविद्यालयाचे विश्वस्त यांनी अभिनंदन केले.

### पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**परंडा, दि.७ फेब्रुवारी -**



शहरात संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या ७३९ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोनार समाजातील थोर संत शिरोमणी नरहरी महाराज यांची पुण्यतिथी शनिवार (दि.१५) सराफ व सुवर्णकार संघटनेच्या वतीने साजरी करण्यात येत आहे. सराफ व्यापारी मनोज चिंतामणी यांच्या मातोश्री निवासस्थानी संत नरहरी महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्त शनिवारी सकाळी १० ते १२ या कालावधीत श्रीसंत बाळुमामा जिवन चरित्र कथाकार तथा बाळुमामा मालिका फेम (रामाण्णा) प्रसिध्द किर्तनकार मेजर विक्रम जगताप यांचे गुलालाचे किर्तन होणार आहे. दुपारी १२ वाजता पुष्पवृटी करण्यात येणार त्यानंतर महाआरती करुन महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.



### 'लिट्ल'मध्ये रमाई आंबेडकर जयंती साजरी

**तुळजापूर, दि.७ फेब्रुवारी -**

लिट्ल फ्लॉवर्स शाळेमध्ये रमाई भिमराव आंबेडकर यांची आज जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार आणि मुख्याध्यापक अविनाश गव्हाणे यांच्या हस्ते रमाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षिका अनिता कदम यांनी रमाईंचा जीवनपट सांगितला. रमाबाई ते रमाई हा प्रवास खूप खडतर होता; परंतु तो त्यांनी यशस्वीपणे पार पाडला. अशा त्यागमूर्ती, स्त्रीभूषण रमाई आंबेडकर यांची जयंती आनंदाने साजरी करण्यात आली.

### सुरेशसिंग परिहार महाराज यांचे निधन

**जळकोट, दि.७ फेब्रुवारी -**



वागदरी (ता.तुळजापूर) येथील ग्रामदैवत संत श्रेष्ठ सद्गुरु भवानसिंग महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी तथा भवानसिंग महाराज भजनी मंडळाचे अध्यक्ष हभप. सुरेशसिंग उमरावसिंग परिहार महाराज यांचे दि.६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

गोरगरिबाकडून दमदाटी करून वसुली तर धनदागड्यांना नरमाई... एक लाख पेक्षा जास्त विजबील थकीत असलेल्या ग्राहकांची संख्या ९१...

# विद्युत महामंडळाकडून थकबाकी वसुलीमध्ये दुजाभाव; सामान्य ग्राहकांना दमदाटी

तुळजापूर शहरात दोन लाख पेक्षा जास्त विजबील... विद्युत महामंडळाचे जवळपास पावणे चार कोटीची वीजबिले थकीत...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ फेब्रुवारी -**

शहरामध्ये विजबील वसुलीसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्याकडुन गोरगरीब जनतेला दमदाटी करून वसुलीसाठी त्रास आणि धनदांडग्यांच्या बिलाबाबत विचार ना देखील केली जात नाही. वसुली करताना होत असलेल्या दुजाभावा करणाऱ्या संबंधीत कर्मचारी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करुन त्यांना निलंबीत करण्याची मागणीचे निवेदन निलेश कदम (परमेश्वर) यांनी महावितरण मंडळाचे कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.



निलेश कदम यांनी माहितीचा अधिकार टाकून महावितरण कार्यालयाकडून थकबाकीदारांची माहिती घेतली. तेव्हा तुळजापूर शहरामध्ये अंदाजे ३,७५,००,००० रूपये (पावणे चार कोटी) विजबील थकीत असल्याचे समजले. त्यामध्ये तुळजापूर शहरामध्ये दोन लाख पेक्षा जास्त विजबील थकीत असलेले ग्राहक १० व एक लाख रुपये पेक्षा जास्त विजबील थकीत असलेल्या ग्राहकांची संख्या ९१ आहे. महावितरण कार्यालयामार्फत विजबील वसुलीसाठी असलेले कर्मचारी व अधिकारी हे ज्याच्याकडे जास्तीचे विजबील थकीत आहे.

अशा व्यक्तीचे वीज बील वसुली न करता ते केवळ गोरगरीब व कष्टकरी व्यक्तीचे ज्यांच्याकडे केवळ पाच ते पंचेवीस हजार रुपये थकबाकी असलेल्या ग्राहकांकडुन सक्तीने दमदाटी करुन त्यांचे वीज कनेक्श्यान तोडत आहेत. परंतु ज्यांच्याकडे पन्नास हजार ते लाखो रुपयांचे थकीत बील आहे, अशा



व्यक्तीकडुन वसुली करण्यास किंवा वीज तोडण्यास धजावत नाहीत. त्यामुळे कर्मचारी व अधिकारी यांच्याकडुन थकीत विजबील वसुली व वीज तोडणीमध्ये दुजाभाव केला जात आहे. वीज बील वसुलीमध्ये दुजाभाव करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्यती कायदेशीर कारवाई करुन त्यांना निलंबीत करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

अशा कर्मचारी, अधिकाऱ्यांवर महावितरण विद्युत महामंडळाने तात्काळ कारवाई करावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनात देण्यात आला आहे.

## परंड्यात महसूल कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ फेब्रुवारी -**

परंडा येथील महसूल कर्मचारी यांना कार्यालयात येऊन शिवीगाळ केल्याच्या निषधार्थवतीने कर्मचारी यांनी आज कामबंद आंदोलन पुकारले व सर्व कामकाज बंद करून निवेदन देण्यात आले.

तहसीलदार परंडा यांना दिलेल्या निवेदन पुढे म्हटले आहे की, जरिचंद गोडगे (रा.रोसा हल्ली मुक्काम बार्शी) आज दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.४५ वाजता तहसिल कार्यालय परंडा येथील महसूल विभागात येऊन जगन्नाथ खुने यांना खासगाव येथील भाऊसाहेब यांचे सन २०२२ चे तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली अशी विचारणा केली. सदरचा तक्रार अर्ज हा भाऊसाहेब यांचा असून, जरीचंद गोडगे यांचा सदर अर्जाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसताना केवळ हस्तक (एजंट) म्हणून गोडगे तहसिल कार्यालय परंडा येथे वारंवार वावरत असल्याचे दिसून येत आहे.

प्रकरणातील सुनावणीसाठी तहसिलदार यांचे दालनाकडे जात असताना, जगन्नाथ खुने याचे म्हणने ऐकून न घेता खुने, महसूल सहाय्यक यांना दम दाटी व अश्लिल भाषेत शिवीगाळ करून अंगावर धावत येऊन दहशत निर्माण करुन धक्काबुक्की करून मारहाण केली व तुला बघुन घेतो अशी धमकी दिली. तसेच कार्यालयात गोंधळ घातला व शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला आहे. त्यानंतर गोडगे यांनी तहसिलदार यांचे दालनात, त्यांचे समक्ष खुने यांना शिवीगाळ केली.

सदर घटनेचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत. त्या निषेर्धात, परंडा तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी जरीचंद गोडगे यांचेवर फौजदारी कारवाई होईपर्यंत आज दि.७ फेबुवारी पासून बेमुदत कामबंद आंदोलन करीत असल्याचे नमूद केले आहे.

निवेदनावर जगन्नाथ खूने, मंदार कदम, मोहिलवाड एन.के., लवटे, पठान एम.एम., मंडळ अधिकारी तोरकडे एन.बी, साळूंके डी.के. यांच्या सह महसूल कर्मचाऱ्यांच्या सहया आहे.

## येरमाळ्यात पालक मेळाव्यास पालकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.७ फेब्रुवारी -**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत येरमाळा बीट अंतर्गत दि.६ रोजी येथील आनंदधाम सभागृहामध्ये पालक, आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी येरमाळ्यासह पंचक्रोशीतील पालकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी बोराडे, संगीता सावंत, अनिता थोरात, सरपंच प्रिया बारकुल, अनुपमा बोरफलकर, डॉ. संदीप तांबारे, डॉ. पल्लवी तांबारे यांच्यासह आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामस्थ, महिला पालक, उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरख बारकुल यांनी केले तर उपस्थितांचे आभार पवार यांनी मानले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोहारा न.पं.च्या उपनगराध्यक्षपदी अमीन सुबेंकर यांची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.७ फेब्रुवारी -**

लोहारा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षपदी शिवसेना पुरस्कृत नगरसेवक अमीन सुबेंकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. लोहारा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी दि.६ फेब्रुवारी रोजी विशेष सभा नगरपंचायतच्या सभागृहात बोलाविण्यात आली होती.

पिठासीन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उमरगा गणेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत उमेदवार अमीन सुबेंकर यांचा एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची लोहारा नगर पंचायतच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी गणेश पवार यांनी घोषित केले.

यावेळी नगराध्यक्षा वैशाली खराडे, गटनेत्या सारिका बंगले, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, पोनि. अजित चिंतळे, पोउनि. जोकार, राजेंद्र माळी, अभिमान खराडे, शब्बीर गवंडी, श्रीकांत भरारे, गौस मोमिन, कमल भरारे, आयुब हबीब शेख, जालिंदर कोकणे, आरती कोरे, मयुरी बिराजदार, शमाबी शेख, शामल माळी, सुमन रोडगे, आरती गिरी, विजयकुमार ढगे, संगिता पाटील, इकबाल मुल्ला यांच्यासह सर्व नगरसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत मीरा स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ फेब्रुवारी -**


परांडा येथील संत मीरा पब्लिक स्कूल येथे लहान गटातील विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये इ. नर्सरी, ज्यु.केजी व सी. केजीच्या १३० हुन अधिक चिमुकल्यांनी सहभाग घेतला होता

या स्पर्धेत बालकांनी डॉक्टर, वकील, शिक्षक, पुढारी, भाजीवाली, दूधवाला, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब, झाशीची राणी, भगतसिंह, लोकमान्य टिळक, शेतकरी, महाराणा प्रताप,भारत माता इ. अनेक प्रकारच्या वेशभूषा केल्या होते. पात्राला साजेसे असे सवांद, डायलॉग विद्यार्थ्यांनी अतिशय चांगल्या व प्रभावीपणे बोलून दाखवले. तसेच यावेळी छोट्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची फिल्मी गिते, लोकगीते यावर अप्रतिम नृत्य करत उपस्थित लोकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या निमित्ताने वर्षभारत शाळेने राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरीय स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संतोष भांडवलकर व प्रमुख पाहुणे शैला सुजितसिंह ठाकूर, अनुजा दैन, ॲड. फातिमा मुजावर, निशिगंधा सोनवणे, सुवर्णा सिरसट, मनीषा कोकाटे, नूरजन्हां शेख, ॲड. नुरुद्दीन चौधरी, सरपंच दीपक दुबळे, सुरेश घाडगे, आप्पासाहेब शिंदे, संतोष शिंदे, धनंजय पाटील, प्रताप पाटील, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षक म्हणून पूनम शिंदे व शुभांगी गोडगे यांनी काम पहिले. सूत्रसंचालन अनुराधा गव्हाळे व माधुरी नांगरे यांनी केले.

स्पर्धा यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे संतोष शेरे, प्रिती देशपांडे, रोहिणी कुंभार व बालाजी गोरे सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जयंतीत हुलडबाजी करणाऱ्यांवर कारवाई करा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

१९ फेब्रुवारी रोजी अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आहे. या दिवशी महाराजांची विविध उपक्रमाने जयंती साजरी केली जाते. ढोकी पोलीस स्टेशन हद्दीतील गावामध्ये पण जयंती शांततेने आणि पारंपरिक वाद्य वाचवत मिरवणुका काढून जयंती उत्सवात साजरी करण्यात यावी तसेच जयंतीमध्ये दारू पिऊन धिंगाणा घालण्यांवर कडक करावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने ढोकी पोलिस ठाण्याचे एपीआय. हजारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आधुनिक डीजेच्या तालावर मिरवणुका निघाल्या तरी त्या शांततेत निघाव्यात आणि जनतेचा उत्सव संपन्न व्हावा. यासाठी आपण जयंती प्रयत्न करावेत आणि जरी मिरवणुकामध्ये जर कोणी सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊन किंवा धिंगाणा, भांडण करण्याचा जाणून-बुजून प्रयत्न करत असेल तर अशा व्यक्तीवर व्यक्तीसमूहावर गुन्हे दाखल करावेत आणि त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती ढोकी पोलिस स्टेशन हद्दीमध्ये शांततेच्या मार्गाने आणि उत्साहात सोहळा संपन्न व्हा यासाठी पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच यांच्यासोबत शांत समितीची बैठक घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे, असे निवेदनात नमूद केले आहे.

निवेदन देतेवेळी तालुकाप्रमुख लहु शिंदे, गणेश पवार, जाधव, पंकज देशपांडे तसेच शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी व छावा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# खरीप २०२२ च्या पंचनामाच्या प्रति द्या अन्यथा कारवाई अटळ; जिल्हाधिकाऱ्यांचा यांचा विमा कंपनीस कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ फेब्रुवारी -**

शेतकरी नेते अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या तक्रारी अर्जावरून ६ फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजता जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली या बैठकीत खरीप २०20 व २०२१ च्या खरीप हंगामातील न्यायालयीन प्रकरणाची सद्यस्थिती, खरीप हंगाम २०२२ मधील पंचनामाच्या प्रति प्रलंबित विमा भरपाई, खरीप हंगाम २०२३ व २०२४ मध्ये अपात्र केलेल्या पूर्व सूचनाबाबत जिल्हास्तरीय समितीने दहा जुलै २४ रोजी दिलेल्या आदेशाचा कारवाई अहवाल, खरीप व रब्बी २०२३ व २४ मधील प्रलंबित विमा भरपाई, रब्बी हंगाम २४-२५ मध्ये कांदा पिकाच्या क्षेत्र पडताळणी करणे बाबत, मृगबहार व अंबिया बहार २०२४-२५ मध्ये विमा क्षेत्र पडताळणी बाबत चर्चा करण्यात आली व काही आदेश देखील पारित करण्यात आले.

खरीप २०20 मधील उर्वरित २२५ कोटी रकमेसाठी २४ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी असून खरीप २१ मधील शासन व अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या ३७४ कोटी रकमेसाठी दहा मार्च रोजी सुनावणी आहे.

यात शासनाने खाजगी वकील नेमला असून शासकीय वकील व खाजगी वकील यांच्याकडून बाजू मांडली जात आहे.

खरीप हंगाम २०२२ मधील पंचनामेच्या प्रती देण्याचा मुद्दा अनिल जगताप यांनी जोरदारपणे मांडला त्यावर जिल्हाधिकारी यांनी तातडीने पंचनामाच्या प्रतिद्या अन्यथा कारवाई करण्यात येईल सज्जन इशारा कंपनीला दिला तसेच शेतकऱ्याचे उर्वरित ५७ लाख रुपये देखील देण्याचे आदेश देण्यात आले. प्रति मिळाल्या तर आणखी पाचशे कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळू शकतात. प्रति नाही दिल्यास उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी हे येणाऱ्या अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करून कंपनीवर कारवाई करतील, अशी माहिती देखील अनिल जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्या समक्ष पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिली. खरीप रब्बी हंगाम २०२३-२४ मधील जिल्हास्तरीय समितीने आदेशित केलेल्या आदेशाप्रमाणे जवळपास सात हजार शेतकऱ्यांच्या पूर्वसूचना क्षेत्रीय स्तरावर पाठवून त्याची पडताळणी करून शेतकऱ्यांना रक्कम वितरित करावा असा आदेश देखील देण्यात आला.

**अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या याचिकेवर २४ फेब्रुवारी व १० मार्चला सुनावणी...**

खरीप २०20 मधील उर्वरित २२५ कोटी रकमेसाठी २४ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी असून खरीप २०२१ मधील शासन व अनिल जगताप यांनी दाखल केलेल्या ३७४ कोटी रकमेसाठी दहा मार्च रोजी सुनावणी आहे.

चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामातील नुकसान भरपाईचा मुद्दा देखील चर्चेला आला असता केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा प्राप्त होताच ताबडतोब २७० कोटी रुपये नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देत असल्याचे एचडीएफसी पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्याने देण्याचे जिल्हास्तरीय समितीला अवगत केले. रब्बी हंगाम २०२४ व २०२५ मधील कांदा पिक व मृगबहार व अमिया बहार या विमा क्षेत्राची पडताळणी करण्यात येणार असून नुकसानीच्या कुठल्या पूर्वसूचना स आलेल्या नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना फारशी नुकसान भरपाई मिळणार नाही. तसेच केवळ कांदा पिकासाठी ५१ कोटी रुपयांचा हिस्सा पिक विमा कंपनीला जाणार आहे.



मात्र पडताळणी केल्यानंतर ४० कोटी रुपये वाचतील असेही चर्चा दरम्यान सांगण्यात आले. त्यामुळे दोन्ही क्षेत्राची पडताळणी करण्यात येणार आहे.

या बैठकीसाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा कृषी अधीक्षक रविंद्र माने, तक्रारदार व शेतकरी नेते अनिल जगताप, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, जिल्हा उपव्यवस्थापक नाबार्ड, कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर, सरव्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक धाराशिव, व्यवस्थापक युनिव्हर्सल शाम्पू पिक विमा कंपनी, क्षेत्रीय व्यवस्थापक भारतीय कृषी विमा कंपनी, व्यवस्थापक एचडीएफसी ग्रो जनरल इन्शुरन्स कंपनी तसेच जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयातील सोनटक्के, विधाते इत्यादी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**आरोपीतर्फे ॲड.अविनाश धायगुडे यांनी बाजू मांडली**

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

केज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मा.श्री .एन.डी .गोळे यांच्या न्यायालयाने आरोपी अंकुश धर्मराज गायकवाड याची डोक्यात लाकडाने मारहाण करून दुखापत केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीनेड.आर.एम.धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले.

शिवीगाळ करून लाथा,बुक्क्याने, चापटाने मारहाण करू आशयाची फिर्याद दिल्यावरून आरोपी विरुद्ध गु.र.क्र.१४०/२०२३ कलम ३२४,३२३,५०४,५०६ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद झाला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले पक्षातर्फे मा.न्यायालयासमोर साक्षपुरावा झाला. प्रकरणात आलेल्या पुराव्यावरून व सरकार पक्षाचे म्हणणे व ॲड अविनाश धायगुडे यांचा युक्तिवाद ऐकूण मा.न्यायालयांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपींच्या वतीने ड.अविनाश धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना. ड.डी.ए. लोंढाळ,ड.ओ.ए.लोंढाळ ड.डी.डी. गडदे ,ड. पी.पी. धायगुडे यांनी सहकार्य केले.



### अखिल भारतीय ब्राह्मण कर्मचारी महासंघ अंबाजोगाई च्या वतीने श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांना निधी प्रदान

अखिल भारतीय ब्राह्मण कर्मचारी संघटना तालुका अंबाजोगाई यांच्या वतीने सज्जनगड येथील श्री रामदास स्वामी संस्थानला ७५१५ रुपये निधी अन्नदानासाठी प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी राजेन बुडुक,गदाधरबुवा रामदासी,सज्जनगड येथील स्वामी, ज्येष्ठ पत्रकार अविनाशजी मुडेगावकर,ज्ञानेश मातेकर,शैलेंद्र सेलूकर व श्रीमती अंजली रामकृष्णाचार्य जोशी हे पदाधिकारी उपस्थित होते.

### रथ सप्तमी निमित्त एका कुटुंबाला किराणा साहित्याचे वाटप, तसेच एका गरजू कॅन्सर ग्रस्त रुग्णांस आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ फेब्रुवारी**

अंबाजोगाई येथील पेशवा प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रथसप्तमी निमित्त ब्राह्मण कुटुंबास दोन महिना पुरेल इतका किराणा साहित्य वाटप करण्यात आला. रथसप्तमी ला प्रथेनुसार महिला धान्याच्या राशी घालतात व त्याची पूजा करून ब्राह्मणास देतात. त्यामुळे मागील पाच वर्षापासून पेशवा प्रतिष्ठान तर्फे रथसप्तमी निमित्त एका गरजू ब्राह्मण कुटुंबास किराणा साहित्य देण्यात येते. या वर्षी औसेकर कुटुंबास रविवार पेठेतील चांगदेव महाराज मंदिरात सदरील किराणा साहित्य , साडी चोळी देण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक प्रभाकर सेलमुकर, श्री शेषेराव पांडव, राहुल कुलकर्णी , डॉ महेश अकोलकर, गोविंद जोशी, प्रतीक्षा जोशी, अनिता औटी, प्रणिता पोखरीकर,स्मिता भातलवंडे, साधना विर्धे ,ममता दीक्षित, मनीषा उपळाईकर, रोहिणी जड, प्रतीक्षा वांजरखेडकर, प्रेमा पांडव यांची उपस्थिती होती.

कॅन्सग्रस्त सीमा जोशी यांना कॅन्सर दिनानिमित्त तसेच रथ सप्तमी निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे ७००० रू ची आर्थिक मदत करण्यात आली




भारतीय जनता पार्टी संघटन पर्व सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत सक्रिय सभासद नोंदणी शुभारंभ प्रसंगी लोकप्रिय मा.खा.प्रितमताई मुंडे यांचा सक्रिय सभासद अर्ज जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भरुन घेतला मा.खा.मुंडे यांनी सक्रिय सभासद फी १०० रु.रोख दिले यावेळी प्रदेश ,जिल्हा,तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# केज-बीड रोडवर केज जवळ टेम्पो आणि जीपचा भीषण अपघात; अपघातात दोघे ठार









**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

फेब्रुवारी रोजी सकाळी केज-बीड रोडवर केज तालुक्यातील सांगवी (सारणी) पुला जवळ कॅन्टर टेम्पो क्र. (टी एस-०१/यु सी-५५०२) आणि बोलेरो क्र (एम एच-१६/ए टी-००६२) गाडीचा अपघात झाला. यात नातेवाईकांच्या लग्नाचा बस्ता खरेदी करण्यासाठी जात असलेल्या उर्मिला उर्फ उमा श्रीराम घुले वय (४५ वर्ष) (रा. कोरेगाव ह. मु. शिक्षक कॉलनी केज) या महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातातील जखमी असलेले लक्ष्मण डोईफोडे, राम डोईफोडे आणि इतर दोघे यांना अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात हलविले होते. त्यातील एकाचा देखील मृत्यू झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झालेला असून तिघे जखमी आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसाच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी बीडमध्ये सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ फेब्रुवारी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सरकारी कार्यालये व विभागांसाठी शंभर दिवसाचा कृती आराखडा आखून दिलेला आहे . या कालावधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी नेमके काय करावे , या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव श्री राजेश कुमार यांनी दिनांक १५ जानेवारी रोजी व्हीसीद्वारे सर्व विभागीय आयुक्त यांची आढावा बैठक घेतली होती . या बैठकीस नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक तसेच जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख , पुणे हेदेखील उपस्थित होते .



महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी , तहसीलदार , उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्या नावे २१ जानेवारी रोजी परीपत्रक काढून शंभर दिवसांचा कृती कार्यक्रम कशाप्रकारे राबवावा याबाबतच्या सविस्तर सूचना दिलेल्या आहेत . भूमि अभिलेख विभाग , महसूल विभाग , मुद्रांक शुल्क विभाग यांनी सध्या व भविष्यात कोणकोणत्या सुधारणा राबवायच्या आहेत याबाबत सविस्तर सूचना या पत्रात देण्यात आल्या आहेत. यात मुख्यत्वे महसूल विभाग , भूमी अभिलेख विभागाने सेवांसाठी पोर्टल तयार करून त्याची सुलभपणे अंमलबजावणी करण्यात यावी , स्वच्छता व वेगवान संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यावर भर दिसतो .

## खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका इंगळेचा जनविकास महाविद्यालयात भव्य सहकुटुंब सत्कार

प्रियंकाने भारताचे नाव जगात गाजवले-डॉ बाबासाहेब गोरे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात भारताची पहिली महिला खो-खो विश्वचषक विजेती कर्णधार प्रियंका हनुमंत इंगळे हिच्या दैदीप्यमान यशाबद्दल जनविकास महाविद्यालयात सत्कार





करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, सत्कारमूर्ती प्रियंका इंगळे तसेच प्रियंकाच्या मातोश्री सौ. सविता इंगळे, वडील श्री. हनुमंत इंगळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रियंका इंगळे हिचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे यांच्या हस्ते बुके, शॉल,स्मृतीचिन्ह व रोख ११०००/- रुपये देऊन सहकुटुंब सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देत असताना प्रियंका इंगळे हिने खो-खो खेळाविषयीचे स्वअनुभव सांगून विद्यार्थ्यांनी जे कोणते क्षेत्र निवडले आहे त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन परिश्रम केले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.बाबासाहेब गोरे यांनी प्रियंकाची कौटुंबिक पार्श्वभूमी सामान्य असतानाही तिने स्वकर्तत्वाने खो-खो सारख्या खेळात सातत्य ठेवून देशातील विश्वचषक खो-खो टीमचे नेतृत्व करून देशाला पहिला विश्वचषक मिळवून देण्याचे काम केले, हे अतिशय महत्त्वाचे असून आमच्या परिसरातील व आमच्या आप्तस्वकीयातील प्रियंकाचा व तीने केलेल्या कामगिरीचाआम्हाला अभिमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून तिच्या पुढील वाटचालीस त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. गोपाळ भोसले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्राध्यापक डॉ.सतीश कदम यांनी मानले. या कार्यक्रमास प्रियंका इंगळे यांचे नातेवाईक गावातील ग्रामस्थ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा





**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ फेब्रुवारी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहवर्धक व आनंदमयी वातावरणात साजरे करण्यात आले.

स्नेहसंमेलन संमेलनाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज,राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करून करण्यात आली.यावेळी शाळेतील लहान मुला-मुलांनी विविध हिंदी-मराठी गाण्यांवर अतिशय सुंदर असे नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकली तर ६ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मोबाईलचे दुष्परिणाम सांगणारे जनजागृतीवर नाट्य सादर केले तर पहिलीच्या विद्यार्थ्यांनी पण प्रसंगावर गाणे सादर केले.

यावेळी कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणुन डॉं.बाळकृष्ण भवर,शिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे,सहा.पो मच्छिंद्र शेंडगे,अँड हनुमंत जाधव,केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे,पशुवैद्यकिय अधिकारी डॉं.गुंडाप्पा थळकरी,प.स.सदस्य उमाकांत भुसारी,डॉं.शिवाजी मस्के,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड तर प्रमुख उपस्थितीत म्हणुन सरपंच सुरेश नांदे,सरपंच मंगेश गुजर,सरपंच अंगदराव इंगळे,सरपंच युवराज ढोबळे,सरपंच विश्वास शिनगारे,सरपंच अंकुराव करपे,उपसरपंच महेश लामतुरे,चेअरमन अरूण चोपणे,कृ.उ.संचालक अरूण राऊत,माजी उपसरपंच राजाभाऊ यादव,पिएसआय बाळासाहेब मस्के हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बापुसाहेब भुसारी सर्व शिक्षकवृंद कर्मचारी व श्री.स्वामी समर्थ प्रतिष्ठान व शिवशक्ती क्रिडा मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## शिवजन्मोत्सव निमित्त आजपासून माजलगाव येथे श्रीमद् भागवत कथा

### शोभायात्रेत सहभागी होण्याचे बाळू ताकट यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ फेब्रुवारी**

माजलगावात शिवजन्मोत्सवा निमित्त आज (शनिवार) दि.८ पासून श्रीमद् भागवत कथेची सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी सकाळी १० वाजता शहरातील हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदान येथील सभा मंडपापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष बाळू ताकट यांनी केले.

शिवजन्मोत्सवा निमित्त यावेळी सामूहिक विवाह सोहळ्यासह यावेळी श्रीमद् भागवत कथा, तिरुपती बालाजी महोत्सव आदी कार्यक्रम पार पडणार असून सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी शिवजयंती पार पडणार आहे. त्याच अनुषंगाने आज (दि.८) शनिवार पासन श्रीमद भागवत कथेची सुरुवात होणार आहे. कथावाचक सुश्री राधास्वरुपा अनन्यादीदी शर्मा यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा पार पडणार आहे.



तत्पूर्वी आज सकाळी १० वाजता हनुमान मंदिर, हनुमान चौक येथून मंगलनाथ मैदानावरील कथा स्थळापर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत नागरिकांनी सहभागी होऊन श्रीमद् भागवत कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवजन्मोत्सव विवाह सोहळ्याचे आयोजक बाळू ताकट यांनी केले आहे.

## यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे-पो.नि.बंटेवाड

**तभा वृत्तसेवा**
**नवगण राजुरी दि.७ फेब्रुवारी**

देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात युवक महत्वपुर्ण भुमिका बजावू शकतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांना गुणवत्तानुरूप शिक्षण दिले गेलेच पाहिजे. यशस्वी जीवनाचा मुलमंत्र शिक्षण हेच आहे असे प्रतिपादन बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि.शिवाजी बंटेवाड यांनी नवगण राजुरी येथील गजानन विद्यालयात इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी बोलतांना केले.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.केशव भांगे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पो.नि.शिवाजी बंटेवाड हे होते. यावेळी पुढे बोलतांना पो.नि.बंटेवाड म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तीमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मुल्यांच्या आधारावरच पुढील शिक्षणातील यश अवलंबून असते. शाळेत मिळणार्या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असल्याने शालेय शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळणे हा त्याचा



हक्क आहे. त्याला शाळेत पाठवणे हे पालकांचे कर्तव्य आहे, उध्दीष्ट साध्य करायचे असेल तर संयम, चिकाटी हे महत्वाचे माध्यम आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलतांना प्राचार्य केशव भांगे म्हणाले की, देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भुमिका लक्षात घेऊन शिक्षण विषयक कार्यक्रम राबविले जातात. मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो तो तितकाच यशाच्या शिखरावर जावून बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारासाठी महत्वाची असते, आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने चांगले विचार आत्मसात करावेत. आपले उध्दीष्ट साध्य करावे असे सांगून इयत्ता १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय इयत्ता १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी, शाळेचे उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले एस.बी. सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माता रमाई असीम त्यागाचे प्रतीक : भिक्खु पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ फेब्रुवारी -**

माता रमाई या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविद्य पत्नी होत्या, माता रमाईच्या त्यागामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विश्वातील अद्वितीय व्यक्तिमत्व तथा भारतीय घटनेचे शिल्पकार होऊ शकले. त्यामुळे माता रमाई आंबेडकर या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील असीम त्यागाचे प्रतीक होत, असे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.



माता रमाई आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात बाबासाहेबांच्या कार्याला पाठिंबा देण्यासाठी अनेक कष्ट आणि त्याग सहन केले.

गरीबी, अपार दु:खाचा सामना करत, त्यांनी बाबासाहेबांना त्यांच्या ध्येयात पूर्ण साथ दिली.

त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब समाजासाठी संपूर्णतः झोकून देऊ शकले, असे ही आपल्या मार्गदर्शनात सांगितले.



# शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी नवीन कनेक्शन द्यावे

### महापारेषणचे कार्यालय लातूरात सुरु करावे; आमदारांची महावितरणच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या बैठकीत मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ फेब्रुवारी -**

कृषी पंपांसाठी नवीन कनेक्शन बंद असून सोलार पंप घेणं बंधनकारक केलं जात आहे. ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांचे बोअरवेल सातवे ते आठशे फुट खोल आहेत. अशा ठिकाणी सोलार पंप व्यवस्थित काम करत नाही. या निकषांचा विचार करुन नवीन कनेक्शन देण्याचे धोरण स्वीकारावे. तसेच महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे विभाजन करुन लातूर, धाराशिव व इतर एक ते दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महापारेषण कार्यालय सुरु करावे. यासह अनेक विषयांबाबत महावितरणचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याकडे आमदार अभिमन्यू पवार यांनी पाठपुरावा केला आहे



औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित विद्युत पुरवठा करण्या बरोबरच रोहित्र वेळेवर दुरुस्त करून द्यावीत, विद्युत उपकेंद्रांची क्षमता वाढ करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, मंजूर नवीन उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करुन फिडर सेपरेशनची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. यासाठी आमदार अभिमन्यू पवार सातत्याने प्रयत्न करीत आहेत. यासह इतर मागण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुंबई येथे म हावितरणचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची भेट घेतली. औसा मतदारसंघातील आरडीएसएस अंतर्गतची सुरु असलेली कामे वेगाने पूर्णत्वास नेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात याव्यात. आरडीएसएस -एम एचकेव्हीवाय २ अंतर्गत अनेक कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाले आहेत. पण कामे सुरू झाली नाहीत. अशा कामांचा आढावा घेऊन रखडलेली कामे तातडीने सुरू करण्यात यावीत. खरोसा, तपसे चिंचोली व औसा विद्युत उपकेंद्रांची क्षमता ५ एमव्हीएने वाढविण्यास कार्यारंभ आदेश निर्गमित झालेले आहेत. या तिन्ही विद्युत उपकेंद्रांची तातडीने क्षमता वाढ करण्यात यावी. एडीबी योजनेअंतर्गत ६३ केव्ही क्षमतेच्या रोहित्रांची क्षमता वाढवून १०० केव्ही करण्यात यावी.म हावितरणच्या निरंतर योजनेअंतर्गत औसा मतदारसंघासाठी २०० रोहित्र उपलब्ध करून देण्यात यावेत. कृषी पंपांसाठी नवीन कनेक्शन बंद असून सोलार पंप घेणं बंधनकारक केलं जात आहे. ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील बोअरवेल सातशे ते आठशे फुट खोल आहेत. आणि अशा ठिकाणी सोलार पंप व्यवस्थित काम करत नाही. ही बाब विचारार्थ घेऊन निकषांच्या अधिन राहून नवीन कनेक्शन देण्याचे धोरण स्वीकारावे. कासार सिरसी येथे १३२ केव्हाही क्षमतेचे विद्युत केंद्र मंजूर करावे. महापारेषणचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आहे.

या कार्यालयाचे विभाजन करून लातूर, धाराशिव व इतर एक ते दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महापारेषण कार्यालय लातूर येथे सुरु करावे. पॉवर ऑन व्हील (फिरता डीपी) ही संकल्पना संपूर्ण राज्यात राबविण्यात यावी, आदी विषयांसंदर्भात आ. अभिमन्यू पवार यांनी पाठपुरावा केला आहे.

## अनेक बस गाड्या बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण बंद

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.७ फेब्रुवारी-**

शिरूर अनंतपाळ तालुक्याची निर्माती होऊन २५ वर्ष उलटत आहेत पण या तालुक्यातुन केवळ दहा पाच गाड्या फेरे मारतात. एकतर रस्ते खराब शेतकरी व कष्ठकरी मजूर गोर गरीब पाल्यांचे मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी येत होते पण काही महिन्या पूर्वी सुरू केलेल्या बस गाडया अचानक बंद केल्यामुळे तालुक्यातील थेरगाव, हिप्पळगाव, येरोळ, साकोळ, दैठणा, हालकी व चाकूर तालुक्यातील सुगाव येथील शेकडो मुले मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी शिरूर अनंतपाळ येथे दररोज ये-जा करतात पण उदगीर व लातूर आगाराकडून बस सोडण्याची मागणी येथील विद्यार्थी व विद्यार्थीनीने जिल्हा अधिकाऱ्याला संपर्क साधून विनंती केली आहे.

तालुक्यातील येरोळ, साकोळ, थेरगाव, हिप्पळगाव हे गावे लोक संख्येच्या दृष्टीने मोठे आहेत. पण या गावातुन शेकडो विद्यार्थी दररोज शिरूर अनंतपाळ येथे माध्यमिक, उच्च माध्यमिक, शासकीय औधोगीक प्रशिक्षण संस्थे बरोबरच बीए, बी.एस्सी, बी. कॉम सारख्या महाविद्यालयीन शिक्षणा बरोबरच फार्मसी, नर्सिंग कॉलेजला शिकण्यासाठी शेकडो विद्यार्थी दररोज बसने ये-जा करीत होते.

पण अचानक नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात उदगीर आगाराची सुरु असलेली बस गाडी अचानक बंद केल्यामुळे येरोळ, थेरगाव, हिप्पळगाव, सुगाव, साकोळ येथील विद्यार्थ्यांची हेळसांड होत आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या उच्च शिक्षणावर पाणी सोडण्याची वेळ आल्याची खंत विद्यार्थिनींने आपल्या भावना तरुण भारतच्या प्रतिनिधी जवळ व्यक्त केल्या.

आम्हाला कोणी न्याय देईल का? महाविद्यालय व शाळा वाले म्हणतात की आम्ही काय करू शकता आम्ही ही आनेक वेळा विभागीय नियंत्रक लातूर व आगार प्रमुख उदगीर यांच्याकडे बस सुरू करण्यासाठी विनंती केली पण त्यांनी आमच्या अर्जाच्या विनंतीला दाद दिली नाही. आम च्या विनंतीच्या पत्राला केराची टोपली दाखवली.

त्यामुळे आम्ही काही ही करू शकत नाही. तुम्ही तुमचे शिक्षण बंद करा असे आई-वडील म्हणतात. एकीकडे शासन मोफत शिक्षण देण्याच्या वल्गना करते. एकीकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सोयी आभावी शिक्षण बंद करावे लागत आहे.

## उपेक्षित तृतीयपंथीयांना समजून घेऊन जगण्याचे बळ देण्याची गरज : देवयानी देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ फेब्रुवारी -**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. त्याला एकटे राहणे पसंत नसते. माणसाचे पुरुष व स्त्री असे मुख्यतः दोन घटक आहेत. यामध्ये तिसरा घटक अस्तित्वात असून जन्मदात्यापासून ते इतर समाजाकडून सातत्याने उपेक्षितच आहे, तो म्हणजे तृतीयपंथी, जो जन्मापासूनच आपल्या वेगळेपणाची अनुभूती घेत असतो. वयात आल्यावर तो कुटुंबातून बाहेर फेकला जातो तर इतर समाज त्यांना स्वीकारत नाही. शिक्षणा आणि व्यवसाय या दोन्हीतूनही त्यांना दूर सारण्याचा प्रयत्न होतो. यामुळे त्यांना खूप मोठा मानसिक त्रास होतो. शेवटी नाईलाजाने ते दीक्षा मागतात. अशा उपेक्षित तृतीयपंथीयांना समजून घेऊन जगण्याचे बळ देण्याची गरज आहे असे मत प्रसिद्ध व्याख्यात्या देवयानी देशमुख ऊर्फ माई, पुणे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळ, उदगीर अंतर्गत गेल्या चौदा वर्षापासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या सोमवारी अखंडितपणे संपन्न होत आलेल्या व आज संपन्न झालेल्या या ३३० व्या वाचक संवाद मध्ये उच्च शिक्षित तथा प्रसिद्ध व्याख्यात्या देवयानी देशमुख (माई ), पुणे यांनी बिंदूमाधव खिरे लिखित समलिंगी, उभयलिंगी, पारलिंगी, तृतीयपंथी, द्विलिंगी, ट्रान्स वुमन, ट्रान्समॅन व क्विअर समाज या साहित्यकृतीवर अत्यंत प्रभावी संवाद साधला. भरत गायकवाड यांचे अध्यक्षतेखालील पुढे बोलताना त्यांनी या सर्वांबद्दल वैद्यकीय माहिती, लिंग बदल आणि वैद्यकीय प्रक्रिया, कायदे, त्यांच्या समस्या, नावात बदल, ओळखपत्र, लिंगभाव, लैंगिक समस्या, त्यांच्या संस्था आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था लिंग बदलानंतर बालदत्तक घेण्याची प्रक्रिया या सर्वांबद्दल सविस्तर माहिती सांगितली. तेव्हा समाजाने चुकीच्या धारणा व गैरसमज दूर सारून त्यांना समजून घेत त्यांच्या भावभावनांचा आदर करत त्यांना जगण्याचे बळ देणे अत्यंत गरजेचे आहे. समाज दीक्षा देतो पण काम देत नाही. उपयोग घेतो पण त्यांच्याकडून काम करून घेत नाही.

यानंतर झालेल्या चर्चेत उपस्थित अनेक स्त्री-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी अत्यंत मोकळेपणाने संवादक आणि वाचक श्रोते यांच्यात सखोल अशी चर्चा झाली, तृतीयपंथीयांचे जीवन, वागणे, नाईलाज, व्यवसाय या सर्वांबरोबरच समाजात असलेली त्यांच्याबद्दलची धारणा त्यांच्याबद्दलचे विचार आणि समाजाकडून त्यांना दिली जात असलेली वागणूक याबरोबरच लैंगिक आकर्षण, संभोग, संतती, संपत्ती, त्यांचे एकूण जीवन या अनुषंगाने अनेक प्रश्न विचारले गेले आणि या सर्व प्रश्नांचे सहज हसत हसत तेवढ्याच गांभीर्याने उत्तरे देऊन हा कार्यक्रम अत्यंत एका उंचीवर नेण्याचे काम संवादक देवयानी देशमुख यांनी केले. वाचक संवादाच्या इतिहासात हा पहिलाच कार्यक्रम ज्यामध्ये एका वेगळ्या विषयावर आणि अत्यंत खोलवर अशी चर्चा घडून आली. यामुळे उपेक्षित समाजाबद्दलच्या लोकांच्या चुकीच्या धारणा आज संपुष्टात आल्या.

> तृतीयपंथीयांना लहानपणा पासूनच वेगळेपणाची जाणीव होते. वयात आल्यावर त्यांना घरच्यासहित इतर समाजही स्वीकारत नाही. त्यांना त्यांचे आयुष्य एकट्यानेच काढावे लागते. त्यांना स्वतःची कुठली संपत्ती अथवा संतती असत नाही. ते वडिलांच्या प्रॉपर्टीत कधीही हिस्सा मागत नाहीत. त्यांच्यामध्ये जातीभेद नसतो. ते प्रचंड आशावादी असतात. केवळ श्रद्धा आणि विश्वासाच्या बळावर आपले आयुष्य आत्मविश्वासाने जगतात, असे देवयानी देशमुख यांनी सांगीतले.

शासकीय दुध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्याकार्यक्रमाचे अत्यंत प्रभावी सूत्रसंचलन संयोजक अनंत कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय हनुमंत म्हेत्रे, यांनी करून दिला तर आभार अर्जुनराव सोमवंशी यांनी मानले. या कार्यक्रमास परिसरातील अनेक डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी-वाचक रसिकांसह बालगोपाळ, स्त्री पुरूष मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रम ाच्या यशस्वीततेसाठी बँकेचे अधिकारी मुरलीधर जाधव, पोलिस अधिकारी भागवत जाधव, प्रा. राजपाल पाटील, मुख्याध्यापक मोहन निडवंचे, लेखक तुकाराम बिरादार, प्राचार्य डॉ. शिवाजी सगर, उद्योजक कचरूलाल मुंदडा, प्राचार्य डॉ. नामदेव खंडगावे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यशवंतराव बिरादार, नाटककार तुळशीदास बिरादार, सुरेश वजनम, आदिंसह अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतले.

## ‘केशवराज’मध्ये स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.७ फेब्रुवारी -**

येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात ५ वी ते ७ वी विभागात स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ झाला.

याप्रसंगी मंचावर समारंभाचे अध्यक्ष सुरेंद्र आलूरकर, प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, लातूर अविनाश देवशटवार, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य राम कुलकर्णी, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, मुख्याध्यापक महेश कस्तुरे, धनंजय कुलकर्णी, जितेंद्र जोशी, सार्थक जहागीरदार, श्रावणी ईश्वरशेटे यांची मंचावर उपस्थिती होती.

## माणूसमारवाडी जि.प. शाळेची राज्यस्तरीय कॉमप्यूटर सायन्स हॅकेथॉन स्पर्धेसाठी निवड

### लातूर जिल्ह्यातून एकमेव माणूसमारवाडी शाळेची निवड... विजेत्या तीन मुलींचा केला सन्मान...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.७ फेब्रुवारी -**

मुलामध्ये संगणकीय विचार सहयोग, सांघिक कार्य (टीमवर्क) तार्कीक विचार आणि कोडिंग याचे ज्ञान अवगत होण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभाग लातूरच्या वतीने शैक्षणिक वर्षे २०२४-२५ पासून अमेझॉन फ्युचर इंजिनिअर प्रोग्राम राबवण्यात येत आसल्याने या स्पर्धामध्ये २५ शाळांनी व ७०७ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता त्यापैकी रेणापूर तालूक्यातील माणूसमारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तीन मुली यशस्वी ठरल्याने त्यांची राज्यस्तरावर निवड झाल्याने त्यांचे ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करुन शुभेच्छा देण्यात आल्या.



रेणापुर तालूक्यातील एक उपक्रमशील आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून माणूसमारवाडी येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचा उल्लेख केला जातो. या शाळेतील ईयत्ता ८ वी वर्गात शिक्षण घेत आसलेल्या तीन मुलीच्या सन्मान सोहळ्या च्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शालेय समितीचे अध्यक्ष रामेश्वर चव्हाण होते तर प्रमुख अतिथी म्हणून बाबासाहेब शिंदे, कलापंढरीचे मधुकर गालफाडे, मुख्याध्यापक गौतम टाकळीकर, एस.जी. सुरवसे, कुसूंबे, आर. के. अर्विकर, एस.व्ही. माम ीलवाड, आर एच पिंडकुरवार, गणेश चव्हाण, रामदास सिरसाट आदी सह शिक्षक विद्यार्थी यांची उपस्थिती होती. नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थी २१ व्या शतकातील कौशल्य आत्म सात करावी व त्याच बरोबर मुलांमध्ये संगणकीय विचार, सहयोग, सांघिक कार्य, तार्कीक विचार, आणि कोडिंग याचे ज्ञान मिळावे म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड व जिल्हा परिषद शिक्षण विभाग लातूर अमेझॉन फ्यूचर इंजिनिअरींग लीडरशिप फार ईक्विटी आणि कोड टू ईनहान्स लर्लिंग यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक वर्षे २०२४-२५ पासून अमेझॉन फ्यूचर इंजिनिअरींग प्रोग्राम राबविण्यात येत आहे.या स्पर्धेसाठी लातूर जिल्ह्यातील २५ शाळा मधुन ७०७ विद्यार्थांनी नोंदणी करुन सहभाग घेतला होता. त्यातील ३ शाळांची आणि ९ विद्यार्थाची निवड जिल्हास्तरीय बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी करण्यात आली आसून त्यातुनही सर्व उत्कृष्ट अन प्लग चैलेंज पुर्ण करणारी लातूर जिल्हातील एकमेव शाळा म्हणजे रेणापूर तालूक्यातील माणूसमारवाडी येथील जिल्हा परीषद शाळा होय या शाळेची पुढील राज्यस्तरावर होणाऱ्या स्पर्धे साठी निवड झाली आहे.

या मध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या ईयत्त ८ वी वर्गातील राधिका रामेश्वर चव्हाण, सिमरण शहरात शेख आणि महेक मौला शेख या तीन मुलींनी यशाच शिखर गाठल्यामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असल्यामुळे नुकताच ग्रामस्थ व शाळेच्या वतीने त्यांचा सन्मान करुन पुढील कार्यास शुभेच्या देण्यात आल्या आहेत.

# समाजातील समस्या सोडविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करा : किरण कोरे

### राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्सचे उद्घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय स्तरावरील टेक्निकल इन्हेंटमेटचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे अवरनेस निर्माण केल्याबद्दल विश्वेश्वरय्या संस्थेचे कौतुक करुन अशा टेक्निकल इव्हेंन्टमधून मिळणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांनी समाजातील समस्या सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन व्याख्याते किरण कोरे यांनी केले.




औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील विश्व व्हर्टेक्सचे उद्घाटन सुप्रसिध्द व्याख्याते किरण कोरे, उध्दव बडगिरे, उपप्राचार्य व्हिआयटी कॉलेज, लातूर यांच्या हस्ते करण्वयात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, संचालक विश्वनाथ निलंगेकर, प्रा. राठोड, डॉ.एस.एस. कानडे, विभागप्रमुख, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन लातूरचे विभाग प्रमुख सचिन राऊत, व्हिडीएफ स्कुल ऑफ पॉलिटेक्निक लातूरचे विभागप्रमुख प्रा.एस.एन. नागुरे, सहाय्यक प्राध्यापक, बिडवे, प्रा. सुरज बिराजदार, सहाय्यक अभियंता राम चिगुरे, एम.एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज लातूरचे प्रा.पंकज कागने, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन लातूरचे प्रा. धुलगुंडे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विभाग प्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश मांडे उपस्थित होते.

या टेक्निकल इव्हेंन्टमध्ये पेपर प्रेझेन्टेशन करिता १४४, प्रोजेक्ट कॉम्पिटीशन साठी ९३, क्विझ कॉम्पिटीशनसाठी ५४१, हॅक्थॉन करिता ७१ एकुण ८४९ विविध अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

यावेळी कार्यक्रमात विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील संगणक विभागप्रमुख प्रा. अब्दुल समद काझी यांनी लिहीलेल्या दोन पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या दोन पुस्तकांचे अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी उपयोगी पडणार आहेत.

या टेक्निकल इव्हेंन्टकरिता परिक्षक म्हणुन डॉ.एस.एस. कानडे, विभागप्रमुख, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर, डॉ. उध्दव बडगिरे, उपप्राचार्य व्हिआयटी इंजिनीअरिंग कॉलेज, प्रा. सचिन राऊत, विभागप्रमुख, व्हिडीएफ स्कुल ऑफ पॉलिटेक्निक, लातूर, प्रा.एस.एन. नागुरे, प्रा. पंकज कोकणे, सहाय्यक प्राध्यापक, एम. एस. बिडवे इंजिनीअरिंग कॉलेज, लातूर, प्रा. अंकित गायकवाड, मयुर शिंदे, शिल्पा वेल्लाळ, प्रा. सुरज बिराजदार, सहाय्यक अभियंता, राम चिगुरे, प्रा. पांडुरंग राठोडे, स्थापत्य विभागप्रमुख, शारदा पॉलिटेक्निक, औराद शहाजनी यांनी काम पाहिले.

> ### कलागुणांना वाव मिळण्यासाठी इव्हेंन्टचे आयोजन : प्राचार्य प्रशांत धाराशिवे
>
> संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना एक नवा प्लटफार्म मिळावा. यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच कला गुणांना वाव मिळावा. आजच्या स्पर्धेच्या युगात तंत्रज्ञानाचे कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत व्हावे. या उद्देशाने विश्व व्हर्टेक्स सारख्या टेक्निकल इव्हेंन्टचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी सांगितले.

या विश्व-व्हर्टेक्स टेक्निकल इव्हेन्टसाठी प्रायोजक म्हणुन टेक्नोसॉफट प्रा.लि., लातूर, स्किल्झवे, प्रा.लि. लातूर, गटागट बुक स्टोअर, लातूर, एआयआयटीएम कॅड सेंटर, लातूर, एएमबी सिडीएसपी, छ. संभाजीनगर यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागप्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी, यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अस्मा मुलानी, नेहा थोरात यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. गोपाळ दंडिमे यांनी केले.

यावेळी विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिल्ह्यातील बारावी परीक्षा केंद्रांवर 'सीसीटीव्ही'ची नजर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** इयत्ता बारावीची परीक्षा होत असलेल्या जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावरील सर्व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी दिल्या आहेत. या सीसीटीव्ही कॅमेराद्वारे प्रत्येक परीक्षा केंद्रावर प्रशासनाची करडी नजर राहणार असून या परीक्षा केंद्रांचे दैनंदिन चित्रीकरण त्याच दिवशी संबंधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच परीक्षा काळात कोणत्याही शाळा, विद्यालयाचे शिक्षक अथवा कर्मचारी गैरप्रकार करताना आढळल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करून संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी ठाकूर यांनी दिला आहे.

इयत्ता बारावी परीक्षेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी ठाकूर यांनी सर्व परीक्षा केंद्रांवर बैठे पथक परीक्षा कालावधीत पूर्णवेळ तैनात राहणार असून यामध्ये महसूल, जिल्हा परिषदसह इतर विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्त केली जाणार आहे. यासोबतच भरारी पथके गठीत करण्यात आली असून ही भरारी पथके अचानकपणे परीक्षा केंद्रांची तपासणी करणार आहेत.

यामध्ये कोणत्याही शाळेतील शिक्षक, कर्मचारी यांनी गैरप्रकार केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल. तसेच एखाद्या संस्था किंवा शाळा, महाविद्यालयाचा गैरप्रकारात सहभाग आढळून आल्यास त्या शाळा, महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर म्हणाल्या.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## लातुरात पोल्यूशन अंडर कंट्रोल ड्राईव्ह

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** लातूर शहर महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय व वाहतूक नियंत्रण शाखेच्या संयुक्त विद्यमाने शहरातील महात्मा बसवेश्वर चौकात पोल्यूशन अंडर कंट्रोल ड्राईव्ह घेण्यात आले. यावेळी वाहनातून होणाऱ्या प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यात आली.

पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार आणि प्रदूषण महामंडळ अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाच्या अनुषंगाने हा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी मनपा विविध उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जनजागृती सोबतच प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून २० जणांवर कार्यवाही करण्यात आली. त्यात ३० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. वाहतूक नियंत्रण शाखेनेही ४० जणांवर कारवाई करत २० हजार रुपये दंड वसूल केला. या उपक्रमात मनपाच्या पर्यावरण संवर्धन अधिकारी सन्मती मेस्त्री, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर,पंडित लोहारे,पर्यावरण सल्लागार सौ. गीतांजली कौशिक यांच्यासह प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अमोल सोमदे, श्रीमती दिपाली जाधव यांनी सहभाग घेतला. वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक माधव केंद्रे, बाबुराव गीते, महिला पोलीस कॉन्स्टेबल मठपती,डोंगरे यांचाही या उपक्रमात सहभाग होता.

## वर्ग हा स्वर्ग समजून शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करावे : प्रा.पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील गुणांबरोबरच सद्गुण हे महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परीपूर्ण विकास करणे व त्यासाठी त्यांच्या सुप्त कलागुणांच्या विकासावर भर देणे गरजेचे आहे. शाळा ही ज्ञानाची मंदिरे आहेत तर वर्ग स्वर्गासारखा असतो. त्या वर्गातून मिळणारे ज्ञान हे तीर्थ आहे. ग्रंथालय हे ज्ञानाचा व तीर्थाचा सागर आहे आणि ग्रंथालयातील ग्रंथ वाचून ज्ञान घेणे म्हणजे ते ज्ञानाचे कुंभ स्नान आहे.

शाळा महाविद्यालये राष्ट्रनिर्माण प्रयोगशाळा झाल्या पाहिजेत. शिक्षणातून माणूस घडला व राष्ट्राची जाण ठेवून अभ्यास केल्यास जीवनात यशस्वी होता येते. त्यामुळे वर्ग हा स्वर्ग समजून शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करावे असे प्रतिपादन प्रा.भिमराव पाटील यांनी केले. यावेळी ते स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेज एमआयडीसी लातूर येथे बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मारुती सूर्यवंशी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य गोविंद शिंदे उपस्थित होते. तसेच नाजमीन मुल्ला, समृध्दी कोकाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर्णा कापरे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात उन्हाचा पारा वाढताः दुपारी उन्हाचे चटके असह्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** गेल्या मोसमात परतीच्या पावसाने नोव्हेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत हजेरी लावून देखील जानेवारी अखेर उन्हाचा चटका प्रकर्षाने जाणवला. हे कशाचे संकेत आहेत, हे भविष्यात कळेल, मात्र, सध्या तरी फेब्रुवारीचा पहिला आठवडा सुरू असून देखील दुपारी उन्हाचा चटका असहाय्य करणारा ठरत आहे.

हे चित्र संबंध मराठवाड्यात प्रकर्षाने जाणवत असून, येत्या चार महिन्यांत उन्हाचे तापमान किती राहील, याची कल्पना येत आहे. यावर्षीचा उन्हाळा निश्चितच त्रासदायक ठरेल, असे संकेत मिळत आहेत. हल्ली तापमानाचा पारा तीस, बत्तीसच्या पुढे सरकत असून, एप्रिल, मे, जूनमध्ये तापमानाची काय परिस्थिती असेल, याची कल्पना करून पाहिली तरी यंदाचा उन्हाळा निश्चितच असहाय्य करणार ठरणार, असे दिसत आहे. दुपारच्यावेळी घराबाहेर पडणे जिकरीचे वाटत आहे. तसेच दुपारच्यावेळी उन्हाचा चटका बसत असल्याने नागरिकांत आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्याची चर्चा आहे. सध्या जागतिक तापमान झपाट्याने वाढत असल्याचे वृत्त येत आहे.

## सोयाबीन खरेदी केंद्रांवर वाहनांच्या रांगा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याची मुदत गुरुवारी संपली आहे. मात्र, अद्यापही नोंदणी केलेले शेतकरी खरेदी केंद्रांवर सोयाबीनच्या वाहनांसह रांगेत आहेत. दरम्यान, सरकारने शेवटचा सोयाबीन उत्पादक शेतकरी येईपर्यंत खरेदी केंद्र सुरू ठेवावे किंवा प्रतिक्विंटल तीन हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते सत्तार पटेल यांनी केली आहे.

हमी भावाने सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देऊन ती ६ फेब्रुवारीपर्यंत करण्यात आली होती. लातूर जिल्ह्यात एकूण ५२ खरेदी केंद्र आहेत. आतापर्यंत जवळपास १७ लाख क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले असून अद्याप जवळपास चार लाख क्विंटल सोयाबीन खरेदीच्या प्रतीक्षेत आहे. खरेदी केंद्रांवर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. बाजारात सोयाबीनचा भाव चार हजारांच्या आसपास घुटमळत आहे. तर सरकारने चार हजार ८९२ रुपये हमीभाव घोषीत केला आहे.



खरेदी केंद्रांवर बाजारभावापेक्षा अधिक भाव मिळत असल्याने खरेदी केंद्रांवर काही दिवसांपासून वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

जिल्ह्यात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावाने सोयाबीन विकण्यासाठी एक लाख पंधरा हजार शेतकऱ्यांनी ऑनलाइन नाव नोंदणी केली होती. त्यापैकी केवळ साठ हजार शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी झाली आहे. ही खरेदी जवळपास चार महिन्यांपासून सुरू आहे. गुरुवारी खरेदीची मुदत संपली आहे. अद्याप ५० ते ५५ हजार शेतकरी खरेदीच्या प्रतीक्षेत आहेत. तर दहा-पंधरा हजार शेतकऱ्यांना अद्याप मेसेजही आला नाही. नोंदणी न केलेले शेतकरी लाखाच्या घरात आहेत. वास्तविक पाहता खरेदी केंद्रचालकांनी एक दिवसात जेवढी खरेदी केली जाते त्याच शेतकऱ्यांना मेसेज द्यायला पाहिजे. परंतु, तसे झाले नाही.

दरम्यान, कधी बारदाना नाही म्हणून बंद तर कधी सुतळी नाही म्हणून खरेदी बंद करण्यात आली होती. सोयाबीनचे भाव बाजारात हमीभावापेक्षा कमी येण्याला सरकारचे धोरण कारणीभूत आहे. याची जबाबदारी घेऊन शेवटचा शेतकरी जोपर्यंत सोयाबीन घेऊन येत नाही तोपर्यंत सरकारने हमीभाव खरेदी केंद्र सुरू ठेवावेत, अशी मागणी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे प्रवक्ते सत्तार पटेल यांनी केली आहे.

## ज्येष्ठांशी संवाद हाच समाजाच्या जडण घडणीचा आधार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** ज्येष्ठ मंडळींशी संवाद हाच समाजाच्या जडणघडणीचा आधार होय, असा सूर लातूर येथे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ज्येष्ठांच्या पहिल्या साहित्य संमेलनातील परिसंवादात उमटला.

'समाजाच्या जडणघडणीत ज्येष्ठांचे योगदान' या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे होते. परिसंवादात सहभागी वक्त्यांमध्ये डॉ. हंसराज बाहेती, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप नणंदकर, सामाजिक कार्यकर्ते रामानुज रांदड आणि साहित्यिक प्रा. डॉ. राजशेखर सोलापुरे यांचा समावेश होता.

प्रारंभी साहित्य संमेलनाचे सचिव प्रकाश घादगिने यांनी परिसंवादाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. बी. आर. पाटील यांनी केले.

मनामध्ये ओलावा असणे हे ज्येष्ठांचे लक्षण असल्याचे सांगून डॉ. सोलापुरे म्हणाले, आजच्या समाजाची झालेली जडणघडण हेच ज्येष्ठांचे योगदान आहे. आपण अनुत्पादक नसून उत्पादक आहोत. आज सर्व क्षेत्रात ज्येष्ठांचाच धबधबा आहे. अर्धनिवृत्तीच्या संकल्पनेमागे हाच अर्थ अभिप्रेत आहे. आज घरे पक्की झाली पण माणसे कच्ची राहिली, त्या माणसांवर संस्कार करण्याचे काम ज्येष्ठ मंडळी करतात तेव्हा ज्येष्ठांनी समाजात संवाद कसा निर्माण होईल हे पाहिले पाहिजे. तर डॉ. बाहेती म्हणाले, ज्येष्ठ मंडळी हे समाजाचे ॲसेट आहेत की लायबिलिटी हे समजून घेतले पाहिजे. ज्येष्ठांनी मधल्या पिढीला समजून घेतले तरच कुटुंबात संवाद निर्माण होईल. प्रसंगी तडजोड करायलाही शिकले पाहिजे. आज ८० टक्के आजार मनाच्या तणावातूनच निर्माण होतात. यावेळी ज्येष्ठ पत्रकार नणंदकर यांनी जगणे आनंददायी करणारी अनेक उदाहरणे देत ज्येष्ठांनी सामाजिक कार्याला जुंपून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

आपल्या जडणघडणीत आजी-आजोबांचे योगदान असते, हे घरातील नव्या पिढीला सांगता आले पाहिजे, असे सामाजिक कार्यकर्ते रांदड म्हणाले.

## क्षयरोग विषयक जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना व लातूर जिल्हा क्षयरोग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच तिळगूळ व क्षयरोग जनजागृती कार्यक्रम विलासराव देशमुख शासकीय वैद्यकिय महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आला होता.

तसेच क्षयरोग जनजागृतीपर रांगोळी स्पर्धा व पोस्टर प्रदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील नर्सींगचे विद्यार्थी व स्टाफ नर्स यांनी सहभाग नोंदविला. प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त येणाऱ्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.एस.एन.तांबारे यांनी क्षयरोग विषयक जनजागृतीचे महत्व १०० दिवसीय टिबी मोहिमेचे उद्दिष्ट, अतिजोखमीच्या व्यक्तींची तपासणी, निदान, उपचार, टिबी प्रतिबंधात्मक उपचार या बाबत माहिती दिली.

सहयोगी प्राध्यापक डॉ. विमल होळंबे यांनी आहार, आरोग्य व व्यायामाचे महत्व सांगितले. त्याचबरोबर समाजात टिबीविषयी गैरसमज आहेत, ते दूर होणे आवश्यक आहे, असे सांगीतले. डॉ.नम्रता आचार्य यांनी मानसिक आरोग्य व क्षयरोग याबाबत माहिती दिली.

## अंधारात होतेय वाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** शहराच्या पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम ईईएसएल कंपनीने दीड वर्षापासून बंद केले आहे. यामुळे पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम महापालिकेलाच पाहावे लागत आहे. सध्या एकेक पथदिवा बंद पडत आहे. यामुळे शहराच्या विविध भागात अंधार दाटताना दिसत आहे. महापालिकेला पथदिवे खरेदी करण्यास शासन परवानगी देत नाही. यामुळे महापालिका प्रशासन कोंडी सापडले आहे. शासनाने पालिकेकडील थकलेले पाच कोटींचे बिल भरावे अन्यथा महापालिकेला तरी पथदिवे खरेदी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी लातूरकरांतून होत आहे.

## राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणात परिपूर्ण माहिती देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती संकलित करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

नमुना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील. सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक उ. म. हत्ते यांनी केले आहे.

## आ. कराड यांच्या सूचनेवरून मांजरा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यात पाणी सोडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** मांजरा प्रकल्पाचा उजवा कालवा लातूर ग्रामीण मतदार संघातील बहुतांशी गावातून जात असून रब्बी हंगामातील पिकांना पाणी देता यावे यासाठी या कालव्यात मांजरा प्रकल्पाचे तातडीने पाणी सोडण्यात यावे अशी सूचना भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांनी केली होती. त्यांच्या सूचनेनुसार विधिवत पूजन करून मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडण्यात आले. कालव्यात पाणी सोडल्याने शेतकऱ्यातून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

मांजरा प्रकल्पाचा उजवा आणि डावा कालवा लातूर ग्रामीण मतदार संघातून जात आहे. या दोन्ही कालव्यामुळे मतदार संघातील अनेक गावच्या जमिनी सिंचनाखाली येतात. जेव्हा जेव्हा मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला जातो त्यावर्षी या कालव्यांना पाणी सोडून जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली जाते.



यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने धनेगाव येथील मांजरा प्रकल्पात पाण्याचा मुबलक साठा झाला असून कालवा सल्लागार समितीने मांजरा प्रकल्प उजवा कालव्याची पाणी आवर्तने मंजूर करण्यात आली आहे, तथापि परतीचा पाऊस जास्त झाल्यामुळे रब्बी पिकांकरिता शेतकऱ्याकडून जास्त पाण्याची मागणी नव्हती. मात्र आता पिकांना पाण्याची आवश्यकता भासत असल्यामुळे कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी कालवा काठच्या विविध गावातील संबंधित शेतकऱ्याकडून होत आहे.

मागील काळात मांजरा प्रकल्पाच्या डाव्या कालव्याला काही प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते. शेतकऱ्याची गरज लक्षात घेऊन तातडीने मांजरा प्रकल्प उजव्या कालव्यास पाणी सोडून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे अशी सूचना भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, लातूर यांना केली होती. आ. कराड यांच्या सूचनेनुसार आज गुरुवारी मांजरा प्रकल्पातून उजव्या कालव्यात पाणी सोडण्यात आले. यावेळी भाजपाचे नेते राजेश कराड यांच्या हस्ते यावेळी विधिवत पूजन करण्यात आले. मांजरा प्रकल्पाचे पाणी कालव्यात सोडल्याने कालव्या लगतच्या शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भाजप नेते आ रमेश कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत. याप्रसंगी लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, उप अभियंता मितनवरे, शाखा अभियंता सूरज निकम, आशिष चव्हाण आदी उपस्थित होते.

## 'केशवराज'मध्ये स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात ५ वी ते ७ वी विभागात स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवशटवार, राम कुलकर्णी, शैलेश कुलकर्णी, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक महेश कस्तुरे, धनंजय कुलकर्णी( माटेफळकर), जितेंद्र जोशी, सार्थक जहागीरदार, श्रावणी ईश्वरशेटे यांची उपस्थिती होती.

सरस्वती माता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त सर्व मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेतील बक्षीसपात्र विजेत्यांना पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलनात २६४ विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाले आहे.



यावेळी बोलताना अविनाश देवशटवार असे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते. केशवराज विद्यालयातून अनेक गुणवंत विद्यार्थी घडले आहेत त्यांच्या पाऊलखुणांच्या पाऊलवाटा झाल्यात त्याच मार्गाने विद्यार्थ्यांनी जावे असे आवाहन त्यांनी केले.

कला, क्रीडा, व्यायाम,खेळ यातूनच बलसंवर्धन, संघटनकौशल्य विकसित होत असते.सर्व बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

शालेय क्रीडा स्पर्धेत सायकलींगमध्ये राष्ट्रीय पातळीवर ६ वा क्रमांक तर राज्यात २ रा क्रमांक कु.समीक्षा मनोज कुमार देवणे वर्ग ८अ हिला पारितोषक प्राप्त झाल्यामुळे तिचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

राम कुलकर्णी आपल्या मनोगतात म्हणाले की, स्नेहसंमेलन हा कुंभमेळा आहे. यातूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू समोर येतात. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच मैदानी खेळात सहभागी व्हावे व मोबाईल पासून दूर राहावे असे आवाहन केले. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

अध्यक्षीय समारोपात आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.सुरेंद्र आलूरकर असे म्हणाले की, आई, वडील व गुरु यांनी सांगितलेल्या मार्गाने पुढे जावे.विद्यार्थ्यांमध्ये कलागुण विकसित करण्यासाठी विद्यालयात अनेक उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांच्या माध्यमातून संस्कारक्षम विद्यार्थी तयार व्हावे .यासाठी सर्व उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा तसेच मोबाईलचा वापर टाळावा असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.सर्व बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

प्रास्ताविक संमेलन प्रमुख धनंजय कुलकर्णी यांनी केले. सर्व मंडळांच्या बक्षीसांचे वाचन अभ्यासपूरक मंडळप्रमुख शैलेश सुपलकर यांनी केले.सूत्रसंचालन व मान्यवरांचा स्वागत,परिचय व आभार प्रदर्शन स्वप्ना सेलुकर यांनी केले. सामूहिक कल्याणमंत्राने बक्षीस वितरण समारंभाची सांगता झाली. स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक महेश कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक संदीप देशमुख, बबन गायकवाड, राजश्री कुलकर्णी, अंजली निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली,सर्व मंडळप्रमुख,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## धाडीत १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ फेब्रुवारी -** राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे १ ते ३१ जानेवारी अखेर जिल्ह्यात १४७ ठिकाणी सुरू असलेल्या अवैध व्यवसायावर धाडी टाकण्यात आल्या. या धाडसत्रात १४ लाख ६ हजार ३३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महिनाभरात १४४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अवैध दारूची वाहतूक करणारी सात वाहने पकडण्यात आली आहेत. याबाबत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभाग नांदेडचे विभागीय उपायुक्त बी. एच. तडवी यांच्या निर्देशानुसार लातूरचे अधीक्षक केशव राऊत यांच्या आदेशानुसार लातूर जिल्ह्यात जानेवारीमध्ये विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध ठिकाणच्या अवैध व्यवसायावर धाडी टाकण्यात आल्या. अवैध दारू निर्मिती, विक्री आणि चोरट्या मार्गाने केल्या जाणाऱ्या वाहतुकीविरोधात लातूर, उदगीर, निलंगा, चाकूर विभागाच्या पथकांनी संयुक्तपणे कारवाई केली.



एकूण १४७ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान १४४ जणांना अटक करण्यात आली आहे. १ हजार ६७१ लिटर हातभट्टी दारू, ३ हजार ५६० लिटर हातभट्टी दारू निर्मितीसाठी लागणारे रसायन, ६ हजार ८१५ लिटर देशी, २१८ लिटर विदेशी, १५० लिटर ताडी, ८ लिटर बीअर असा एकूण १४ लाख ६ हजार ३३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गतवर्षीच्या तुलनेत शंभर वाहनांची वाढ झाली असून, ९६ अधिक आरोपी गजाआड करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या मुद्देमालातही यंदा वाढ झाली आहे.

ही कारवाई निरीक्षक आर.एस. कोतवाल, आर. एम. चाटे, आर. व्ही. कडवे, यु. व्ही. मिसाळ, दुय्यम निरीक्षक एन. पी. रोटे, ए. डी. भोसले, एस. आर. राठोड, एस. के. वाघमारे, बी. आर. वाघमोडे, व्ही. पी. राठोड, डी. एल. येळे, एस. बी. घुले, एस. पी. काळे, डी. डी. साळवी, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोळे, नीलेश गुणाले, मंगेश खारकर, षडाक्षरी केंगारे, गजानन होळकर, अनिरुध्द देशपांडे, सुरेश काळे, सौरभ पाटोदकर, सोनाली गुडले, ज्योतीराम पवार, श्रीकांत साळुंके, संतोष केंद्रे, कपिल गोसावी आदींच्या पथकाने संयुक्तपणे केली आहे.